म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कादंबरी
दा. क्र. ८८९५

# कॉसॅक! कॉसॅक!



IRBK-0109895

3 MAY 1977

ध्वा० क्र० ८
८८०५

# कोसॅक ! कोसॅक !

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
33328
अनुक्रम बा. वा.
विभाग कादंबरी
क्रमांक २९८
नों. दि. १८/८/६२
बाल शाखा.

बालवाङ्मय शाखा
प्र. प्रे. क्र. ८८०५ नों. दि.
ग्रा. क्र. ३८६ क्र.
वि. बा. वा.

कुमार साहित्य माला

वोरा अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २.

...७४...

दीड रुपया

श्री . ३५१ [ ५–६२ ]
卐

© १९६२
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
卐
कुमार साहित्य माला:७४
आवृत्ति पहिली :
शके १८८३, सन १९६२
卐
मूल्य रु. १–५०
卐
Taras Bulba
by Gogol
अनुवादक: सुशील परभृत

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा.लि. करतां
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २
卐



मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
शनिवार, पुणें २

तारास बल्बा या नांवाची एक प्रसिद्ध रशियन कादंबरी आहे. एका कोसॅक रंगेल योद्ध्याच्या जीवनाचें तें मोठें आकर्षक चित्र आहे. गोगोल हा या कादंबरीचा जगप्रसिद्ध लेखक.

मूळ कादंबरींत लढाईच्या धुमश्चक्रीबरोबर प्रेमाचे रंगहि पण तितकेच ठसठशीतपणें रंगविलेले आहेत. तथापि हा संक्षिप्त अनुवाद कुमार साहित्य मालेसाठीं संपादन करतांना त्यांतील इष्ट वाटला तेवढाच भाग या पुस्तकांत समाविष्ट केला आहे.

कोसॅकांच्या जगाचें हें सोळाव्या शतकांतील जीवनचित्र आहे. त्यांची विलक्षण संस्कृति, त्यांचें पराक्रमी व समृद्ध जीवन, त्यांची जीवनाबद्दलची बेदरकार वृत्ति, धर्मावरची जाज्वल्य निष्ठा आणि स्वातंत्र्याविषयींचें असीम प्रेम—साऱ्या साऱ्यांचें चित्रण या मूळ कादंबरींत गोगोलनें केलेलें आहे. त्याची लेखणीहि मोठी जिवंत नि रसरशीत आहे.

त्या कादंबरीचा हा संक्षिप्त अनुवाद कुमार साहित्य मालेंतून दिला जात आहे. अशासाठीं कीं जुन्या जमान्यांतील एका जातिवंत लढाऊ जमातीच्या जीवनाची ओळख यावरून होईल; आणि धर्म-देशस्वातंत्र्याच्या प्रेमासाठीं माणूस जिवावर किती उदार होऊन वागत असतो हें समजेल.

संग्रहालय
अनुक्रम 33324
विभाग
क्रमांक
नों. दि.

• • •

## कुमार साहित्य मालेंतून

'कोसॅक ! कोसॅक !' सारखीं हीं आणखीं
अनेक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.

- **इतिहासाच्या पानोपानीं** : निवडक ऐतिहासिक कथा
  संपा. अमरेन्द्र रु. १–५०
- **राखेंतील निखारे** : १८५७वरील कादंबरी
  अनु. सौ. मृणालिनी देसाई रु. १–७५
- **वाघजईच्या जंगलांत** : ऐतिहासिक कादंबरी
  अनु. सुशील परभृत रु. २–००
- **छोटा सरदार** : एका मुलाचा पराक्रम–कादंबरी
  गो. वि. नामजोशी रु. २–००
- **दोन शिलेदार** : दोघां भावांची शोकांतिका–कादंबरी
  सुधाकर प्रभु रु. १–५०
- **ऐतिहासिक गुजगोष्टी** : इतिहासांतील स्मरणीय प्रसंग
  भा. द. खेर रु. १–२५
- **पुण्यपथ पानिपत** : पानिपतचा समग्र संग्राम
  सुधाकर प्रभु रु. २–००
- **महाराष्ट्र इतिहास दर्शन** : महाराष्ट्राचा २०० वर्षांचा
  इतिहास–ढेरे-खेर-प्रभु रु. २–००
- **गुलाबाचें युद्ध** : इंग्लंडमधील युद्ध–कादंबरी
  अनु 'प्रकाशरंजन' रु. १–५०
- **पहिलें महायुद्ध** : १९१४–१८च्या महायुद्धाचा इतिहास
  स. शं. देसाई रु. २–००
- **दुसरें महायुद्ध** : १९३९–४५ च्या महायुद्धाचा इतिहास
  स. शं. देसाई रु. २–००
- **कोसॅक ! कोसॅक !** : रशियन कादंबरीचा अनुवाद
  सुशील परभृत रु. १–५०

कुमार साहित्य मालेनें
वरील ऐतिहासिक कथा-कादंबऱ्यांप्रमाणेंच
विज्ञान, संस्कृति इ. विषयांवरतीहि
अनेक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत.

---

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ३ राउंड बिल्डिंग, मुंबई २.

33328

# १

‘ हं, असा जरा अंगाभोंवतीं फिर बघूं बेटा ! अरे, पण काय रे, शेतांतल्या बुजगावण्यासारखाच दिसतोच कीं रे तूं ! नि हें अंगावर काय पेहरलं आहेस हरदासासारखं ? असाच असतो वाटतं साऱ्यांचा पोषाख शाळेंत ? ’

अशा शब्दांनींच वृद्ध बल्बानें आपल्या दोन्ही लेकांचें स्वागत केलें. कीव्हच्या पाठशाळेंतील अभ्यासक्रम संपवून ते दोघेहि जवान आज घरीं परतले होते.

आपल्या घोड्यांवरून ते नुकतेच खालीं उतरले होते. अंगापिंडानें ते दोघेहि चांगले तगडे दिसत होते. नि साऱ्याच महाविद्यालयीन युवकांप्रमाणें ते किंचित् लाजाळू होते. दोघांच्याहि रसरशीत मुखांवर तारुण्याची काजळी पताका नुकतीच फडकूं लागली होती नि अजून तरी तिच्यावरून कारागिराचा हात फिरलेला दिसत नव्हता. वडिलांकडून मिळालेल्या या पहिल्याच सलामीमुळें कांहींसे गोंधळून अधोमुख होऊन ते स्वस्थ उभे होते.

‘ थांबा ! मला नीट पाहूं दे एकदां तुम्हांला, ’ त्यांचें सर्वांग निरीक्षण करीत बल्बा पुढें म्हणाला, ‘ तुमचे हे अंगरखे रे किती पायघोळ ? हे आम्हीं तर कांहीं कधीं पाहिले नव्हते असे. थोडें धावून दाखवा पाहूं मला. मला वाटतं तुमचे पाय या घोळांत अडकून तुम्ही नक्की तोंडघशीं पडणार.

‘ पुरे बाबा, असे हंसूं नका आम्हांला ! ’ अखरीस त्याचा मोठा लेक उद्गारला.

‘ ओ हो, अभिमान तर बघा ! ! पण कां नको रे हंसूं मी ? ’

‘ कारण, तुम्ही जरी माझे वडील असला तरी देवाशपथ सांगतों, तुमचीं हाडं मोकळीं केल्याशिवाय राहाणार नाहीं मी त्याबद्दल ! ’

‘ काय ? अरे हैवान ! आपल्या खुद्द बापाचीं हाडं मोकळीं करणार अं तूं ? ’ विस्मयचकित झालेला टारास एकदोन पावलें मागें सरून ओरडला.

‘ मग असलांत म्हणून ? अपमान असा मी कोणाकडूनहि सहन करणार नाहीं. ’

'आणि कसा झुंजणार रे माझ्याशीं तूं ? हाताच्या मुठींनीं –होय रे ?'

'कसाहि.'

'ठीक ठीक, नुसत्या हाताच्या मुठींनींच तर,' हाताच्या अस्तन्या वर करीत टारास बल्बा म्हणाला. 'तुझ्या मुठींचं सामर्थ्य तरी कसं आहे बघूं दे मला.'

झालें, बऱ्याच दिवसांच्या ताटातुटीनंतर झालेल्या या पहिल्याच भेटींत, दुसऱ्या कसल्या गोड स्वागताऐवजीं ते दोघेहि बापलेक अशा रीतीनें एकमेकांना दिलखुलास मुष्टिमोदक चारूं लागले नि नाना तऱ्हेचे पवित्रे घेत एकमेकांची यथेष्ट कणीक तिंबूं लागले.

'बघा, बघा रे एकदां बाबांनों, या म्हाताऱ्याचं माथं फिरलं आहे बघा ! अगदीं पुराच पिसा झाला आहे म्हातारा !' हा वेळपर्यंत आपल्या मुलांना जवळ घेऊन कुरवाळण्यासाठीं उत्सुक होऊन दारांत उभी राहिलेली त्या मुलांची क्षीण फिकट दिसणारी प्रेमळ माता मोठ्यानें ओरडून म्हणाली. 'हीं आत्तांच कुठं माझीं पोरं दारांत पाऊल टाकताहेत–या साऱ्या वर्षभरांत गांठभेटही नाहीं झालेली त्यांची, नि या म्हाताऱ्याच्या डोसक्यांत शिरलं आहे वेड त्यांच्याशीं मारामारी करण्याचं !'

'छान, छान लढतो आहे हं पोरगा !' हात आवरून बल्बा उद्‌गारला 'छान, खरंच छान लढतो आहे हं पोरगा !' आपले कपडे ठाकठीक करीत तो पुढें म्हणाला, 'निःसंशय सुंदर– मी नसते दोन हात केले तर बरं झालं असतं, असं देखील वाटतं आहे आतां मला. अगदीं झक्क असा कोसॅक होणार तो ! बरं तर पोरा, आतां सुस्वागतम् असं म्हणतों मी ! हं, आतां दे आपल्या बापाला चुंबन !' नि मग ते दोघेहि पितापुत्र परस्परांच्या मिठींत नि मुखस्पर्शांत गुंगून गेले. 'हं आतां ठीक, नि अशींच हाडं मऊ करीत जा साऱ्यांचीं, माझीं केलींस तशीं ! कुणाची म्हणून गय नाहीं करायची ! पण तरी सुद्धां तुझ्या अंगरख्याचा घोळ मात्र विक्षिप्तच हं! नि ही दोरी कसली रे लोंबते आहे ? आणि तूं रे बुळ्या, तूं कां असा ढिल्या हातांनीं उभा राहिला आहेस ?' धाकट्या लेकाकडे वळून तो म्हणाला. 'चल, असा पुढें ये, ए तूं नाहीं का मला चार मुष्टिमोदक चारणार ?'

'तेवढंच, तेवढंच, दुसरं सुचायचं आहे काय तुम्हांला !' त्याला कुरवाळीत असलेली त्याची आई ओरडली. 'बाप-लेकांचं असं लढणं ऐकलं आहे

तरी का कुणीं ? दुसरा उद्योगच नसेल त्याला जसा. लहान आहे तो, नि आला आहे तरी किती लांबून? दमला आहे तो फार...'

'विशी उलटलेला तो जवान तिचं बाळ हं ! '

'चांगले चार घांस खायला घालून विश्रांती द्यायची त्याला, तें राहिलं नि म्हणे ये, दोन हात कर माझ्याशीं ! '

'अरे, वायल्याच दिसतोस कीं म्हणजे !' बल्बा उद्‌गारला. 'पण तुझ्या आईचं ऐकू नकोस बरं तूं. या बायका अशाच. पण तुला असंच नाहीं ना राहायचं नाजुक नार जन्मभर ? मांडीखालीं घोडं नि सभोंवार मोकळं रान–वस्स, असलंच आयुष्य जगायचं आहे तुला ! या तलवारीकडेच पाहा तूं–तीच तुझी आई ! नि तुझ्या त्या पाठशाळेनें आणि भाराभर पुस्तकांनीं जें काय भरलं आहे ना तुझ्या डोक्यांत तो सारा मूर्खपणा,पै किंमतीचा.' एक जोरकस शिवी हांसडून बल्बा म्हणाला. 'पण आतां तुम्हांला झॅपोरोझीला पाठविणंच वरं मला वाटतं. तुम्हांला जें हवं आहे तें सारं शिक्षण तिथंच मिळेल. डोस्कं तिथंच होईल तुमचं तयार !'

'म्हणजे इथं नाहीं का राहायचीं माझीं पोरं?' डोळ्यांत पाणी येऊन त्यांच्या वृद्ध मातेनें विचारलें. 'घरीं येऊन चार दिवस गंमत पण नाहीं करतां यायची बापड्यांना. आपल्या घरादाराची नीट ओळख करून घ्यायला देखील स्वस्थपणा नाहीं त्यांना. नि मी तरी त्यांना मनमुराद, डोळे भरून बघण्याचा आनंद कसा लुटणार?'

'तुझं रडगाणं राहूं दे, म्हातारे ! कोसॅक वीर बायकांच्या संगतींत नाहीं आपलं जिणं घालवीत. तुला हवं असेल कोंबडीसारखं पिलं पंखाखालीं घेऊन बसायला. पण जा, घरांत जा आतां नि जेवण कर तयार. पण आम्हांला तुझं तें गोडधोड नको आहे हं—एक आख्खा बकरा, मेंढा हवा आहे आम्हांला. आणि सपाटून व्होड्का, अगदीं शुद्ध व्होड्का, चवदार चमकदार, धारदार जळजळीत व्होड्का.'

बल्बा मग त्या दोघां मुलांना घेऊन आंतील सुसज्ज दिवाणखान्यांत गेला. दिवाणखाना त्या काळच्या पद्धतीला धरूनच आज सजवला होता. त्या सजावटींचीं वर्णनें युक्रेनियन वृद्ध शाहिरांच्या वीरगाथांतच आतां पहावयास मिळतात. सभोंवारच्या मातीच्याच पण नीट सारवलेल्या भिंतीवर

तलवारी, बंदुका, दारूचीं तोस्तानें, घोड्यांवरील मढवलेलीं जीनें, पायबंद वगैरे लटकविलेलीं होतीं आंतल्या खिडक्या लहान नि दारें भक्कम. भिंतीं-वरील फळ्यांवर मद्यपानासाठीं वेगळ्या वेगळ्या आकाराचीं कांचपात्रें ठेवलीं होतीं. दिवाणखान्याच्या भिंतीला लागून भक्कम लांकडी बांक, टेबल नि भिंतींत बांधलेली शेगडी; हीं सारीं परिचित दृश्यें ते दोघे तरुण आज परत परत पहात होते.

आपल्या लेकांच्या आगमनानिमित्त बल्वानें आपल्या लष्करी संवगड्यांना पाचारण केलें होतें. सर्वप्रथम त्याचा दोस्त कॅप्टन टोव्हकॅच आंत आला· तो येतांच बल्बा आपल्या दोन्ही मुलांची ओळख करून देत म्हणाला, 'बघा कसे तगडेजवान आहेत ते! मी त्यांना आतां सेचमधेंच घालणार आहें.' त्याच्या या उद्‌गारांवर जमलेल्या साऱ्यांनीं त्याचें नि त्याच्या त्या उमद्या छोकऱ्यांचें अभिनंदन केलें. झॅपोरेशिअन सेच हें नव्या जवानासाठीं योग्य ठिकाण' असेंच सारेजण म्हणाले.

'बरं तर, दोस्त हो! आतां साऱ्यांनीं आपल्या सोयीप्रमाणें आसनस्थ व्हावें नि मुलांनो, आतां प्रथम होडका घेऊं या आपण,' बल्बा म्हणाला. 'देवाची कृपादृष्टि असू दे आपल्यावर! आणि आतां हा तुझ्यासाठीं ओस्टॅप. नि हा तुझ्यासाठीं अँड्रे देव तुमची तलवार सदा विजयी करो नि तुमच्या साऱ्या शत्रूंना त्या तार्तार, तुर्क, पोल्स नि इतर साऱ्या क़ाफिरांना, तुम्ही धूळ चारा. हं, आतां झोंका आपले प्याले–आहे ना चांगली जळजळीत? अरे, तुमचे ते लॅटिन लोक–अगदीं बेअक्कल, त्यांना व्होड्‌का नव्हती माहीत. नि तुझा तो लॅटिन कवि, कोण रे? कारण मी कांहीं पंडित नाहीं तुमच्यासारखा. नाहीं खराच कोण होरेस नाहीं का तो?'

'आमचे काका म्हणजे महा मिस्किल! सारं माहीत असतं त्यांना, पण ढोंग मात्र अडाण्याचं,' मोठा मुलगा ओस्टॅप आपल्याशींच पुटपुटला.

'मला वाटतं तुमच्या गुरुजींनीं तुम्हांला होडक्याचा थेंब देखील नसेल चाखवला,' टारास पुढें म्हणाला, 'आणि खरं सांगा हं पोरांनो, छडीनं चांगलं फोडून काढलं कीं नाहीं त्यांनीं कधीं तुम्हांला? नि कधीं जास्ती शहाणपणा दाखवला असतां चाबकानं तुमची चामडी पण लोळवली असेल नाहीं?'

'पण झाल्या गेल्याशीं करायचं आहे काय आतां ! ' ओस्टॅप शांतपणें उद्‌गारला, ' जें झालं, तें संपलं.'

' पण आतां कोणी अंगाला हात तर लावा ! ' अँड्रे म्हणाला ' नि कोणी तार्तार नुसता दिसूं दे मला, कीं त्याला दाखवलंच कोसॅक तलवारीचं पाणी ! '

' शावास बच्चा, शावास ! आणि आतां आलीच आहे ती वेळ. तर मी पण येणार तुमच्याबरोबर ! होय, देवाशपथ ! नि काय म्हणून मागं राहायचं मी ? येरे माझ्या वैला करूं, कीं गुरं वळीत बसूं ? का घुंगट घेऊं या म्हातारीचं ? कोसॅक आहें मी. तसलं कांहीं नाही माझ्या हातून व्हायचं ! ' म्हाताऱ्या बल्बाचा पारा आतां आस्ते आस्ते चढत होता– बसल्या जागेवरून उठून तो अगदीं ताठ उभा राहिला आणि आपला पाय त्यानें दणकन् आपटला. ' उद्यांच निघायचं आपण ! दिवसगत कशाला उगीच ? इथं का कोणी गनीम भेटणार आपल्याला ? आहे काय या झोंपड्यांत नि वाडकुलांत ? नि हीं, हीं, भांडीं पेले ? करायचीं काय आम्हांला हीं ? ' असें गुरगुरत त्यानें टेबलावरचीं तीं सारीं मद्यपात्रें जमिनीवर फेंकून त्यांचा चुराडा केला.

म्हातारीला नवरोजींची ही तऱ्हा चांगली परिचित होती. कांहीं उलट बोलण्याची तिची छातीच नव्हती. करुण दृष्टीनें हें सारें ती पाहात स्वस्थ बसली होती. पण तिचीं तीं वछडीं लौकरच तिच्यापासून दूर होणार हें तिनें ऐकतांच तिला आपले अश्रु आवरेनात. त्या दीर्घ विरहाच्या कल्पनेनें, त्या मूक निराशेनें अत्यंत व्याकुळ होऊन ती मूक रुदन करूं लागली. तिच्या करुण नेत्रांत उमटलेलीं ती थरथरती दारुण निराशा, तिचे ते वट्ट दाबून धरलेले विवर्ण ओठ– कोण करणार त्याचें यथार्थ वर्णन !

बल्बा म्हणजे कोण हट्टवादी माणूस ! पंधराव्या शतकांत टोळधाडी पडून बेचिराख झालेल्या मोगली दक्षिण रशियांत चिवटपणें परत घरें-दारें बांधणाऱ्या भटक्या टोळ्यांचाच तो वंशज. चोहोंकडून संकटांनीं वेढलेल्या या प्रदेशांत हे स्लाव्होनिक वंशाचे लोक धगधगत्या वीरश्रीनें, ईर्ष्येनें नि निधड्या छातीनें या भागांत चहूंकडे फैलावले. दरीखोरीं, मैदानें, नदीकांठ सारीं त्यांनीं व्यापून टाकलीं. 'जिकडे पाहाल तिकडे आम्ही मर्द कोसॅकच भरून उरलेले तुम्हांला दिसूं.' असेंच

उत्तर त्यांनीं सुलतानाला दिलें होतें. आत्यंतिक दुर्दैवाच्या घणाघाताखालीं त्यांच्या हृदयांतील अग्निस्फुल्लिग बाहेर उफाळून उठले होते आणि आगठीच्या खड्याएवढालीं असंख्य लहान राज्यें पार वितळून जाऊन सर्वांना समान अशा संकटांच्या रज्जूंनीं बांधलेलें असें कोसॅक कुरेन प्रस्थापित झालें होतें. आणि याच वीर जमातींनीं त्या काळीं सारें युरोप खंड शत्रूंच्या टोळधाडीं–पासून सुरक्षित राखलें होतें. कोसॅक जमातींचा हा प्रदेश म्हणजे केवळ वीरांचाच देश होता. प्रत्येक वसाहत म्हणजे एक सदा सज्ज असा सेनाविभागच होता. केवळ चार आठ दिवसांच्या दवंडीबरोबर प्रत्येक कोसॅक वीर शस्त्रसज्ज होऊन नि आपल्या घोड्यावर स्वार होऊन वस्तीबाहेर पडे, नि मोहीम संपतांच आपल्या वस्तीवर परत येऊन शिस्तीनें दृढबद्ध असे हे वीर आपआपलें स्वतंत्र जीवन परत जगूं लागत. यांची वृत्ति सदा धसमुसळी आणि आडदांड. खाण्यापिण्यांत नि खेळांतदेखील हीच आडदांड झोंड वृत्ति. दरबारचें निमंत्रण आलें कीं पडला घराबाहेर. अशावेळीं चौकांत उभें राहून नुसती आरोळी देण्याची खोटी कीं हवे तेवढे भालाईत नि तलवारबहाद्दर देशाच्या नि कोसॅककुळीच्या इज्जतीसाठीं कटिबद्ध होऊन गांवाबाहेर पडत रशियनांची ही खास वीरवृत्ति, हें क्षात्रतेज असें उत्कट, भव्य नि मनस्वी. असेंच होतें.

तारास तर याच जातींतला मुरब्बी वृद्ध लढवय्या. जिभेचाहि फटकळ नि बलदंड अशी ही मूर्ति. सभोंवार चाललेलें पोलिश रिवाजांचें अनुकरण त्याला नापसंत होतें. स्वतःला तो कोसॅक वृत्तीचा समर्थ रक्षक असेंच समजे नि त्या बाटग्यांवर तो आवेशानें तुटून पडे. अन्यायाविरुद्ध तो सदा खडा असे. कोसॅक वृद्धांचा अवमान, स्वधर्माची निंदा नि मुसलमान यांच्याविरुद्ध तलवार उपसणें हें सदा न्याय्य असेंच तो मानी.

आज देखील आपण आतां लौकरच आपल्या जवान छोकऱ्यांना घेऊन सेचवर कसें जाऊं नि त्यांची आपल्या वृद्ध वीर सवंगड्यांशीं कशी ओळख करून देऊं नि सांगूं–पहा माझी ही जवानांची जोडी–आणि त्यांचा युद्ध–शास्त्रांतील पहिला श्रीगणेशा आपण किती अभिमानानें पाहूं, याच विचारांत तो आतां गुंगला होता. आपल्या मुलांचें तें सतेज नि परिपुष्ट यौवन पाहूनच त्याची वीरवृत्ति उचंबळली होती नि त्यांच्यासमवेत जाण्याचा

निश्चय त्यानें उतावीळपणें ठरवूनहि टाकला होता. मुलांची संपूर्ण तयारी करण्यासाठीं घोड्यांची निवड, त्यांच्यावरील सामानाची निवड नि हत्यारां-पात्यारांचीहि निवड करण्यासाठीं त्याची आतां धांवपळ सुरू झाली. सारें कांहीं मनासारखें होईपर्यंत या धांवपळीनें तोहि थकून गेला. आणि आतां रात्रहि बरीच झाली असल्यानें तो आपल्या पोरांना म्हणाला :

'हं, चला रे पोरांहो आतां झोपायला. उद्यां सकाळीं देव काय बुद्धि देईल तसं करायचें. हें बघ म्हातारे, आमच्या अंथरुणांची नको तुला चिंता, आम्हीं झोपूं बाहेर उघड्यावर.'

रात्रीचें साम्राज्य आतां चहूंकडे पसरलें होतें. बल्बानें एक लोकरी वाकळ आंगणांत टाकली नि सभोंवार गार वारा घोंघावत असल्यानें एक केसाळ कोट अंगावर घेऊन तो त्यावर आडवा झाला नि लगेच घोरूंहि लागला. त्याचेंच अनुकरण मग इतर सर्वांनींहि केल्यामुळें आंगणाच्या चहूं बाजूंनीं घोरण्याचे विविध सूर लयबद्ध असे घुमूं लागले.

एकट्या त्या वृद्ध मातेला मात्र कांहीं केल्या झोप येत नव्हती. शेजारीं शेजारीं झोंपलेल्या आपल्या दोन्ही मुलांच्या मस्तकांवरून हात फिरवीत नि त्यांच्या मऊ मऊ पण विस्कळित केसांवरून ती मूकपणें अश्रु गाळीत होती. हृदयांतील साऱ्या मृदु भावना, नव्हे तिचें सारें हृदयच तिच्या नेत्रांत आतां सांठविलें होतें. नि अनिमिष नेत्रांनीं ती आपल्या पोटच्या गोळ्यांकडे पाहात होती तरी तिची तृप्ति अशी होतच नव्हती. आपल्या जीवनांतील सारसर्वस्व ओतून तिनें त्यांना लहानाचें मोठें केलें होतें. पण आतां त्यांचें हें दर्शन केवळ क्षणदर्शनच ठरलें होतें ! 'बाळांनो ! माझ्या लाडक्या पिलांनो ! काय आहे तुमच्या भविष्यांत ? कोणतं अदृष्ट वाट बघतं आहे तुमची ?' ती सुस्कारली. एके काळीं सुंदर असलेल्या तिच्या मुखावर आतां अश्रूंची अविरत धार झरत होती. तिची स्थिति अतिशय करुणास्पद अशीच होती. पण तत्कालीन साऱ्यांच प्रांतांचें तें भागधेय होतें. तिच्या त्या यौवनांतल्या जादुगारानें–तिच्या तरुण पतीनें–मोठ्या कठोरपणें तिची संगत सोडून आपले वीर संवगडी नि तलवार यांचा सहवास अधिक गोड मानला होता.

3332

वर्षावर्षांत त्यांची गांठभेट देखील होत नसे. एके काळचें तिचें रसरशीत शरीर अकालींच शुष्क होत गेलें. नि हृदयांतील साऱ्या कोमल नि प्रेमळ भावना मातृप्रेमांतच एकवटल्या गेल्या. अतीव हळुवारपणें तिनें त्यांच्यावर मायापांखर घातली होती. पण आतां तिचीं हीं पिलें तिच्याजवळून दूर केलीं जात होतीं. कदाचित् तीं तिला परत दिसणारहि नाहींत ! कुणीं सांगावें ? अगदीं पहिल्याच चकमकींत तार्तारांच्या तलवारीला त्यांचा बळीहि पडेल, नि ज्यांच्या एका रक्तबिंदूसाठीं आपलें सर्वस्व द्यायला ती तयार होती त्या रक्तमांसावर गिधाडांची धाड पडेल ! मूक हुंदक्यांनीं तिचें सर्वांग हादरत होतें आणि आपल्या पिलांकडे अतृप्त नजरेनें ती पाहातच होती. 'दारूच्या नशेंत केलेला बेत बल्बानें उद्यां बदलला तर ?' तिच्या मनांत राहून राहून येत होतें.

चंद्रबिंब आतां आकाशमध्यावर आलें होतें नि तें सारें अंगण धवळलें होतें. पानांची मंदमंद सळसळ सुरू होऊन प्रभातकालाचें आगमन सुचवूं लागली होती. तरीहि ती वृद्ध माता आपल्या लेकरांच्या उशाशीं बसून त्यांच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहातच होती. तिला थकवा असा वाटत नव्हता नि मनाची तृप्तीहि होत नव्हती. 'रात्र अशीच आणखी लांबली तर !' –तिच्या मनांत येत होतें. पण दुरून तिकडून गवताळ कुरणांवरून घोड्यांचें खणखणीत खिंकाळणें तिच्या कानीं पडलें नि रसरसीत लाल लाल छटा वर वर आकाशभर पसरल्या.

बल्बा जागा होऊन ताडकन उभा राहिला. त्यानें रात्रीं सोडलेले सारे हुकूम त्याच्या मस्तकांत गर्दी करून उठले.

' उठा रे पोरांनो, पुरे झाली झोंप! घोड्यांना पाणी दाखवा. नि ही म्हातारी कुठं गेली ? ए बायो, आटप लवकर. न्याहारीची तयारी कर आमच्या –भरपूर पाहिजे पण सारं, दूरचा आहे प्रवास आमचा.'

म्हातारीची अखेरची आशाहि आतां नष्ट झाली. मोठ्या कष्टानें आंत जाऊन नि डोळ्यांतून पाणी गळत असतांच तिनें न्याहारीची तयारी केली. बाहेर बल्बाचें चौफेर हुकूम सोडणें चाललें होतें. कांहीं गोष्टी तो स्वतः जातीनें करीत होता. काल-परवांच्या कॉलेजकुमारांचें कोसॅक वीरांत आतां संपूर्ण रूपांतर होत होतें. त्या ऐन जवानींतल्या रसरशीत युवकांना तो

तो कोसॅक-परिवेष अतिशय शोभून दिसत होता. त्यांच्याकडे पाहात असलेल्या त्यांच्या मातेच्या हृदयांत हर्ष-विषादांच्या संमिश्र छटा उसळत होत्या तिच्या मुखांतून शब्द फुटत नव्हता नि डोळयांत पाणी तरारलें होतें, गरीब बापडी !

'हं, झाली सारी तयारी. आतां, आतां वेळ नका घालवूं रे पोरांनो. अखेरीस बल्बा म्हणाला. 'पण आपल्या ख्रिस्ती पद्धतीप्रमाणें बाहेर पडण्या-पूर्वी एकदां खालीं बसूं या सारे.'

सारेजण खालीं बसले– दाराशीं उभे असलेले नोकरचाकर देखील. 'हं, आतां आपल्या लोकांना आशीर्वाद दे, ए मुलांच्या आई ! ' बल्बा म्हणाला, 'स्वधर्मासाठीं, वाडवडिलांच्या नांवासाठीं त्यांच्या हातून उदंड पराक्रम घडो, अशी प्रार्थना कर देवाची. पण तसं न घडेल तर त्यांची इतकी-सुद्धां निशाणी या पृथ्वीवर न राहूं दे ! जा, आईला नमस्कार करा पोरांनो. आईचा आशीर्वाद हा आपलं सदैव नि सर्वत्र संरक्षण करतो वरं का.'

त्या दुबळ्या मातेनें मग आपल्या लेकरांना एकदां घट्ट मिठी मारली नि स्फुंदत स्फुंदत त्यांच्या गळयांत संरक्षक ताईत बांधला.

'ती देवमाता ...... तुम्हांला सुखी राखो .... नि आपल्या या आईला विसरूं नका वरं बाळांनो ..... खुशाली कळवीत जा मधून ....' तिच्या तोंडून मग अधिक शब्दच फुटेना.

'बरं, निघूं या तर आपण आतां.' बल्बा म्हणाला.

दाराशीं घोडे तयारच होते. बल्बानें आपल्या घोड्यावर झेंप घातली; नि त्याच्या अवजड वजनाखालीं तें जनावरहि जरा दबल्यासारखेंच झालें. त्याच्यामागोमाग त्याचे छोकरे पण आपल्या घोड्यांवर स्वार झाले नि हळूहळू बाहेर पडूं लागले. पण त्यांची वृद्ध माता आवेगानें धांवत पुढें आली नि तिनें धाकट्याच्या गळ्याला मिठी मारण्याचा प्रयत्न केला आणि जवळच्या नोकरचाकरांनीं तिला घरांत नेण्याचा प्रयत्न केला तरी ती–वेडी माया–मोठ्या आवेगानें बाहेर धांवत सुटली कांहीं विलक्षण आवेश तिच्या अंगांत संचरला होता नि तिचें आक्रंदन चालूच होतें. त्या करुण दृश्यानें त्या दोन्ही छोकऱ्यांचेहि डोळे भरून आले. त्यांचा वृद्ध पिताहि हादरल्या-

सारखाच दिसत होता. पण त्यानें आपली नजर मात्र स्थिरपणें समोरच लावली होती.

कांहीं वेळानें त्या दोघां जवानांनीं मागें नजर टाकली. त्यांना परिचित असणारीं सारीं दृश्यें आतां झपाट्यानें मागें पडत होतीं. मनोहर बाल्यांतले ते गोड अविस्मरणीय दिवस, ते खेळ, तो धांगडधिंगा; तीं निसर्गदृश्यें, त्या गोड कोसॅककन्यका, ती आईची वेडी माया–तें निरागस बाल्य त्यांच्या दृष्टिपथांतून आतां कायमचेंच अदृश्य होत होतें. साऱ्या चिरपरिचित वस्तु नि सारीं परिचित माणसें आतां दृष्टीआड झालीं होतीं.

## २

त्या तिघांहि प्रवाशांचा प्रवास अगदीं मुक्यानें चालला होता. वृद्ध टारासच्या मनश्चक्षूंपुढून त्याच्या गत आयुष्यांतील अनेक मनोज्ञ प्रसंग तरळत होते नि मृत सवंगड्यांच्या आठवणीनें त्याचें हृदय जड होत होतें. आतां मुक्कामावर आपल्याला कोण कोण जुने दोस्त भेटतील याचा विचार तो करीत होता. किती गळले असतील आणखी ? त्याच्या नेत्रांत उदास अश्रु तरळले नि त्याचें मस्तक किंचित खालीं वांकलें.

त्याच्या मुलांच्या मनांत कांहीं वेगळेच विचार चालले होते. वयाच्या बाराव्या वर्षी त्या काळच्या रिवाजाप्रमाणें त्यांची रवानगी कीव्हच्या विद्यालयांत झाली होती. त्यांच्या अवखळ हूडवृत्तींना त्या ठिकाणीं थोडी फार शिस्त लावली गेली. मोठा मुलगा ओस्टॅप अनेक वेळां तिथून पळून गेला होता नि त्यासाठीं त्याला आपली पाठ चाबकानें चांगली फोडूनहि घ्यावी लागली होती. पण मग त्याच्या पित्यानें जेव्हां त्याला एका दूरच्या कर्मठ

मठांत कोंबून त्याला भिक्षु करण्याचा दम भरला, तेव्हां स्वारी नीट निवळून आपल्या अभ्यासांत त्यानें प्राविण्य मिळविलें.

त्या काळांतील विद्यालयीन शिक्षण म्हणजे शुष्क पुस्तकी पोपटपंची. व्यवहाराशीं त्यांची संपूर्ण फारकतच झालेली. पण आरोग्यपालनासाठीं मुबलक खेळण्याचीहि उत्तम सोय असल्यानें या कॉलेजकुमारांचीं शरीरें मात्र रसरशीत असत. शारीरिक शिक्षा असल्या तरी त्यांची तमा न बाळगतां त्यांचा आडदांडपणा वाढतच जायचा नि गांवच्या लोकांनाहि त्याचा उपसर्ग पोंचायचाच. ते रस्त्यांतून हिंडूं लागले कीं टोळधाड आल्याचाच भास सर्वांना व्हायचा.

या युवकांचें सारें विश्वच मुळीं अगदीं निराळें. गांवांतले प्रतिष्ठित लोक त्यांना चार पावलें दूर ठेवायचे. कोणत्याहि शारीरिक शिक्षेचें त्यांना भय असें वाटतच नसे. अंगावरच्या चार मलमपट्टया म्हणजे आपल्या शौर्याची निशाणी असेंच बहुसंख्य मानीत. या कठोर शिक्षेनें एक प्रकारचा चिवटपणा, प्राण गेला तरी तुटणार नाहीं ही वृत्ति त्यांच्या अंगीं मुरत असे. ओस्टॅप त्याला अपवाद नव्हताच. कोसॅकवीराची निधडी छाती नि ताठर बेडर वृत्ति त्याच्यांत पुरेपूर होती. मित्राच्या जिवास जीव देण्याची त्याची प्रवृत्ति, वीरवृत्ति, कोणाशीहि सदा दोन हात करण्याची तीव्र आवड; दुसरा कोणताच नाद कीं छंद त्याला भुलवूं शकत नव्हता. मनानें, त्या काळांत शोभण्याइतकाच मृदु, पण आज आपल्या आईच्या अश्रूंनीं त्याचेंहि हृदय कांहींसें उदास जड झालें होतें.

त्याच्या धाकट्या भावाची—अँड्रेची मनोधारणा जरा वेगळी पुस्तकांत त्याचें मन सहजपणें रमे. बुद्धि चपळ नि वृत्ति आनंदी नि हजरजबाबी. यालाहि वीरवृत्तीची, धाडसांची आवड; पण इतर जगाकडेहि त्याचें रसिकपणें लक्ष असे. उमलत्या तारुण्याबरोबरच स्त्रीहि त्याच्या जीवनांत डोकावूं लागली नि त्याची स्वप्नसृष्टि प्रणयरंगांनीं नटूं लागली. पण आपलें हें स्वप्नरंजन त्यानें स्वतःशींच गुप्त राखलें. कारण रणरंगाची चव चाखल्याशिवाय प्रणयाची लज्जत चाखणें हें तत्कालीन कोसॅक वीराचें ब्रीद नव्हतें. तरीहि अँड्रे आपल्या रांगड्या स्नेह्यांना चुकवून स्वप्नरंजन करीत कीव्हच्या

ऐषआरामी विभागांत हिंडत राही. आणि त्याचे अतृप्त नेत्र सारें सौंदर्य न्याहाळीत राहात.

एक दिवस तो असाच त्या श्रीमंत मोहल्यांत इकडे तिकडे पाहात उभा होता. तेवढ्यांत मागून येणाऱ्या एका उमरावाच्या गाडीनें त्याला धक्का देऊन खालीं चिखलांत पाडलें. कोणाच्या तरी नाजूक मंजूळ हास्यलहरी वातावरणांत उधळल्या. त्यानें चमकून वर पाहिलें. समोरच्याच खिडकींत एक अव्याज मनोहर बालिका उभी होती. असलें सौंदर्य त्यानें कधींच पाहिलें नव्हतें. काळे काळे डोळे आणि अंगाच्या हिमगौरवर्णांत उषःप्रभेची तांबूस छटा मिसळलेली. ती बालिका अगदीं मुक्तकंठ अशी हंसत होती नि त्या हंसण्यानें तिच्या त्या डोळे दिपवणाऱ्या सौंदर्याच्या लहरी अधिकच चमचम करीत होत्या. मंत्रमुग्ध झाल्यासारखा नि कांहीसा गोंधळल्यासारखा तिच्याकडे पाहात तो उभा होता. ही सुरसुंदरी कोण? वाड्याबाहेर उभ्या असलेल्या नोकरांजवळ जाऊन त्यानें विचारून पाहिलें. पण त्यांनीं त्याची चेष्टाच केली. पण अखेरीस त्याला समजलें कीं, कोव्हनोच्या वेवोड्ची-मुख्य अधिकाऱ्याची ती कन्या. त्यांचा मुक्काम आज तिथेंच होता.

त्या दिवसानंतर त्या धाडसी कॉलेजकुमारानें तिच्या निकट जाऊन तिची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. आणि त्याच्या सुदैवानें तो सिद्धीसहि गला. त्या दोघांच्या भेटी होऊन एकमेकांची तोंडओळख पक्की झाली. पण त्यानंतर मात्र त्याची ती सुरसुंदरी त्या वाड्यांतून अदृश्य झाली नि एक गलेलठ्ठ कुरूप चेहरा त्या खिडकींत त्याला दिसूं लागला होता. अँड्रेच्या मनांत आतां हेच विचार चालले होते नि त्याची दृष्टि आपल्या घोड्याच्या काळ्या आयाळीवर खिळली होती.

'काय रे ए पोरांनो, असे गप्प कां तुम्हीं?' आपल्या विचारचक्रांतून जागें होत बल्बानें विचारलें. त्यांच्या सभोंवार पुरुषभर उंच अशा हिरव्यागार गवताचा महासागर पसरला होता नि त्यांच्या काळ्या कोसॅक टोप्याच काय त्या वर दिसत होत्या. 'अरे असे बुरशा भटासारखे काय सुतकी चेहरे केले आहेत तुम्हीं? डोक्यांतले सारे विचार टाका झडझडून बाहेर! आपल्या चिलमी पेटवा झटकन नि घोड्यांना मारा टांच.-मारूं द्या त्यांना पांखरागत भरारी!'

सभोंवार अथांग हिरव्यागार गवताळ कुरणाचा महासागर मंदपणें हेलावत होता. रंगीबेरंगी फुलांचा सुंदर फुलोरा बुट्टयांसारखा त्यावर चमकत होता. सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघालेला तो सारा आसमंत कांहीं आगळयाच सौंदर्यानें तळपत होता. अनेक पांखरांचा नि पक्ष्यांचा गोड किलकिलाट तो आसमंत घुमवीत होता. त्या सुंदर प्रदेशाचें वर्णन किती नि कसें करावें !

तीन दिवसांच्या प्रवासानंतर ते आपल्या नियोजित मकाणाच्या परिसरांत यऊन पोहोंचले होते या प्रवासांत अनेक मैलांचा गवताळ सपाट मैदानी प्रदेश त्यांनीं पायांखालीं तुडवला होता. अनंत तारकांनीं खचलेल्या नभोवितानाखालीं त्यांनीं सुखनिद्रा घेतली होती. रानफुलांचा नि गवताचा संमिश्र तिक्तमधुर सुगंध त्यांनीं आपल्या नाकपुडयांत धुंदकारून सांठविला होता. रातकिडयांचा नि रानपांखरांचा संगीत ध्वनि आपल्या कानांत त्यांनीं घुमविला होता. नि सतत क्षितिजापर्यंत सदा विस्तारत असलेला तो निर्वृक्ष, गवताळ भूभाग पाहून त्याची दृष्टि दमली होती. नि नदीनाल्यांच्या थंडगार पाण्यांत आपले घोडे घुसवीत आपलीं शरीरें त्यांनीं निववलीं होती.

ड्नीपर नदीच्या कांठावर येतांच ते सारे घोडेस्वार पायउतार झाले आणि नावेंत बसून तीन तासांच्या प्रवासानंतर ते खोरटिट्सा बेटाच्या किनाऱ्यावर यऊन उतरले. खालीं उतरतांच त्यांनीं परत आपल्या घोडयांचे तंग घट्ट केले नि आपला प्रवास पुढें सुरू केला. त्यांची वाट आतां बाजारपेठेंतून चालली होती. अनेक तऱ्हेचीं लहानमोठीं दुकानें दुतर्फा पसरलीं होतीं. खरेदीविक्रीचा कोलाहल चालला होता. वृद्ध बल्बा आपल्या मिशांवरून हात फिरवीत सरळ चालला होता. हीं सारीं दृश्यें त्याला परिचितच होतीं. वाटेंत भेटणाऱ्या कोसॅकवीरांना रामराम घालीत नि स्वीकारीत तो पुढें चालला होता. त्या मुरब्बी रणझुंजारांचे चेहरे जसे फुललेले दिसत होते. हेंच त्यांचें सेच. सिंहासारख्या शूर नि मानोद्धत वीरांचें निवासस्थान. साऱ्या युक्रेनभर पसरलेला कोसॅक बाणा नि स्वैर स्वातंत्र्य यांची गंगोत्री ती हीच !

बल्बा नि त्याचे वीर अनुयायी आतां मधल्या विस्तीर्ण चौकापाशीं येऊन ठेपले. कोसॅकवीरांच्या सभा याच चौकांत नेहमीं भरत असत. चौकाच्या मध्यभागीं आतां एक जवान उघडाबंब असा आपला अंगरखा दुरुस्त करीत

होता. पलीकडे एक जवान मोठ्या बेभानपणें नाचत गात होता नि वादकांचें कडें त्याच्याभोंवतीं फेर धरीत होतें. 'हं वाजवा, जोरसे वाजवा रे मर्दानो. नि ए फोमा व्होडकाचे प्याले भर भराभर!' तो सारा आसमंत त्या वाद्यध्वनींनीं जसा दुमदुमला होता. त्याहिपलीकडे आणखी कांहीं कोसॅक वेड्यावांकड्या उड्या मारीत बेभानपणें नाचत ओरडत होते. त्या साऱ्यांचे कपडे अस्ताव्यस्त झाले होते नि अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या.

'अरे तो कोट फेंक अंगांतला.' टारास त्याला ओरडून म्हणाला.

'छे रे बाबा,' त्यानें ओरडून उत्तर दिलें. 'हे कपडे विकूनच मला व्होडका घ्यायला पाहिजे ना!'

नाचणारांची गर्दी आतां वाढत होती नि ती पाहून टारासच्या मनांत नाचण्याची ऊर्मि जोर करून उठत होती. आतां येणाऱ्या वृद्ध कोसॅकांच्या जमावांत त्याला अनेक परिचित चेहेरे दिसत होते. त्यांच्या दर्शनानें टारासच्या हृदयांत जुन्या स्मृती उसळून जाग्या होत होत्या. एकमेकांना सलामी देत ते परस्परांची ख्यालीखुशाली विचारीत होते, नसलेल्यांची काय हालहवाल ती विचारीत होते नि अनेकांच्या वीरमरणांची वार्ता ऐकून टारास उदासहि होत होता नि आपल्याशींच पुटपुटत होता, 'हं पण सारे सारे खरेखुरे कोसॅकवीर!'

## ३

सेचवर आल्यापासून बल्बा नि त्याचे मुलगे यांचे दिवस मोठ्या मजेंत चालले होते. सेचमधील कोसॅकवीरांना युद्धशास्त्राचे धडे फावल्या वेळांत गिरवण्यांत कांहींच स्वारस्य वाटत नसे. प्रत्यक्ष रणक्षेत्रावर किंवा लहानसहान धुमश्चक्रींत काय प्रत्यक्ष अनुभवाचें शिक्षण मिळेल तें पुरें, अशीच या साऱ्या वीरांची समजूत होती. नि म्हणूनच फावला वेळ नाचणें,

खेळणें, शिकार, घोड्यावर दौड नि मद्याची बेहोशी यांतच खर्च व्हायचा. साऱ्या भूतकाळाला जणुं धिक्कारीतच कोसॅकवीर या आडदांड बेहोशींत दंग असत. त्यांच्या बेडरवृत्तीचें बीज यांतच असे. सदा उघड्यावर लोळत, बागडत, आरडाओरडा करीत, गप्पा छाटीत हास्यविनोदाच्या कल्लोळांत त्यांचा काळ व्यतीत व्हायचा. घरादाराची कीं पैशाची कसलीच फिकीर वा पर्वा त्यांना वाटायची नाहीं. रांगड्या लोकशाहीचें हें माहेर घर. कोणत्याहि स्त्रीला येथें स्थान म्हणून नसे. या सेचच्या आसपास फिरकण्याची तसें म्हटलें तर छातीच नव्हती कोणत्याहि बाई माणसाची सगळा आडदांड फटिंग कारभार.

या सेचच्या उपनगरांत कांहीं ज्यू, आर्मेनियन नि तार्तार व्यापाऱ्यांची वस्ती होती नि तेच साऱ्या सेचच्या व्यापारी गरजा मोठ्याच धाडसानें पुरवीत. कारण या झॅपोरेशिअन कोसॅकांना सौदा करणें वा ठरवणें माहीतच नसे. खिशांत हात घालून हाताला येतील ते पैसे ते दुकानदारांना देत. पण खिसा रिकामा असला कीं लूटमार करून सामान घेण्यासहि ते मागें पुढें पाहात नसत, सारे कोसॅक धर्मानें ख्रिस्ती नि कडवे. कोणताहि नवागत ख्रिस्ती असला तरच त्याला त्यांच्या गटांत स्थान. हा प्रत्येक गट पूर्णपणें स्वतंत्र नि एका आरामनच्या आधिपत्याखालीं. याच्याच ताब्यांत गटाचा सारा खजिना नि अन्नवस्त्राची कोठी. पण या वेगवेगळ्या गटांची आपसांत हाणामारीहि व्हायची नि मुडदेहि पडायचे त्यांत अनेकांचे. असा हा आडदांड, रानवट, रासवट कोसॅकांचा—जंगली पशूंचाच जमाव म्हणजे त्यांचें हें सेच.

ओस्टॅप नि अँड्रे दोघेहि स्वच्छंद, स्वतंत्र, आडदांड, वातावरणांत लवकरच समरस होऊन गेले. आपल्या गटांतील किंवा इतर कोणत्या गटांतील तरुणांबरोबर ते शिकारीसाठीं बाहेर पडत नि त्या गवताळ कुरणांत मुबलक सांपडणाऱ्या पशूची शिकार करून सेचची अन्नकोठी मांसानें समृद्ध करीत. दोघेहि पटाईत घोडेस्वार नि पट्टीचे निशाणबहाद्दर असल्यानें ते दोघेहि लवकरच आपल्या व इतरहि गटांतल्या तरुण कोसॅकांच्या गळ्यांतील ताईत बनले नि त्या जीवनांत रंगूनहि गेले.

पण वृद्ध बल्बाला मात्र हें आयुष्य पसंत नव्हतें. खऱ्याखुऱ्या रणधुमाळींत शिरून आपल्या बाहूंचा रग शमविण्यासाठीं तो अधीर झाला होता. आणि आपल्या गटाला एकाद्या मोहिमेसाठीं बाहेर कसें काढावें याच एका विचारांत तो सदा गुंग होता. आणि अखेरीस एक दिवस तो उठला नि त्यानें आपल्या प्रमुखाची भेट घेऊन त्याला सरळ प्रश्न केला, 'काय नाईक, अजून नाहीं का वेळ आली आखाड्यांत उतरायची ?'

'पण झुंज घ्यायची कोणाशीं ?' तोंडांतली तंबाखची नळी काढून नि बाजूला थुंकून नाईक म्हणाला.

'कोणाशीं ? ते तार्तार नि तुर्क आहेत कीं !'

'अं हं ! शक्य नाहीं तें.' नाईक शांतपणें म्हणाला.

'कां नाहीं, पण ? '

'सुलतानाला तसं वचन दिलं आहे म्हणून. '

'पण तो अविध नव्हे का ? नि आपल्या धर्माची तर सक्त आज्ञा आहे कीं, साऱ्या काफिरांना कापून काढा म्हणून. '

'पण आपण शपथेनं बांधलेले आहोंत. –अं हं, शक्य नाहीं तें ! '

'नाहीं ? मग मी माझीं दोन पोरं घेऊन आलों कशाला इथं ? त्यांनीं लढाई अशी अजून पाहिली नाहीं–नि तुम्ही म्हणतां तें शक्य नाहीं. मग कोसॅक तरुणांनीं आपलं उसळतं रक्त सांडायचं तरी कुठं ? त्यांनीं काय कुत्र्याच्या मौतीनं कुजत मरायचं ? धर्मासाठीं नाहीं मरायचं; तर जगायचं कशासाठीं ? सांगा, सांगा कशाला जगतों आपण ? तुम्ही मोठे डोकेबाज म्हणूनच निवडलं तुम्हांला नाईक–मग सांगा तर कशासाठीं जगायचं या वीरांनीं ? '

'तरी सुद्धां लढाईची कांहीं शक्यता नाहीं.' थोडा वेळ थांबून मग नाईक. शांतपणें उतरला.

'बरं बरं, जरा थांब तूं सैताना, दाखवतोंच मी तुला तर.' वर उठत बल्बा स्वतःशींच पुटपुटला.

दुसरे दिवशीं मग बल्बानें आपल्या इतर दोस्तांशीं बातचीत केली नि त्यांना सपाटून दारूहि पाजली. थोड्याच वेळांत मग ते बेहोश झालेले कोसॅक मधल्या चौकांत गेले नि तिथें असलेला नगारा त्यांनीं जोरसे बडवला. नगाऱ्याच्या त्या निनादाबरोबर सारे झॅपोरेझी मधमाशांसारखे

घोंघावतच चौकांत जमा होऊं लागले नि मग थोड्याच वेळांत गट नाईक आपला राजदंड घेऊन, न्यायाधिकारी आपला शिक्कामोर्तब घेऊन गटलेखनिक दौतीचें शिंग घेऊन चौकांत हजर झाले. नाईक नि अधिकाऱ्यांनीं आपल्या मस्तकांवरील टोप्या उचलून चौफेर उभ्या असलेल्या साऱ्या कोसॅक वीरांना मोठ्या रुबाबांत अभिवादन केलें.

'कां झाली आहे मंडळी गोळा? काय आहे तुमचा मनोरथ, मित्रांनो?' नाइकानें विचारलें.

पण एकदम झालेल्या ओरड्यामुळें नि हांसडलेल्या शिव्यांमुळें त्याला गप्प बसावें लागलें.

'ठेव, तो राजदंड ठेव आधीं खालीं, सैताना! तूं नको आहेस आम्हांला यापुढें!' कोसॅकांनीं गर्जना केली. पण जमावांतील कांहीं सुज्ञांनीं या बेहोश वीरांना विरोध केला. त्यावरोबर त्या धुंद कोसॅकांनीं त्यांच्यावर हात टाकला नि चहूंकडे एकच दंगल उसळली नि ओरडा शिगेला पोहोंचला.

नाइकानें एकदोनदां बोलण्याचा प्रयत्न केला, पण थोड्याच वेळांत त्याच्या ध्यानांत आलें कीं हा आडदांड नि बेहोश जमाव आपला जीव घ्यायला देखील मागें पुढें पाहाणार नाहीं—मागें असें अनेकवार घडलेंहि होतें—म्हणून त्यानें जमावाला परत एकदां मोठ्या नम्रपणें अभिवादन केलें नि आपल्या हातांतील राजदंड खालीं ठेवून तो झटकन् त्या जमावांत अदृश्य झाला.

'आम्हीहि आपलीं अधिकार-चिन्हें खालीं ठेवावीं असं आपलं मत आहे काय?' इतर अधिकाऱ्यांनींहि लोकांना विचारलें.

'नाहीं, नाहीं!' जमावांतून आरोळी उठली. 'या कोशेव्हॉयलाच—या नाइकाला—हाकलून लावायचं होतं आम्हांला. त्यानं भरल्या आहेत बांगड्या आपल्या हातांत, आमचा नाईक मर्द हवा आम्हांला.'

'कोणाला निवडायचं तर कोशेव्हॉय?'

'कुकुबेंकोला निवडा!' एक गट किंचाळला.

' अं हं, आम्हांला नको तो ! ' दुसऱ्या पक्षानें आरोळी ठोकली. ' छे, अगदींच पोरसवदा तो—ओठावरचं दूधहि नाहीं वाळलं त्याच्या अजून ! '

' मग शिलो होऊं द्या कोशेव्हॉय ! ' एक आवाज आला.

' हे:, फारच चंचल नि धोकेबाजहि आहे तो ! ' जोरदार शिवीसह आरोळी उठली.

' तो कसला कोसॅक—धोकेबाज तार्तारच तो ! कुत्र्याची औलाद शिची ! '

' बोरोडॅटी ? बोरोडॅटीला होऊं द्या नाईक ! '

' नको, आम्हांला नको तो—अक्करमाश्या साला ! '

'अरे, किरडियागाची करा गर्जना.' वल्वा शेजाऱ्याच्या कानांत कुजबुजला;

' किरडियागा ! किरडियागा ! ' जमाव किंचाळला.

तिघांहि उमेदवारांची नांवें आतां चहूंकडून उंच उसळूं लागलीं नि लोकमताचा निर्णय ठरविण्यासाठीं वज्रमुष्टींचाहि उपयोग सर्रास केला जाऊं लागला नि 'किरडियागा विजयी,' असा पुकाराहि लगेच करण्यांत आला.

' आणा, किरडियागाला आणा बोलावून ! '

त्याबरोबर दहाबारा कोसॅक जवान चौकाबाहेर पडले, त्या बिचाऱ्यांना धड नीट चालतांहि येत नव्हतें इतके तर्र झाले होते ते दारू पिऊन.

कांहींसा वृद्ध नि मोठा हुशार असा तो नवा नाईक, जणुं कांहीं बाहेरची कांहीच माहिती आपल्याला नाहीं अशा आविर्भावांत आपल्या कुरेनमधें बसला होता.

' काय पाहिजे रे दोस्तांनो ? ' त्यानें विचारलें.

' चला, तुम्हांला निवडलं आहे कोशेव्हॉय. '

' माफ करा रे, बाबांनो ! ' तो म्हणाला. ' अरे माझी नाहीं तेवढी लायकी. मी कसचा— मला कुठं आहे तेवढं डोस्कं ? दुसरा जास्त लायक नाहीं मिळाला कोणी आपल्या साऱ्या शिपाईगड्यांत ? '

' चला, उठा, आम्ही सांगतों तुम्हांला ते.' झॅपोरेशिअन ओरडले.

दोघां तिघांनीं मग त्याचें बकोटे धरलें नि त्याच्या धडपडीला न जुमानता मोठ्यानें ओरडत, त्याला लाथाबुक्या हाणीत, दादा बाबा करीत नि ' अरे,

अशा का मागं सरतो आहेस? मिळतो आहे तो घे मान,लेकाच्या !' असें ओरडत ते त्याला खेंचीत निघाले. नि याच थाटांत त्यांनीं त्याला चौकांत हजर केलें.

'हं, बोला आतां, दोस्त हो,' त्यांनीं त्या जमावाला आरोळी दिली; 'हा कोसॅक पसंत आहे ना तुम्हांला, आपला कोशेव्हॉय म्हणून? '

'होय, पसंत आहे !' त्या जमावांतून एकच गगनभेदी गर्जना उठली नि तो सारा मैदानी आसमंत ध्वनिप्रतिध्वनींनीं दुमदुमून गेला.

मग एका वृद्ध नाइकानें राजदंड उचलून तो किरडियागाच्या पुढें केला. नि नेहमींच्या रिवाजाप्रमाणें त्यानें तो नाकारला, असें दोनतीनदां केल्यावर मग त्यानें तें अधिकारचिन्ह स्वीकारलें नि पसंतीची एक प्रचंड आरोळी जमावांतून उठली. त्यानंतर मग जमावांतील वयोवृद्ध चार कोसॅक पुढें झाले नि त्यांनीं मूठ मूठ माती किरडियागाच्या मस्तकावर घातली. ती माती तोंडावरून खालीं ओघळत असतांच किरडियागा उठून उभा राहिला नि त्यानें सर्व कोसॅकवीरांचे त्या बहुमानाबद्दल आभार मानले.

झालें ती गोंधळी नि वादळी निवडणूक संपली नि इतर कोणाहिपेक्षां बल्बाला धन्य धन्य वाटलें. माजी नाइकावर त्यानें सूड उगवला होता. नि शिवाय किरडियागा हा त्याचा सदासर्वकाळचा युद्ध-संवगडी. तो सारा जमाव आतां आनंद साजरा करण्यासाठीं दारूच्या दुकानांकडे उधळत उसळत निघाला नि त्यानें दुकानांतला सारा माल आपल्या ताब्यांत घेऊन घशाखालीं रिचवला. दुकानदार जीव घेऊन केव्हांच पळाले होते. ओस्टॅप नि अँड्रे यांना हें दृश्य अपूर्व असें होतें. सारी रात्र ते बेहोश वीर नाचत होते, गात होते, तारस्वरांत वीरगाथा गात होते. जणुं उन्मत्त पिशाचांचाच तो थयथयाट नि दणदणाट ! आणि मग उजाडतां उजाडतां सारेजण अगदीं गळले भाग-लेले असे विश्रांतीसाठीं एकमेकांच्या गळ्यांत गळे घालून एकमेकांच्या अंगावर तसेच मिळालेल्या जागींच कोसळून झोंपीं गेले,

## ४

दुसऱ्या दिवशीं टारास बल्वानें नव्या नाइकाबरोबर बराच वेळ खल नि खलबत केलें नि अखेरीस असें ठरलें कीं, लोकांनीं चौकांत जमा व्हावें–नि त्यांना कसें जमवायचें तें बल्वाला ठाऊकच आहे–नि मग मी कांहींच ठाऊक नसल्यासारखा तेथें उपस्थित होईन.

या मनसुब्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं चौकांतील नगारा दणाणूं लागला. नि सारी कोसॅक जमात निमिषार्धांत चौकांत लोटली. तो तुफान मानवी सागर उत्कंठेनें हेलावत होता. नि कोण . . . केव्हां . . . . कां . . . . कशा–साठीं हा मेळावा ? असे प्रश्नोपप्रश्न अस्फुटपणें चौफेर उसळूं लागले. तर कांहीं भागांतून 'हे कसले नालायक नायक, आमचं शौर्यवीर्य कुजून फुकट जात आहे' असे असंतोषाचे स्वरहि मग उमटूं लागले. आणि मग अखेरीस नवा सेनानायक पुढें झाला नि म्हणाला, 'सद्‌गृहस्थहो, माझ्या झॅपोरेशिअन बांधवहो, मला चार शब्द बोलण्याची परवानगी द्या.'

'बोला झटपट !'

'मला एवढंच सांगायचं आहे तुम्हांला . . . . . पुष्कळांना माहीत असे-लच म्हणा तें–कीं आपल्यांतले बहुसंख्य वीर खूप कर्जबाजारी झाले आहेत. आणि दुसरं असं कीं आपल्यांतले नवे तरणे जवान हे रणधुमाळीशीं पूर्णपणें अपरिचितच आहेत, आणि मी म्हणतों कीं ज्यानें युद्धाची चवहि नाहीं चाखली नि काफिरांना पाणी नाहीं पाजलं, तो झॅपोरेशियन तरी कसला ? '

'छान, छान आहे भाषण ! ' बल्वा पुटपुटला.

'पण म्हणजे तहाच्या शर्ती मोडून शांतताभंग नाहीं करायचा आप-ल्याला. तरी तसं म्हटलं तर हीं आपलीं देवमंदिरं किती दरिद्री–कारण पैसा कुठें आहे आपल्याजवळ ? पण तरीदेखील सुलतानाला दिलेला शब्द नाहीं मोडायचा हं ! म्हणजे काय दोस्तहो, लढाई नाहीं पुकारतां येत आपल्याला. तरीपण माझ्या अल्पबुद्धीला असं वाटतं कीं, आपल्या जवानांनीं ॲनोटोलि-

याच्या किनाऱ्यावर थोडीफार धामधूम उडवायला नाहीं हरकत. काय, तुमचं काय आहे मत ?'

'आम्हां साऱ्यांनाच चला घेऊन नाईक.' चहूंकडून एकच गिल्ला झाला.

'थांवा, थांवा, नीट ऐकून घ्या माझं म्हणणं,' हें भलतंच घडलेलं पाहून नाईक घाबरून म्हणाला.

'बस्स, बस्स !' तो सारा जमाव किंचाळला. 'आतां पाणी नका ओतूं पहिल्यावर वरं.'

'ठीक आहे; मर्जी तुमची. मी तुमच्या हुकुमाचा वंदा. आणि आपलं शास्त्रच सांगतं कीं जनतेचा आवाज म्हणजे परमेश्वरी आवाज. पण मला वाटतं सुलतान ती चांचेगिरी चालूं देणार नाहीं. त्यालाहि आपण तोंड देऊं म्हणा. पण आपली पाठ फिरली कीं तीं तुर्की कुत्रीं आपलं सेच नेतील लुटून. त्यांनाहि मार द्यायला कमी नाहीं करणार आपण. तरी देखील आपल्याजवळ नावा अपुऱ्या आहेत नि दारुगोळाहि नाहीं भरपूर. तरीहि बाहेर पडायला तयार आहे हं मी —कारण साऱ्या लोकांच्या इच्छेचा मीहि वंदा गुलामच आहें.'

तो धूर्त जमातप्रमुख बोलायचा थांवला; नि सारा जमाव जरा वेळ आपला विचार ठरवीत गटागटानें बसला. अखेरीस पण त्याचाच सल्ला अनुसरण्याचें ठरून कांहीं माणसें नदीच्या पैलथडीवर गुप्तपणें ठेवलेल्या आपल्या शस्त्रागाराकडे गेलीं आणि कांहीं मंडळी आपल्या नावांची दुरुस्ती तांतडीनें करण्यासाठीं तिकडे गेली. आणि वृद्ध, तरुण सारेच जण त्या कामाला जुडले. चोहोंकडून आतां ठोकाठोकीचे आवाज उठत होते नि कांहीं ठिकाणीं पेटलेल्या चुलाणावर नावांच्या तळाला लावण्यासाठीं डांबराचे खडे वितळवले जाऊं लागले होते. नदीकांठचा तो सारा आसमंत जणुं जागा होऊन नवचैतन्यानें भरून गेला होता.

याच वेळीं एक मोठी नाव किनाऱ्याकडे येत होती. तिच्यांतले सारे प्रवासी हातवारे करीत जोरजोरानें कांहींतरी सांगत होते, विचारीत होते. पण कांठावर चाललेल्या कामकऱ्यांच्या कोलाहलांत त्यांचा एक शब्दहि कोणाला ऐकूं जात नव्हता.

'काय आणली आहे बातमी ?' नाव किनाऱ्याला लागतांच कोशेव्हायनें विचारलें.

‘ वाईट आहे बातमी ! ’ नावेंतऱ्या एका धिप्पाड कोसॅकनें उत्तर दिलें.

‘ ती काय बाबा ?’

‘ बोला, बोला. एकतों आहोंत आम्ही सारे. ’ हातांतील काम थांबवून सारेजण आतां तिथें गोळा झाले होते.

‘ तुमच्या कानीं आलेलं नाहींसं दिसतं–काय गुडद्या ठोकल्या काय तार्तारांनीं तुमच्या कानांत ? अरे काय अक्रित घडलं आहे तिकडे–तुमचीं देवळ टाकलीं आहेत गहाण त्या ज्यूंकडे नि त्या काफिरांच्या हातांनीं आपली ईस्टर केक आतां विटाळणार बघा.’

‘ खोटं, सारं खोटं सांगतो आहे हा पाजी माणूस ! ’

‘ अहो, एवढ्यानं काय झालं आहे राव ! त्या ज्यू बायका कांचोळ्या शिवताहेत, कांचोळ्या आपल्या धर्मगुरूंच्या शालींच्या. हां, हां, म्हणतां हा, हा, चालला आहे बरं का प्रकार युक्रेनमध्यें. आणि तुम्ही झॅपरोशी बसले आहांत दारूच्या पिंपांत बुडून ! नि तार्तारांनीं असं घाबरवून टाकलं आहे तुम्हांला; कीं तुम्हांला डोळे, कान कांहींच उरलं नाहीं–जगांत काय चाललं आहे, याचा पत्ताहि नाहीं तुम्हांला.’

‘ थांबा, थांबा, ’ कोशेव्हॉय मधेंच ओरडून म्हणाला. आपल्या इतर बांधवांप्रमाणें तो शांतपणें ऐकत उभा होता. झॅपरोझी कधीं उतावळेपणा नाहीं करणार. ‘ थांबा, थांबा, मला सांगा आधीं कीं लेको तुम्ही रे काय करीत होतां ?—गेले तुमचे पितर नरकांत–तुम्ही रे काय करीत होतां ? तलवारी काय गहाण टाकल्या होत्या तुम्हीं ? तुम्ही कसा चालूं दिलांत हा धिंगाणा ?’

‘ कसा चालूं दिला ? पन्नास हजार पोल्स विरुद्ध काय करणार आम्ही ? नि त्यांतच लपवून कशाला ठेवायचं म्हणा ! – आमच्यांतलींच कांहीं कुत्रीं फितूर झाल्यावर ?’

‘ तुमचे प्रमुख नि सेनानी कुठं होते ? ’

‘ भयंकर– महाभयंकर मरण आलं त्यांच्या वांट्याला ! ’

कांहीं क्षणच, कांहींशी भीषण अशी शांतता चौफेर पसरली नि मग तो विराट पुरुष जसा एकमुखानेंच बोलूं लागला.

‘ नाहीं, नाहीं, आम्ही नाहीं सहन करणार हें ! ’ जमावाचा आवाज वर

उसळला. ‘ शिकवा, त्या बदमाष ज्यूंना चांगला धडा शिकवा–साऱ्या साऱ्या काफिरांना नीपरमधें बुडवून टाका ! ’

कोणीतरी उच्चारलेल्या या शब्दांनीं साऱ्या जमावाच्या मनांतून जसा विजेचा कल्लोळ उसळला, नि सारा जमाव उपनगरांतील साऱ्या ज्यूंना कंठस्नान घालण्यासाठी पिसाटासारखा तिकडे धांवत सुटला.

ते पिसाट येतांना पाहून ते भेदरट ज्यू वाट दिसेल तिकडे जाऊन लपून बसले. पण बिळांत लपलेल्या या साऱ्या उंदरांना त्या जमावानें अखेरीस शोधून काढलेंच.

‘ महाराज ! महाराज ! ’ एक उंच काठीसारखा ज्यू हात जोडून म्हणाला, ‘ महाराज, एक शब्द ऐकून घ्या माझा. फार महत्वाचं आहे माझं म्हणणं–अत्यंत अत्यंतच महत्त्वाचं आहे तें ! ’

‘ बरं, बरं, बोलूं द्या त्याला, ’ बल्बा म्हणाला. विरोधी पक्षाचें म्हणणें ऐकून घ्यायला तो नेहमींच तयार असे.

‘ महाराज, आपली थोरवी काय वर्णावी ! ’ तो ज्यू उद्गारला. त्याचें सर्वांग भीतीनें थरथरत होतें. ‘ तुमचं वाईट आम्ही कसं चिंतू ? बदमाष आम्ही नव्हत–ज्यू नव्हेतच ते. आम्ही थुंकतों त्यांच्यावर. होय ना, माझ्या बंधूनों ? ’ इतर ज्यूंनीं माना हलवल्या. ‘ आम्ही तुमचे बांधवच आहों, झॅपरोझी हो ! ’

‘ तुम्ही, तुम्ही आमचे बांधव–अशक्य, अशक्य आहे तें ! ’ जमावांतून कोणीतरी ओरडला. ‘ या साऱ्या काफरांना बुडवून टाका पाण्यांत नदीच्या. ’

झालें. हा जणुं हुकूमच सुटला आणि अनेक लोक पुढें घुसून त्यांनीं त्या ज्यूंना नदींत भिरकवण्यास प्रारंभ केला. नि कर्णकटु किंकाळ्यांनीं तो नदीघाट भरून गेला. त्या हाडकुळ्या ज्यूनें धांवून बल्बाचे पाय घट्ट धरले. ‘ महाराज, महाराज–तुमचा भाऊ, तो वीरपुंगव डोरेश ! तुर्कांच्या हातून खंडणी भरून मी सोडवलं होतं त्याला. ’

‘ तुला, तुला माहीत होता तो ?–नांव काय तुझं ? ’

‘ यांकेल. ’

‘ बरं, बरं, ’ बल्बा म्हणाला. नि थोडा विचार करून तो लोकांना

म्हणाला. ' अरे, यांना आपण फांशी केव्हांहि देऊं–पण आज याला माझ्या ताब्यांत द्या.'

असें म्हणून टारासनें त्याला आपल्या वारदानी गाड्यांजवळ नेलें नि तो म्हणाला, 'जा गाडीखालीं जाऊन पड स्वस्थ नि हालूं नको इथून.' नि मग त्यानें जवळ उभ्या असलेल्या आपल्या कोसॅकांना त्याच्यावर नीट लक्ष ठेवण्यासहि सांगितलें.

एवढें सांगून तो स्वत: मग मध्य चौकाकडे निघाला. तो तेथें येईपर्यंत चौकांत खूपच गर्दी लोटली होती. साऱ्या जमातीला आतां मोहिमेचें स्वरूप समजलें होतें नि त्यासाठीं गाड्याघोड्यांची जमवाजमव नि तयारी करणें अगत्याचें होतें. वृद्ध नि तरुण सारेच जण आतां मोहिमेवर जाण्यासाठीं उत्सुक झाले होते आणि लहानमोठ्या जमावांत प्रमुखांच्या मतें तिचें स्वरूप निश्चित केलें जात होतें. साऱ्या नेत्यांनीं एकमतानें निर्णय केला होता कीं, आपली सारी सेना तडक पोलंडमध्यें घुसवावयाची, प्रत्येक शहर नि खेडें लुटून उध्वस्त करून नि चौफेर आगडोंब उसळून देऊन आपल्या धर्माच्या नि अखिल कोसॅकांच्या अपमानाचा सणसणीत बदला घ्यायचा नि आपल्या नांवाची जरब चहूंकडे बसवायची. यासाठीं सारेजण आतां कमरा कशीत होते नि शस्त्रसज्ज होत होते. त्यांचा नेता आतां निरंकुश सत्ता धारण करीत होता: त्याचे ते दांडगे, बेबंद नि हेकट अनुयायी आतां शिस्तबद्ध सैनिक बनत होते नि त्यांचें एकसंध अभंग असें सैन्यदल तयार होत होतें.

' नीट बारकाईनं सारी तयारी करा, बरं का मर्दांनो,' जमातप्रमुख आतां बोलत होता. ' सारं सामान सुटसुटीत असूं दे. प्रत्येकानं दोन घोडे घ्यावेत बरोबर. गाड्यांसाठीं दोनशें जोड्या हव्यात बैलांच्या. सेनेची शिस्त कडकपणें पाळा. दारूला स्पर्शहि करायचा नाहीं. जर कोणी प्यालेला आढळला मला तर, त्याला कुत्र्याच्या मौतीनं मरावं लागेल, ध्यानांत ठेवा. माझ्या तरुण सैनिकांनीं सदा अनुभव वृद्धांच्या आज्ञेंत राहावं नि शरीर कुठें छिन्नभिन्न झालं तर त्याची तमा बाळगूं नये. शूरांना तें शोभत नाहीं. बस्स एवढंच. तर लागा आतां कामाला नि सारं नीट नि लक्षपूर्वक असंच करा काम. '

चहूंकडे आतां कामाची एकच गर्दी उसळली. कोणालाहि उसंत अशी मिळत नव्हती. गाड्यांतून धान्याचीं पोतीं भरलीं जात होतीं. हत्यारांचा सांठा नि दारुगोळा सांठविला जात होता. घोड्यांचें खिंकाळणें नि बलिवर्दांचें हंबरणें निशाणबाजीच्या खणखणाटांत मिसळत होतें. बारदानी गाड्यांची कुरकुर आतां चालू झाली होती नि सारें कोसॅक घोडदळ कूच करूं लागलें होतें. प्रार्थनामंदिराशीं येतांच धर्मगुरूनें सर्वांना आशीर्वाद दिला नि त्यांच्या अंगांवर पुण्यजलाचें सिंचन केलें.

गांवाबाहेर येतांच साऱ्या झॅपरोझी वीरांनीं माना मागें फिरवल्या.

'नमस्ते, प्रिय माते, नमस्ते!' साऱ्यांचा एकमुखी आवाज उमटला. 'परमेश्वर तुला सुखी राखो!'

उपनगरांतून जातांना टारासनें पाहिलें कीं तो ज्यू यांकेल आज ऐटींत छोटेंसें दुकान थाटून बसला होता नि सैन्याला लागणारें सारें सामान तो शिपायांना विकीत होता. 'काय सैतान आहे लेकाचा' त्याच्या मनांत आलें. नि जवळ जाऊन तो म्हणाला, 'काय रे इथं कशाला बसला आहेस? काय फुकट मरायचं आहे काय तुला?'

'महाराज, महाराज, कृपा करून बोलूं नका,' तो ज्यू टारासजवळ येऊन गुपित सांगत असल्यासारखा हळूच त्याला म्हणाला. 'माझीहि गाडी आहे या गाड्यांत. सेनेला लागणारें खूप सामान भरलं आहें मीं तिच्यांत. नि कसं, अगदीं स्वस्त स्वस्त असंच विकणार आहें मी तें –अगदीं देवाशपथ!'

टारासनें आपले खांदे उडवले. 'या बेट्यांना सदान्कदा व्यापार दिसतो.' त्याच्या मनांत आलें; नि त्यानें घोड्याला टांच मारली.

## ५

झॅपरोझी कोसॅकांची टोळधाड आपल्या मुलुखांत घुसली ही वार्ता वणव्या सारखी चहूंकडे पसरत होती आणि जीवित नि वित्त बचावण्यासाठीं सर-हद्दीवरील खेड्यापाड्यांची एकच धांवपळ चालली होती. या कोसॅकांचें शौर्यवीर्य नि त्याचबरोबर क्रौर्यहि या दुर्दैवी लोकांच्या पूर्ण परिचयाचें असल्यानें प्रत्येक जण वाट फुटेल तिकडे पळत सुटला होता. कांहीं दूरवर आंत घुसत होते, तर कांहीं नजीकच्या सेनारक्षित नगरांत आश्रयासाठीं चालले होते. तर कांहीं छातींत जोर धरून नि हातांतील नांगर टाकून संघ-टितपणें या टोळधाडीपासून आपलें रक्षण करण्यासाठीं कटिबद्ध झाले होते. पण कोसॅकांच्या रेट्यापुढें हतबल ठरून त्यांना आपल्या प्राणांचें बलिदान करावें लागत होतें.

हे झॅपरोझी कोसॅक आपल्या स्वच्छंद गतीनें मुलूख आक्रमीत होते, वाटें-तील गांवांत लुटालूट करीत होते, अनेक निरपराध्यांना क्रूरपणें कंठस्थान घालीत होते नि गांवांना आगी लावून देऊन सारा मुलूख बेचिराख करून टाकीत होते. हें सारें कृत्य अत्यंत क्रूर नि भीषण होतें. त्याचें केवळ वर्णन देखील आपल्या अंगावर कांटाच उभा करील. पण त्या काळच्या त्या रानटी अंधाऱ्या युगांत हा क्रूर अघोर प्रकार चहूंकडेच चालत असे. मानवी देह निर्दयपणें छिन्नविछिन्न करणें नि अनेक गोरगरिबांचीं घरेंदारें निष्ठुरपणें लुटून त्यांची राखरांगोळी करणें याचें कोणालाच कांहीं वाटत नसे. तंबाखूच्या चिलमीसाठीं विस्तव तयार करण्याइतकेंच भव्य इमारती बेचिराख करणें त्यांना सोपें नि सोज्वळ वाटत असे.

कोसॅक सेनेची वाटचाल अशी चालली होती. सैन्यांतील तरुण जवान युद्धकलेचे धडे तरवारींच्या खणखणाटांत गिरवीत होते. टारास बल्बाचे दोघे जवान मुलगेहि या बाबतींत आघाडीवर होते. अल्प कालावधींत आपल्या पोरांनीं नांवलौकिक कमावल्याचें पाहून त्याचें वीरहृदय अभिमानानें भरून येत होतें. दांडग्या ओस्टॅपचें एकवेळ एवढें विशेष नव्हतें, पण त्याला नाजूक

नि जनानी वाटत असलेल्या अँड्रेचेंहि शौर्य नि शस्त्रांच्या खणाखणींत घुसण्याची उत्सुकता नि आवेश पाहून त्याला विशेष आनंद होत होता नि तो मग आपल्याशींच म्हणत होता, 'ओस्टॅपइतका कांहीं नाहीं, पण आहे, झुंजार आहे पोरगा !'

झॅपरोझी वीरांनीं आतां डबनो शहराच्या रोखानें आपली आघाडी चालविली होती. त्या शहरांत आपल्याला खूप लूट मिळेल अशी आशा त्यांना वाटत होती. कारण तें शहर अत्यंत संपन्न नि समृद्ध असेंच होतें. त्यांनीं एका दिवसांतच तो पल्ला गांठला नि शहराच्या प्रमुख दरवाजावर तडक धडक दिली. पण शहराभोंवतालची तटबंदी चांगलीच भक्कम होती नि शहरच्या लोकांनींहि शहर प्राणपणानें लढविण्याची तयारी केली होती. प्रत्येक पेठ पेठ नि घर न् घर एखाद्या गढीसारखें अखेरपर्यंत झुंजविण्याच्या निर्धारानें ते तटावर उभे होते. आणि म्हणून झॅपरोझी घोडदळानें धडक मारतांच त्यांनीं बंदुकीच्या गोळ्यांचा त्यांच्यावर पाऊस पाडला. गांवांतील स्त्रियांनींदेखील तटावरून कढत पाण्याचा नि वाळूचा वर्षाव करून गनिमांना बेजार केलें. असल्या तटबंदी शहरांशीं नि गढीकिल्ल्यांशीं वेढा घालून झुंजण्याची झॅपरोझी वीरांना संवय नव्हती नि आवडहि नव्हती. उघड्या मैदानावर सरळसोट दोन हात करण्याचा त्यांचा स्वभाव नि आवड.

डबनो शहराचें तें स्वागत पाहून कोशेव्हॉयनें—कोसॅक प्रमुखानें, आपल्या लोकांना मागें फिरण्याचा हुकुम केला. 'माझ्या बांधवांनो, आपण त्या काफिरांसारखें या बदमाषांना आंतल्याआंत उपाशी मारूं आतां !'

आपल्या नायकाच्या या आदेशानुसार सैन्य मागें फिरलें नि त्यांनीं गांवाभोंवती भक्कम वेढा दिला. गाड्यांची दुहेरी रांग तटाभोंवतीं उभी झाली नि चौक्यापहारे ठिकठिकाणीं बसले. आतां दुसरा कांहीं उद्योग नसल्यानें आसपासच्या साऱ्या प्रदेशांवर शिपायांची संक्रांत वळली नि विध्वंसाचा नंगा नाच चहूंकडे चालू झाला. शेतांतील उभ्या पिकांची बेमुर्वत नासाडी होऊं लागली, गवताच्या गंजी पेटवल्या जाऊं लागल्या नि डोळ्यासमोर होत असलेला हा सर्वनाश पाहून शहरांतील लोक तळमळूं लागले.

पण हें असलें आयुष्य तरुण कोसॅकांना पसंत पडेना नि त्यांनीं गनिमाच्या मुख्य सैन्याशीं सामना देण्याची तयारी चालविली. ओस्टॅप आपल्या पूर्व

तयारीच्या कामांत पूर्णपणें गढून गेला होता. पण अँड्रेचें मन मात्र, कां कोण जाणे, राहून राहून उदास, जड होत होतें. त्याच्या सभोंवारचें सारें सैनिकी जग सायंकाळीं जेवण उरकून विश्रांतीसाठीं आडवें होत होतें. पण अँड्रेला मात्र झोंप येत नव्हती. सभोंवारचा सारा आसमंत निद्राधीन होत असतां नि वर अनंत आकाशांत अनंत तारकांची मंद कुजबूज चालू झाली असतां, जुलै महिन्यांतील तें प्रसन्न शांत सौंदर्य अँड्रेला आकृष्ट करीत होतें. वृक्ष-पर्णांची मंद सळसळ, मधूनच कानीं येणारें घोड्यांचें खिंकाळणें, रात्र-पहारेकऱ्यांच्या हुश्शारच्या आरोळ्या नि कोसॅक वीरांचे घोरण्याचे तार मंद्र स्वर त्याच्या कानीं पडत होते. पण त्याचें हृदय या साऱ्यापासून त्याला दूर खेंचीत होतें.

अँड्रे आतां आपल्या सामानाच्या गाड्यांच्या दुहेरी रांगांतून भटकत होता. चौकी-पहाऱ्यावरील पेटलेल्या शेकोट्या आतां विझत आल्या होत्या नि कांहीं ठिकाणीं तर पहारेकरी डाराडूर झोंपींहि गेले होते तिकडे पहात त्याच्या मनांत येत होतें, ' कोणा जबरदस्त नि जागरूक शत्रूशीं गांठ नाहीं म्हणून ठीक. नाहीतर ... ' अखेरीस एका गाडीजवळ जाऊन तो वर चढला नि आंत आडवा झाला. पण निद्रादेवी त्याला प्रसन्न होईना नि तो वर पसरलेल्या त्या अनंत नीलाकाशाकडे पाहात राहिला. रात्र मोठी सुंदर नितळ अशी होती नि आकाश गंगेचा फेंसाळलेला, अनंत तारकापुंजांनीं धवळलेला दुग्ध-धवल पट्टा त्याला अतीव मोहक असा दिसत होता. त्याचे डोळे मधूनच मिटत होते. डोळ्यावर विरल धुक्याचें जणू पटल चढत होतें नि वरील तेजाळ नभोवितान अंधुक होत होतें नि दुसऱ्याच क्षणीं तें पटल विरून जाऊन गगनमंडप नितळपणें दिसत होता.

या अशा अवस्थेंतच कोणाचा तरी चेहरा त्याच्या डोळ्यांपुढें तरळला. हें स्वप्न तर नव्हे? त्यानें डोळे नीट उघडले. कोणाचा तरी सुरकुतलेला चेहरा त्याच्या तोंडावर वांकला होता. त्या नेत्रांतील चमक नि गालांचीं वर आलेलीं हाडें पाहून तो कांहींसा चमकला नि त्याचा हात झटकन् हत्याराकडे गेला. ' कोण, कोण आहेस तूं ? ' त्यानें कांहींशा कांपऱ्या स्वरांत विचारलें. ' कोणी भूत पिशाच्च कीं जिवंत माणूस ? बोल, नाहींतर ही गोळी सुटलीच.'

33324
2८८५
१५५५

++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ कोसॅक ! कोसॅक !

त्या पिशाच्चाकृतीनें आपलें बोट ओठांवर ठेवलें नि त्याला गप्प राहण्याची मूक विनवणी केली. त्यानें आपला हात खालीं केला नि त्या आकृतीकडे नीट निरखून पाहिलें. तिच्या त्या काळ्या मुक्तकेशांनीं, नाजूक मानेनें अर्धअनावृत वक्षस्थलानें ती स्त्री असल्याचें त्याला स्पष्टपणें सांगितलें. तो मग अधिकच निरखून पाहूं लागला. तो चेहेरा पूर्वी कुठेंतरी पाहिला आहे असें त्याला वाटूं लागलें. त्यानें अधीरपणें विचारलें 'कोण आहेस तूं ? सांग. कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतं आहे तुला.'

'दोन वर्षांपूर्वी–कीव्हमध्यें.'

'दोन वर्षांपूर्वी .. कीव्हमध्यें ..' अँड्रे आपल्याशींच पुटपुटला. आपल्या स्मृतीला त्यानें खूप ताण दिला. तिच्याकडे परत निरखून पाहिलें नि मग तो एकदम उद्गारला . 'हां हां, तूं त्या नगरप्रमुखाच्या कन्येची दासी.'

त्या तार्तार स्त्रीनें त्याला परत गप राहण्याची विनंती केली. नि सभोंवार भेदरट नजर टाकून पाहिलें. सभोंवार कसलीच हालचाल कुठें दिसत नव्हती.

'पण मला सांग–कशासाठीं कां आली आहेस तूं ? मालकीण कुठं आहे तुझी ? खुशाल आहे ती–कीं ... ?' अँड्रेनें आवेशानें विचारलें.

'इथं या शहरांतच आहेत त्या.'

'या शहरांत ?' सारें रक्त मस्तकांत उसळून त्यानें एकदम ओरडूनच विचारलें. 'नि ती काय म्हणून ?'

'कारण मालक सध्यां या शहराचेच मुख्य अधिकारी आहेत म्हणून.'

'विवाह झाला तिचा ? बोल झटपट ! नि कशी आहे तिची तबियत ?'

'दोन दिवसांच्या उपाशी आहेत त्या–सारं शहरच अन्नावांचून तडफडतं आहे कित्येक दिवस. माती खायची आली आहे आतां वेळ.'

अँड्रे स्तिमित होऊन तिच्याकडे पाहात राहिला.

'त्यांनीं आपल्याला तटावरून पाहिलं होतं नि म्हणून मला पाठविलें आहे. सरदारांना आठवण असेल माझी तर इकडेच आण त्यांना नि त्यांना विनंती कर – पाय धर त्यांचे– पावाचे चार तुकडे द्या माझ्या आईसाठीं. उपाशीं तडफडते आहे ती. असह्य झालं आहे तें मला तर. तुमच्या म्हाताऱ्या आईची शपथ आहे–तिच्यासाठीं तरी चार तुकडे द्या माझ्या आईला.'

अनंत विचारांचा एकच कल्लोळ त्या तरुण कोसॅकाच्या मस्तकांत उसळला होता पण इथें आलीस तरी कशी तूं ? त्यानें विचारलें.

'भुयारी मार्गानं आलें मी बाहेर. नगरांतील मुख्य मठांतून निघतो तो.'

' चल, आपण तडक जाऊंया तिकडे मी आतां येतोंच ब्रेड घेऊन. तोंवर अशीच पडून रहा इथं.'

अन्नकोठीच्या गाड्यांकडे तो आतां झपाझप चालला होता. त्याच्या हृदयांत तुफान उसळलें होतें. त्या अवखळ कुमारिकेचा मोहक चेहरा त्याच्या मनश्चक्षूंपुढें तळपत होता. गेल्या कांहीं दिवसांत विस्मृतीला पडल्यासारखा झालेला तो हंसरा चेहेरा, त्याच्या डोळ्यांपुढें येऊन पुनर्दर्शनाच्या आशे-मुळें त्याचें हृदय धडधडत होतें, कांहींसें कापत होतें. भावनांच्या या आवेगांत तो गाडीशीं येऊन पोहोंचला तरी आपण कां आलों हें त्याला कांहीं केल्या स्मरेना. हात वर करून त्यानें आपलें मस्तक चोळलें नि मग एकदम जाग येऊन तो गाडीजवळ थांबला. आणि बरेचसे पाव त्यानें हातांत घेतले. 'पण हें असलं रुक्ष अन्न ?' त्याच्या मनांत आलें, पण लगेच आठवलें कीं दोन दिवसांपूर्वीं लुटलेल्या मोनॅस्टरींतून सुरेख गव्हाची ब्रेड त्यानीं आणली होती. तो लगेच आपल्या वडिलांच्या गाडीजवळ गेला. ब्रेडचा तो गोण डोक्याखालीं घेऊन ओस्टॅप आडवारला होता पण त्याच्या घोरण्याचा गडगडाट पाहून अँड्रेनें तो गोण झटकन् त्याच्या मानेखालून हिस-कली. डोक्याला हिसका बसतांच ओस्टॅप अर्धवट जाग येऊन ओरडला, 'पकडा पकडा, चोर आला !'

' ए, बंद कर थोबाड, नाहींतर दाबतों गळा !' अँड्रे म्हणाला. पण याची कांहींच जरूरी नव्हती. ओस्टॅपचें घोरणें परत चालू झालें होतें. त्यानें मग एकदां सभोंवार नीट नजर टाकली. पण त्याला कसलीच हालचाल कुठें दिसली नाहीं. एक दोन क्षण वाट पाहून त्यानें मग वेगानें पाऊल उचललें.

' चल ऊठ बाई नि न घाबरतां हो पुढें.' आपल्या गाडीपाशीं येऊन तो म्हणाला. तो ब्रेडचा गोण त्यानें पाठीवर टाकला नि जवळच्याच दुसऱ्या एका गाडींतून आणखी एक गोण ओढून घेऊन तो निर्भयपणें पुढें झाला.

'अँद्रे !' त्याला ओलांडून जात असतां वृद्ध बल्बानें हांक दिली.

अँड्रे एकदम थबकला. त्याचें हृदयच जसें एकदम बंद पडलें. त्याचें सर्वांग थरथरूं लागलें नि त्यानें क्षीण स्वरांत विचारलें, 'काय बाबा ?'

'कोणी बाई दिसते आहे शेजारी ! थांब आतां उठलों कीं चामडींच लोळवतों तुझीं— ही बायांची संगत बरी नाहीं– खड्डयांत पाडतील त्या !' तो त्या अवगुंठनावृत स्त्रीकडे टवकारून पहात होता.

अँड्रे खालीं मान घालून एखाद्या मढ्यासारखा उभा होता. थोडा धीर करून त्यानें वर पाहिलें. त्याच्या म्हाताऱ्यानें डोळे मिटून परत निद्राख्यान सुरू केलें होतें. त्यानें मग देवाचें नांव घेतलें नि मागें वळून एखाद्या दगडी पुतळ्यासारखी निश्चल उभ्या असलेल्या स्त्रीच्या हाताला हिसका देऊन त्यानें मागें पहात मोठ्या सावधगिरीनें पाऊल उचललें लवकरच उतारावरून खालीं येऊन खालच्या दरींतल्या तळाशीं रेंगाळत वहाणाऱ्या ओढ्यांत त्यांनीं पाऊल टाकलें.

आतां तीं पुष्कळच सुरक्षित होतीं. त्यांच्या पाठीशीं दरीची उंच भिंत उभी होती. तिच्या माथ्यावर गवताची उंच पातीं हालत डोलत होतीं नि वर चंद्राची सोनेरी कोर वाकड्या कोयतीसारखी शोभत होती. झुळ-झुळता मंद वात प्रभाताचें आगमन सुचवीत होता. ओढा ओलांडून तीं दोघें चढ चढूं लागलीं. समोरच तटाची भिंत नि पलीकडून मठाच्या उत्तुंग भिंती डोकावतांना दिसत होत्या. इथें येतांच त्या तार्तार स्त्रीनें पायांतील जोडे दूर केले नि त्या पाणथळ नि वेतसगूढ अशा भागांतील एका उंचवट्याशीं ती थांबली. समोरचा दाट झाडोरा तिनें दूर सारला नि आंत एक बांधीव प्रवेशद्वार दिसूं लागलें. द्वार कसलें, गुहेचें तोंडच म्हणा. ती तार्तार स्त्री खालीं वांकली नि त्या निरुंद तोंडांत शिरली. तिच्या मागोमाग अँड्रेनेंहि शक्य तितकें वांकून पाठीवरील ओझ्यासह आंत प्रवेश केला नि चार दोन क्षणांतच तीं दोघेंहि आंतील निबिड, मिट्ट काळोखांत अदृश्य झालीं.

## ६

त्या मिट्ट काळोखांत आपल्या खांद्यावरील ओझें सावरीत त्या तार्तार स्त्रीच्या मागून अँड्रे चालला होता. थोड्याच वेळांत मग आंत अंधुक असा उजेड दिसूं लागला. एका छोटया प्रार्थनामंदिरासारख्या भागांत तीं आतां आलीं होतीं. ख्रिस्तमातेच्या चित्रासमोर असलेल्या दीपज्योतीवर, तिनें येतांना तिथें ठेवलेला एक तांब्याचा दिवा त्या तार्तार स्त्रीनें उजळला नि त्याच्या मंद उजेडांत त्यांचें मार्गक्रमण परत चालू झालें.

त्यांची वाट आतां प्रशस्त झाली असल्यानें अँड्रेला ताठ चालतां येत होतें व सभोंवारचें निरीक्षणहि करतां येत होतें. कीव्हमधील भुयारी गुंफां-सारखेंच तें दृश्य त्याला दिसत होतें. ऐहिक जगांतील अस्मानी सुलतानी-पासून सुरक्षित असें जीवन ख्रिस्ती भिक्षु त्या स्थलीं जगत. कांहीं ठिकाणीं तर खूपच ओल होती तर कांहीं ठिकाणीं सारी वाटच पाण्यांतून होती. अँड्रेला अनेकदां वाटेंत थांबून त्या स्त्रीला थोडी विश्रांती देणें भाग पडत होतें. अनेक दिवसांच्या उपवासामुळें तिच्या अंगांत फारच थोडें त्राण उरलें होतें नि तिचीं पावलें लटपटत पडत होतीं.

अखेरीस एका लोखंडी बंद दाराशीं तीं आलीं नि 'सुटलों एकदांची, देव-दयेनें!' असें ती तार्तार स्त्री उद्गारली. पण दारावर जोरानें ठोठावणेंहि तिला जमेना. म्हणून अँड्रेनें मग दार ठोठावलें नि तो ध्वनी किती वेळ तरी त्याच्या कानांत घुमत राहिला. मग एक दोन मिनिटांतच किल्ल्या खुळखुळ-ल्याचा नि कोणी तरी पायऱ्या उतरत असल्याचा आवाज झाला.तें लोखंडी दार उघडलें नि हातांत दिवा असलेला एक भिक्षु समोर उभा राहिला. त्याला पाहून अँड्रे एकदम अवठरल्यासारखा झाला नि तो भिक्षूहि तो झॅपरोझी कोसॅक पाहून अवठरला. पण ती तार्तार स्त्री कांहीतरी पुटपुटली नि दार बंद करून तो भिक्षूहि मग वरच्या पायऱ्या चढूं लागला एक दोन क्षणांतच तीं एका प्रार्थना मंदिरांत आलीं. सभोंवार त्यांना आतां कितीतरी भिक्षु नि भिक्षुणी देवस्थंडिलासमोर प्रार्थना करीत असलेल्या दिसत होत्या. साऱ्यांच्या

मुद्रा उपासमारीमुळें कांहींशा भेसूर दिसत होत्या. समोर जळत असलेल्या धूपद्रव्यांनीं सारा आसमंत कोंदाटला होता. नि मग एकदम ऑर्गनचे सांद्र मधुर स्वर उसळूं लागून त्याच्या मंद तीव्र ध्वनिप्रतिध्वनींनीं मंदिर जसें भारावल्यासारखें झालें. अँड्रे मंत्रमुग्ध झाल्यासारखा, विस्फारित नेत्रांनीं नि मुखानें तें दृश्य पाहात स्तब्ध उभा राहिला.

तेवढ्यांत कोणाचें तरी कण्हणें अँड्रेच्या कानीं आलें. त्यानें डोळे विस्फारून इकडे तिकडे पाहिलें. कितीतरी माणसें त्याला आतां इतस्ततः पडलेलीं दिसत होतीं. जिवंत कीं मेलेलीं ? पण त्यानें पाऊल पुढें टाकतांच तो कशाला तरी अडखळला. एका स्त्रीचें प्रेत होतें तें. तरुणच दिसत होती बापडी. तिच्या शेजारीं पडलेलें तिचें बालक तिच्या शुष्क स्तनांशीं झगडत होतें. पण मोठ्यानें रडण्याचें त्राणहि बिचाऱ्याच्या अंगांत दिसत नव्हतें. सर्वांग शहारत अँड्रे पुढें झाला. भुकेनें वेडापिसा झालेल्या एका हाडाच्या सांपळ्यानें त्याच्या अंगावर झेंप घेतली. पण अँड्रेच्या नुसत्या हाताच्या धक्क्यानें तो खालीं कोसळला. त्याची दया येऊन अँड्रेनें एक पाव त्याच्याकडे फेंकला. नि तो हाडांचा सांपळा एखाद्या पिसाट कुत्र्यासारखा त्याचे तुकडे करूं लागला. समोर एका दारांत एक म्हातारी एखाद्या दगडी पुतळ्यासारखी बसली होती. दुसऱ्या एका घरांत भुकेच्या वेदना असह्य होऊन कोणीतरी स्वतःला फांस लावून घेतला होता.

उपासमारीचीं भीषण दृश्यें पाहून अँड्रेनें कळवळून विचारलें. 'हे सारे भूकबळीच का आहेत ? अगदीं कांहीं कांहीं नाहीं उरलेलं खाण्यासारखं ? '

' सारं सारं झालं खाऊन–घोडीं, कुत्रीं, उंदीर देखील खाल्ले लोकांनीं. ' ती म्हणाली, ' गांवांत धान्यकोठारं नाहींतच. सारा माल सभोंवारच्या खेड्यांतून यायचा नेहमीं.'

' मृत्यूचं असलं भेसूर थैमान चालू आहे तरी शहर लढवणार तुम्हीं ?'

' केलं असतं शहर स्वाधीन. पण सेनापतींचा हुकूम आला–शहर लढवा, मी येतों आहें मदतीला. दर घटकेला, दर क्षणाला वाट पाहातों आहों आम्हीं त्यांची. . . . . पण हीं आलोंच आपण घरांत एकदांचीं. '

आसपासच्या इतर घरांत आपल्या वेगळेपणानें अगदीं उठून दिसणाऱ्या या इमल्याकडे अँड्रेचें केव्हांच लक्ष गेलें होतें. ही इमारत म्हणजे नामांकित

इटॅलियन कारागिरीचा एक सुंदर नमुना होता. चौकांतून वर जाण्याचा तो प्रशस्त जिना, नाजुक नकसकाम केलेल्या त्या खिडक्यांवरील शोभिवंत कॉरनिसेस, वरच्या मजल्यावरील त्या एकावर एक उभ्या राहिलेल्या छोटचा-मोठ्या कमानी, असें सारेंच कांहीं आकर्षक होतें. नोकराचाकरांचा राबताहि सभोंवार बराच दिसत होता. हें सारें कांहीं भारल्यागत पहात अँड्रे त्या तार्तार स्त्रीच्या मागून चालला होता. एका प्रशस्त आणि नकस कामानें भूषविलेल्या दाराजवळ येतांच तिनें अँड्रेला तिथेंच थांबण्यास सांगितलें नि दार उघडून ती आंत गेली. आंतून प्रकाशांचा मंद स्रोत बाहेर आला. कसली तरी मंद कुजबुज त्याच्या कानांवर आली नि त्याचें सर्वांग पुलकित झालें. त्या अर्ध्या उघडचा दारांतून एक स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. ती तार्तार स्त्री दाराशीं परत आली नि तिनें त्याला आंत बोलाविलें. तो स्वप्नांत असल्यासारखाच तिच्या मागून त्या महालांत प्रविष्ट झाला.

त्या सुकुमार तरुणीसमोर तो आतां उभा होता. एखाद्या कोरीव शिल्पाकृतीसारखीच तिची आकृति त्याला दिसत होती. पण त्यांत पाहिलेली ती ती अवखळ मुग्ध बालिका आतां पूर्ण विकसित अशा मोहक पुष्पांत रूपांतरित झाली होती. अपूर्णत्वाला पूर्णत्व लाभलें होतें. कलाकाराचा अखेरचा हात कलाकृतीवरून फिरला होता. आपल्या स्मृतींत सांठविलेले अर्धस्फुट सौंदर्यविशेष त्याला आतां सांपडत नव्हते. तिच्या मुखावरील ती पांडुरता तिच्या सौदर्यावर कांहीं विलक्षण अशा सामर्थ्याची, सर्वविजयी अशी डूब चढवीत होती. अँड्रे जसा स्तंभित झाल्यासारखा, भयचकित, आपल्या जागीं खिळल्यासारखा उभा होता नि तीहि त्याच्या सुंदर बलिष्ठ देहाकडे विस्फारित नेत्रांनीं पाहात होती.

‘तुमचे आभार मानायला माझं शब्दसामर्थ्य तोटकं आहे,’ रुपेरी घंटानादासारखे तिचे शब्द त्याच्या कानीं किणकिणले. ‘तो एक भगवंतच याचं बक्षीस आपल्याला देईल. माझ्यासारखी अबला काय देणार तुम्हांला–’

तिची नजर खालीं वळली नि तिच्या नाजुक गालांवर रक्तिमा पसरला. अँड्रे मुखस्तंभासारखा तिच्यासमोर उभा होता. मनांत उसळलेल्या भावना व्यक्त करण्यासाठीं त्याला शब्द स्फुरत नव्हते. ‘आपल्यासारखा रांगडा काय बोलणार तिच्याशीं !’ तो स्वतःशींच तळमळून म्हणत होता.

त्याच क्षणीं ती तार्तार स्त्री हळूच आंत आली नि पावाच्या नाजुक चकत्यांनीं भरलेलें हातांतील सुवर्णपात्र तिनें त्या तरुणीसमोर ठेवलें. त्या तरुणीनें आपले नेत्र एकदां त्या दासीकडे नि त्या पावाकड लावले नि मग वर अँड्रेकडे नजर लावली. भावनांचें अथांग विश्वच जणुं त्या दृष्टींत सामावलें होतें. ती अबोल पण बोलकी भाषा अँड्रेच्या जशी हृदयालाच भिडली. त्याचें गुदमरलेलें हृदय जसें आतां एकदम मोकळें झालें नि शब्दांचा आवेगी प्रवाह बाहेर उसळत येण्यासाठीं आतुर झाला. पण तेवढयांत त्या तरुणीनें कांतर स्वरांत विचारलें, 'नि माझी आई? तिनं घेतलं कांहीं? नि पिताजींनीं?'

'आईसाहेबांना झोंप लागली आहे. पण आपले पिताजी–या सरदाराचें आभार मानण्यासाठीं इकडेच येत आहेत.'

त्या तरुणीनें आपल्या पुढील पावाचे लहान लहान तुकडे चघळण्यास सुरवात केली होती. तिची ती सारी नाजुक हालचाल अँड्रे अनिमिष नेत्रांनीं पाहात होता. तिच्या नेत्रांत समाधान, तृप्ति आतां तरळत होती. पण अँड्रेला आठवलें कीं उपासमारीनंतर पूर्णतृप्ति ही विषवत् असते नि त्याचा चेहरा एकदम पांढरा पडला. त्यानें झटकन् पुढें होऊन तिचा हात पकडला. नि आवेगानें तो ओरडला. 'बस्, पुरे, एवढंच पुरे आज–हें अन्न विष होईल नाहींतर!' आणि तिनेंहि एखाद्या आज्ञाधारक बालकाप्रमाणें हात खालीं केला नि त्याच्या डोळयाला डोळा भिडवला. त्या परस्परांवर खिळलेल्या नेत्रांतील भावविश्व कोण साकार करूं शकेल ?

'देवी ! ' अँड्रेचें भारावलेलें हृदय आवेगानें उद्‌गारलें. 'बोल, काय आहे तुझी आज्ञा ? बोल देवी बोल, काय करूं मी ? माझं सर्वस्व तुझ्याच पायीं मीं आतां वाहिले आहे. तुझ्यासाठी मी माझे प्राणहि वेंचीन ! माझं हें बोलणं वेडेंपणाचं आहे, हें मला कळतं-पण मी एक रांगडा गडी आहें. राजामहाराजांची भाषा मला कशी येणार ! तुझ्या पायांचा दास होण्याचीहि आमची लायकी नाहीं–सुरसुंदरींचंच तें काम, आमचं नव्हे ! ......'

अँड्रेचें हें आवेगी वक्तव्य ती तरुणी विस्फारित नेत्रांनीं नि सर्वांगाचें कान करून ऐकत होती. हृदयापासून निघालेले ते शब्द सुवर्णमुद्रांप्रमाणें खणखणत होते तीहि प्रत्युत्तरासाठीं अधीर झाली होती. पण नगराबाहेर पसरलेल्या त्या रानदांडग्या शत्रूची, शहरांत भीषण मृत्यूची अटळ छाया पसरणाऱ्या

शत्रूची आठवण तिच्या तोंडून शब्द फुटू देत नव्हती. एकदम तिच्या नेत्रांत अश्रु उसळले. तिनें आपले ओठ घट्ट दाबून धरले. पण व्यर्थ. ते घळघळते अश्रु तिला आवरेनात–आवेगानें तिचें सर्वांग आतां जसें हादरत होतें.

'बोल, एक शब्द तरी बोल माझ्याशीं !' अँड्रे म्हणाला. त्यानें तिचा हात आवेगानें दाबला. पण कसलीच प्रतिक्रिया मात्र झाली नाहीं. तिचें मूक रुदन तसेंच चालू होतें.

'पण इतकं कसलं दुःख होतं आहे तुला ? सांग, मला सांग ! कां हा एवढा शोक ? '

तिनें मग हातरुमालानें डोळे कोरडे करण्याचा प्रयत्न केला. पुढें आलेले केस मागें सारले नि ती बोलूं लागली. मंद, अस्पष्ट अशा स्वरांत सायंतन वायूची मंद झुळक उभार गवतांतून खसखस, सळसळ असा आवाज करीत झुळझुळावी भटक्या पांथस्थाचे शिणलेभागलेले पाय ती मंद मंद कुजबूज ऐकत रेंगाळावे नि सूर्यास्ताचें निवांत सौंदर्य, किंवा जवळच्या शिवारावरून येणाऱ्या खेडवळांच्या लकेऱ्या किंवा दुरून घुमत येणारा चाकांचा आवाज त्याच्या कानींहि न पडावा, तीच गत आतां अँड्रेचीहि झाली होती.

'पुरेशी करुणास्पद नाहीं का वाटत मी ? माझी ती जन्मदात्री दुर्दैवी नाहीं ? आमच्या दैवाचा प्याला विधात्यानेंच नाहीं का भरलेला नि तुम्हींच नाहीं का याला जबाबदार ? –किती कठोर आहेस तूं नियति ! सरदार नि दरकदार माझ्या पायांशी लोळण घेऊन माझी प्रेमयाचना करीत होते. पण त्यांनीं कोणी माझं हृदय जिंकलं नाहीं. त्याला भुरळ एका परक्यानें, आमच्या शत्रूनें घातली ! कोणत्या पातकासाठीं मला ही शिक्षा ? पंचपक्वान्नांचा घास सदा मिळणाऱ्या माझ्या नशिबीं काय आलं आहे हें ? वाटेवरच्या भिकाऱ्याचं मरण यावं माझ्या वांट्याला ? माझ्या प्राणांहूनहि प्यार असलेल्या माझ्या आईबापांची प्राणांतिक तडफड पाहण्याचं दुर्भाग्य कां–कां यावं माझ्या ललाटीं ? आणि भरींत भर म्हणून हें असलं हृदय छिन्नविच्छिन्न करणारं प्रेम–हे असले गोड प्रेमळ शब्द माझ्या कानीं यावे ? नि हें मरण समोर खडं दिसत असतां !'

ती एकदम थांबली. एक प्रकारची असीम अशी निराशा तिच्या मुखावर

पसरली. तिच्या नेत्रांतून नीरव अश्रुबिंदु गालांवर झरत होते. मूर्तिमंत कारुण्यच जसें साकार होऊन अँड्रेच्या समोर स्थिरावलें होतें.

' नाहीं, असं होणार नाहीं !' अँड्रे आवेगानें उद्गारला. ' नाहीं, असल्या स्वर्गीय सौंदर्याची अशी दुर्दैवी अवस्था होणार नाहीं. नाहीं, नाहीं, असलं मरण तुझ्यासाठीं नाहीं—माझ्या सर्वस्वाची शपथ वाहून सांगतों, असलं मरण तुझ्या नशिबीं येणार नाहीं. पण दुर्दैवानं कशाकशाचाच उपयोग न होतां ही अखेरी जर अटळ ठरली तर—तर आपला दोघांचाहि शेवट होईल, एकदमच शेवट होईल, नि त्यांतहि मी आधीं प्राण वेंचीन तुझ्यापायीं—माझं बलिदान आधीं—एक मृत्यूच आपली ताटातूट करील ! '

' अशी फसवणूक नका करूं सरदारसाहेब, स्वतःची नि माझी,' आपलं सुंदर मस्तक हालवीत ती मृदुस्वरांत म्हणाली. ' मला पूर्णपणें माहीत आहे कीं आपलं प्रेम मला कधींच मिळणार नाहीं-तुमचा धर्म, तुमचं कर्तव्य, तुमचे पिताजी नि तुमचा स्वदेश तुम्हांला आवाहान करतो आहे, तुमचे बांधव तुम्हांला साद घालताहेत—आणि आम्ही, आम्ही तुमचे शत्रु !'

' मला नाहीं त्यांची पर्वा —तेवढीच आली वेळ तर— नाहीं, इतर कोणी नाहीं माझं ! अँड्रे ताठरपणें उद्गारला. ' नि माझा देश— कुणी दिला तो मला ? स्वदेश ! आपलं हृदय ज्याच्यासाठीं कळवळतं, तळमळतं, तोच आपला स्वदेश. तूं—तूंच माझा देश ! हाच देश फक्त माझ्या हृदयांत नांदणार—कोणताहि कोसॅक तो तिथून उखडूं शकणार नाहीं ! नि त्या देशासाठीं मी माझ्या सर्वस्वावर लाथ मारतों आहें—होम करतों आहें सर्वस्वाचा !'

एखाद्या सुंदर शिलामूर्तीसारखी एक क्षण दोन क्षण ती त्याच्याकडे पाहात होती—त्याच्या डोळ्यांचा ठाव घेत होती आणि मग एकदम तिच्या डोळ्यांतून अश्रुपूर वाहूं लागला आणि अत्यंत आवेगानें पुढें होऊन तिनें त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारली. नि त्याच्या खांद्यावर मान टाकून ती हमसाहमशीं रडूं लागली.

त्याच क्षणीं बाहेर रस्त्यावर पडघम नि तुताऱ्या वाजूं लागल्या. पण अँड्रेला त्या ऐकूं येत नव्हत्या.

' वांचलों, वांचलों अखेरीस आपण ! ' त्याच क्षणीं धांवत आंत आलेली ती तार्तार दासी आनंदानें ओरडली. ' आपलं सैन्य पोचलं येऊन, आणि

त्यांनीं धान्यधुन्यहि आणलं आहे खूप. आणि झॅपरोझी पण आणले आहेत कैद करून.'

पण यांतलें कांहींच त्या दोघांच्या कानांत शिरलें नाहीं. एका वेगळ्याच उन्मादांत, वेगळ्याच स्वर्गांत तीं दोघं विहरत होतीं नि बाह्य जगाचें त्यांना भानहि नव्हतें.

आणि अशा रीतीनें एक कोसॅक वीर बारगळला. त्याचा स्वदेश, स्वधर्म, सगेसोयरे, झॅपरोझीजगत् त्याला आतां पारखें झालें. वृद्ध टारास अवमानित झाला. त्याच्या पांढऱ्या केसांना त्याच्याच पुत्रानें काळें फांसलें. 'कशाला जन्म दिला मी याला !'

## ७

साऱ्या झॅपरोझी छावणींत आतां एकच गोंधळ उडाला होता. हा शत्रु आला कोठून नि शहरांत घुसला तरी कसा, याची सर्वत्र चर्चा सुरू झाली. नि निष्कर्ष असा निघाला कीं नगराच्या एका बाजूच्या वेशीवर पहारा देणारी पेरियास्लाव्ह जमात दारूच्या नशेंत मुडद्यासारखी पडली होती. त्यांना कांहीं उमजण्यापूर्वीच अर्धेअधिक लोक कापले गेले होते नि उरले सुरले बंदिवान झाले होते. या गडबडीनें जागे झालेले आसपासच्या नाक्यावरील सैनिक तसेच गडबडीनें जरी शस्त्रसज्ज होऊन शत्रूवर तुटून पडले, तरी त्यांचा प्रयत्न शत्रूच्या बंदुकांच्या जलाल माऱ्याखालीं निष्प्रभ ठरला. आणि आतां कोशेव्हॉयच्या, सेनाप्रमुखाच्या हुकुमानें ते सारे झॅपरोझी सैनिक, अनावृतमस्तक असे मूकपणेंच त्याच्याभोंवतीं गोळा होऊन खडे होते.

' बांधवहो, काय झालं तें तुम्हाला कळलंच आहे. हो लाजिरवाणी दशा दारूमुळें ! दारूचं परिमाण जरा वाढवतांच, तुम्हीं धुंद झालांत नि गनिमानं तुमची वस्त्रंहि फेडून नेलीं –असलीं माणसं तुम्हीं !'

सारेजण लज्जेनें खालीं मान घालून हें ऐकत होते. अपराधाची जाणीव त्यांना टोंचीत होती. तरीहि एकटया नझामाई विभागाच्या प्रमुखानें, कुकुबेंकोनें मात्र तोंड उघडलें.

'थांबा, बॅट्को ! ' तो म्हणाला. ' साऱ्या सेनेसमोर आपण बोलत असतां प्रत्युत्तर करण्याचा आपला रिवाज नाहीं. तरीहि वस्तुस्थिति आपण म्हणतां तशी नव्हती; नि म्हणूनच मी बोलतों आहें. कूच करतांना रणांगणावर किंवा एखाद्या कामाच्या वेळीं जर कुणी बेहोष झाला असता तर त्याला देहांताचंच प्रायश्चित्त मिळालं असतं. पण फुरसतीच्या वेळीं केवळ निष्क्रिय असतां केलेली मौज ही गैर किंवा दोषास्पद कशी ठरते ? तरी आतां आपण आपलं पाणी त्यांना दाखवूंया. आपण अनेकवार त्यांना चोपून काढलं आहे नि आजहि आपण त्यांना याद राहीलसं यथास्थित चोपून काढू. '

त्याच्या या भाषणानें कोसॅक वीरांना बरें वाटलें नि त्यांनीं आपल्या माना वर केल्या नि कांहींनीं संमतिदर्शक माना डोलवीत, ' योग्य बोलला हं, कुकुबेंको ! ' असे उद्गार काढले.

जवळच उभा असलेला टारास बल्बा म्हणाला, ' सत्य तेंच सांगितलं नाहीं, कुकुबेंकोनं ? आतां तुमचं काय म्हणणं आहे यावर ?'

' काय म्हणणं आहे ? अशा पुत्राला जन्म दिल्याबद्दल अभिनंदन करतों मी त्याच्या पिताजींचं ! कारण दोष दाखवायला फार अक्कल नाहीं लागत. पण संकटसमयीं धीर द्यायला, प्रोत्साहन द्यायला मात्र खूप अक्कल लागते. मी स्वतःच तुम्हांला उत्तेजनपर असं बोलणार होतों, पण कुकुबेंकोनेंच आघाडी मारली. '

' आणि आपणहि योग्य तेंच बोललां ! ' चहूंकडून आवाज आला.

' पण आतां अवधान द्या माझ्याकडे ! ' कोशेव्हॉय पुढें बोलूं लागला,' या नगराच्या तटबंदीवरून चढून जाणं किंवा खालून भुयारीमार्ग खोदणें-जर्मनांसारखा-हें कांहीं कोसॅकांना जमण्यांतलं नाही. तरीपण शत्रूनं फार मोठा धान्यपुरवठा शहरांत नेला असेल असं मला वाटत नाहीं, त्यामुळें त्यांना कांहीं झालं तरी तटाबाहेर हें पडलंच पाहिजे. म्हणून मी म्हणतों आपल्या सेनेचे तीन विभाग करूं या आपण नि तीन्ही मार्ग धरूं रोखून. कर्नल टारासनें आपली तुकडी घेऊन दबा धरून बसावं राखीव सैन्य म्हणून. टिटारेव्हका

एकीकडे नि शेचर विनोव्हनें उजवी बाजू सांभाळावी. आणि तिखट जिभेच्या फटकळ लोकांनीं पुढें होऊन शत्रूला वाकुल्या दाखवून चिडवावं. म्हणजे ते हलक्या माथ्याचे पोल्स चिडून बाहेर पडतील—कदाचित आजच्या आज देखील. प्रत्येक छोटयामोठया नायकानें आतां आपल्या तुकडया तयार कराव्या. खायला प्यायला द्या लोकांना भरपूर –पण डोकीं शाबूत स्वच्छ राहूं द्यात. साऱ्यांचीं ! आणखी एक सूचना कोणी ज्यू जर व्होडका विकतांना दिसला सैन्यांत तर त्याला उलटे पाय करून टांगा नि करा ठार. तर आतां बंधूंनो, कामाला लागा एकदम –कसा कमरा !'

त्याचें भाषण संपताच सर्व सैनिकांनीं माना लववून त्याना वंदन केलें नि तसेच अनावृतमस्तक असे आपआपल्या छावणीकडे ते चालूं लागले. कांहीं अंतरावर गेल्यानंतर त्यांनीं आपल्या टोप्या डोक्यावर चढवल्या आणि मुक्कामावर पोंचतांच हत्यारांची साफसुफी नि दारुगोळयांची तयारी त्यांनीं कसोशीनें केली.

छावणीकडे जात असतां साऱ्या वाटभर टारासच्या डोक्यांत एकच विचार चालला होता. अँड्रेची हालहवाल काय? जागा होण्यापूर्वीच कैद झाला असेल तो ?अं हं. जिवंतपणीं कैद नाहीं होणार तो. पण मेलेल्या कोसॅकांत त्याचं प्रेत नाहीं सांपडलं—विचारांच्या भरांत टारास आपली छावणी मागें टाकून पुढें चालला होता. पण तेवढयांत कोणाच्या तरी हाकेनें तो भानावर आला.

'कोण हांक मारतं आहे मला ?' तो म्हणाला. यांकेल ज्यू त्याच्या समोर उभा होता.

'कर्नलसाहेब ! कर्नलसाहेब ! अहो गांवांत गेलों होतों मीं !' घाईगर्दीनें तो सांगत होता.

'कोणता सैतान गेला घेऊन तुला आंत ?' चकित होऊन टारासनें विचारलें.

'आतां सांगतों बघा,' यांकेल म्हणाला, 'सकाळीं तो गोळीबार ऐकला मीं नि अंगांत कपडे घालीत घालीतच तिकडे धांवलों मीं. शिपायांची शेवटची तुकडी तटाच्या दारांतून आंत जात होती. कर्नल गॅलेन्डोव्हिक दिसला तिथें मला. माझं कर्ज घेतलं आहे त्यानं. त्याच्याकडे धांवलों मी; नि काय, शिरलों त्याच्या मागोमाग आंत झालं.'

'कशाला, तिथें कर्ज वसूल करायला ?' बल्वा म्हणाला. 'गोळी नाहीं घातली त्यानं तिथंच तुला ? '

'अरे देवा, केलं असतं त्यानं तस ! ' तो ज्यू उद्गारला. 'पण मी हातीं पायीं पडलों. गयावया केल्या. कर्ज मागणार नाहीं परत कधींहि, आणखी पैसे सुद्धां देतों वाटलं तरम्हणालों कारण त्याच्या खिशांत दमडा देखोल नाहीं, बरं कर्नलसाहेब ! तसा जमीनदार आहे बडा किल्लेकोट आहेत, वाडे-बंगले आहेत, पण खिशांत दमडा नाहीं, एकहि नाहीं ! '

'पण गांवांत काय केलंस जाऊन ? आपले लोक दिसले कोणी ?'

'हो हो ! खूप आहेत आपले लोक, तो ऐझॅक नि रशूम नि सॅम्युअल नि तो ज्यू सावकार–'

'गेले खड्ड्यांत रे तुझे सारे ज्यू !' टारास रागानें ओरडला. 'मीं विचारतों आहे झॅपरोशिअन्स. '

'नाही, त्यांना नाहीं पाहिलं मीं–फक्त अँड्रेसाहेबांना पाहिलं आपल्या. '

'कोण, अँड्रेला पाहिलास ? ' टारास ओरडला. 'कुठं पाहिलास ? तुरुंगांत ? जेरबंद केलेला ? '

'कोणाची छाती आहे त्यांना जेरबंद करण्याची ?––'

'काय रुबाब आहे आतां त्यांचा ! अंगावर भारी भारी कपडे, सोन्याचीं पदकं, सोन्याचा जिरेटोप–सर्वांग जसं झगमगतं आहे सोन्यानं ! नि मांडी-खालचा घोडा –खाशा स्वारींचा–गव्हर्नराचा !'

'पण हा सारा गनिमाचा सरंजाम कशासाठीं ?' स्तिमित होऊन बल्बानें विचारलें, 'कोणी केली ही सक्ती त्याच्यावर ?'

'सक्ती ? आपण होऊन राजीखुशीनें गेले ते त्यांच्याकडे–आपल्याला नाहीं माहीत ?'

'खोटं, खोटं बोलतो आहेस, कुतरड्या !'

'खोटं ! नि तें कां ? मी काय गाढव आहें आपला प्राण गमवायला?'

'म्हणज याचा अर्थ त्यानं आपला देश नि धर्म सोडून दिला ?'

'तसं नाहीं–मी एवढंच म्हटलं ते त्यांच्या बाजूला मिळाले. खोटं नाहीं बोलत मी. छे, छे ! नरकांत पडतील माझे पितर; खोटं बोलेन तर ! नि आपली मर्जी असेल तर, ते कां गेले तेंहि सांगेन मी. '

‘ कां ? ’

‘ एक सुंदर, मोहक मुलगी आहे त्या गव्हर्नरला–विलक्षण विलक्षणच सुंदर ! ’

‘ मग, त्याचं काय ? ’

‘ तिच्या पायींच झालं की सारं. माणूस प्रेमांत पडला कीं कोणीहि वांकवावं त्याला. ’

बल्बा विचारांत पडला. अबलेचें प्रबल सामर्थ्य त्याला स्मरत होतें. तिनें लोळवलेले अनेक बळवंत त्यानें पाहिलें होते. अँड्रेला स्वभावतःच वाटणारें स्त्रीचें आकर्षण त्याला माहीत होतें. तो तिथें खिळल्यासारखाच आतां उभा होता.

‘ ऐका महाराज, मी सारं सांगतों आपल्याला.’ यांकेल म्हणाला. ‘ तें सैन्य तसं नगरांत शिरतांना पाहिलं तेव्हांच मी बरोबर कांहीं थोडे मोत्याचे सर घेऊन तिकडे धांव मारली होती. माझा होरा असा कीं, अन्नाला महाग झाल्या असल्या तरी त्या श्रीमंत बाया मोत्यांचा लोभ कांहीं सोडणार नाहींत. म्हणून गव्हर्नरांच्या वाड्यावर मी तडक गेलों नि तिथेंच हें सारं कळलं मला. त्या तार्तार दासीनें सांगितलं हें मला. आपल्या अँड्रेसाहेबांनीं साऱ्या झॅपरोझींना पिटाळून लावण्याचं वचन दिलं आहे त्यांना. ’

‘ मग त्यांचा तिथंच मुडदा नाहीं पाडलास तूं ? ’

‘ तो काय म्हणून ? आपल्यां खुषीनें गेले ते. त्यांना तिकडे जास्त बरं वाटलं – यांत काय चुकलं ? ’

‘ समक्ष पडली तुमची गांठ ? ’

‘ अहो हो–अहो काय त्यांचा रुबाब ! नि त्यांनीं मला लगेच ओळखलं नि मी जवळ जातांच ते मला म्हणाले — ’

‘ काय, काय म्हणाला तो ? ’

‘ ते म्हणाले, “ यांकेल, माझ्या वडिलांना, भावांना, नि साऱ्या कोसॅक नि झॅपरोझींना सांग कीं ते आतां माझे कोणीहि नव्हत; बाप नाहीं, भाऊ नाहीं, कोणी कोणी नाहीं; नि मी त्यांच्याशीं लढणार, साऱ्यांशीं लढणार! ’

‘ खोटं, खोटं बोलतोस तूं कुतरड्या ! ’ बल्बा बेभान होऊन ओरडला.

'अरे तुम्ही ख्रिस्ताला देखील बदनाम करून क्रूसावर चढवलांत ! थांब, सैताना, तुझा जीवच घेतों मी !' असें म्हणत त्यानें तलवारीला हात घातला.

तें पाहून तो भेदरट जीव घेऊन पळत सुटला. मागें न पाहतां तो त्या कोसॅक छावणीपासून सुसाट दूर पळत होता. आणि त्याच्यावर राग काढण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें उमजून टारासनेंहि त्याचा मग पाठलाग केला नाहीं.

त्याला आतां आठवलें कीं दोन दिवसांपूर्वी त्यानें अँड्रेला रात्रीच्या काळोखात एका स्त्रीच्या संगतींत पाहिलें होते. त्यानें लाजेनें खालीं मान घातली. तरीहि त्याला अंतरंगांत अजूनहि वाटतच होतें कीं आपल्या लेकानें देवाधर्मावर पाणी सोडून त्याला काळिमा आणला नसावा.

पण अखेरीस सेनानायकाच्या आज्ञेप्रमाणें आपल्या तुकडीला जवळच्या झाडींत त्यानें दबा धरून बसविलें. इतर सैन्यें तीन भागांत विभागून तीनहि प्रवेशद्वारें रोखून बसलीं. शत्रूच्याहि हालचाली आंत नगरांत चालू होत्या. स्वरूपसुंदर पोलिश उमराव नगराच्या तटबंदीवर दिसत होते. त्यांच्या मस्तकांवरील शिरस्त्राणें नि त्यांवरील पांढरे शुभ्र तुरे डौलानें डोलत होते. त्यांचे नि साध्या सैनिकांचे वेषहि मोठे ऐटबाज दिसत होते नि हत्यारें पात्यारेंहि उंची दिसत होतीं. सर्वांच्या पुढें त्यांचा विशालदेही, बलिष्ठ सेनानी खडा होता. त्याचा चपलदेही दुय्यम सेनानी वेगानें इकडेतिकडे फिरत सैनिकांना हुकूम सोडीत होता. त्यांची सारी तयारी जय्यत दिसत होती.

समोर कोसॅक आपल्या साध्या वेषांत हत्यारबंद असे खडे होते. त्यांच्या कोणाच्याहि शरीरावर सोन्याचा अंशहि दिसत नव्हता. त्यांना भडक भपकेदार रणवेश आवडतच नसे. त्यांची चिलखतें नि कपडे साधेच असत. त्यांच्या मस्तकांवरील लाल केसाळ टोप्या आतां चहूंकडे उसळत असलेल्या दिसत होत्या.

दोन कोसॅक घोडेस्वार आतां दौडत पुढें आले. एक तरुण नि दुसरा वृद्ध. दोघाच्याहि जिभेचा पट्टा अत्यंत पल्लेदार नि तिखट. तलवारबहादूरही तसेच –नोव्हिरम नि मिकिटा. त्यांच्या पाठीशीं एक भीमकाय नि रणझुंजार असा कोसॅक–पोपोव्हिच. अनेक दिव्यांतून शिरसलामत निसटलेला. हाहि तसाच तिखट जिभेचा.

'ओ हो ! वर लाल डगले पण आंत छाती मात्र पांढरीफटक. भेकड !'

'या, या –दाखवतों या !' तो बलिष्ठ देही कर्नल तटावरून उद्गारला. 'चला, शस्त्रं ठेवा खालीं नि शरण या. ए गांवढळांनो ! तुमच्या दोस्तांना लोळवलेले पाहिलेत ना तुम्हीं ? अरे त्या झॅपरोझींना करा रे आणून इथें उभे.'

मजबूत दोऱ्यांनीं जखडबंद केलेले कोसॅक आतां तटावर दिसत होते. नाईक खलीब सर्वांच्यापुढें दिसत होता. दारूच्या नशतच गिरफदार केला गेल्यामुळें त्याच्या अंगावर पुरे कपडेहि नव्हते. शरमेनें काळवंडलेला असा तो उभा होता. त्याचे केस पांढरे पडले होते.

'धीर धर, धीर धर खलीब ; तुला सोडवतोंच आम्ही !' खालून कोसॅक वीर गरजले.

'धीर धर, दोस्त !' एक कोसॅक नाईक ओरडला. 'उघडावाघडा आहेस–तुझा नाहीं तो दोष–पण या निर्लज्जांना कशी लाज नाही वाटली तुला असा उभा करण्याची ?'

'अरे वा रे वीर ! झोंपलेल्यांशीं झुंजणारे !'

'जरा थांबा, तुमच्याहि मिशा उतरवतों आम्हीं.' वरून आवाज आला.

'पाहूंच द्या मला तें एकदां !' पोपोव्हिच म्हणाला. 'पण कदाचित होईलहि तें खरं !' मागें वळून डोळे मिचकावीत तो म्हणाला.

'कशावरून रे बावा ?' एकानें हंसत विचारलें.

'अरे, त्या ढेरपोट्या नायकाच्या आड लपणारं सारं सैन्य ;–तुमच्या तरवारी कशा पोंचणार तिथपर्यंत मग ?'

यावर सारेजण खदखदून हंसले नि त्यांतला एक जण म्हणाला. 'वाहवा, वाहवा, पोपोव्हिच ! तुझे शब्द म्हणजे –'

पण त्याचें वाक्य संपण्यापूर्वींच ! कोशेव्हॉयनें आरोळी दिली. 'मागें सरा, मागें सरा एकदम !'

त्याचे कोसॅक मागें सरतात न सरतात तों वरून गोळ्यांची एक फैर सणसणली. तटावर आतां बरीच गडबड उडालेली दिसली. खुद्द गव्हर्नर आतां तटावर दिसत होता. नि मग तटाचीं दारें खुलीं होऊन आंतून पोलिश सैन्य बाहेर पडलें.

'चढवा, हल्ला चढवा एकदम –अवसर देऊं नका त्यांना !' कोसॅक कोशेव्हॉयनें आरोळी दिली. 'इतर दारं मोकळीं सोडा. तूं टिटारेंका,

उजव्या अंगाला चढव हल्ला नि डिआडकिव्ह तूं डाव्या बगलेवर ! आणि कुकुबेंको तूं पिछाडीवर चढव हल्ला ! त्यांच्या रांगा तोडून टाका ! '

या हुकुमाप्रमाणें कोसॅकांनीं प्रखर हल्ला चढविला–नि शत्रूची फळी पार फोडून ते आंत घुसले. बंदुकी ठांसण्याचीं सवडहि त्यांनीं शत्रूला दिली नाहीं. नि तलवारीला तलवार भिडून एकच खणाखणी सुरू झाली. कोसॅकांच्या धडकीपुढें अनेकांना घोड्यावरून खालीं यावें लागलें नि अनेकांना प्राणार्पण करावें लागलें. पोपोव्हिचची तलवार तर विशेष चापल्यानें तळपत होती. नि रक्तानें नहात होती. कित्येकांना दूर पिटाळून लाऊन बरीच लूटहि त्यानें पैदा केली होती.

दुसरा एक कोसॅक वीर युवक एका नामवंत पोलिश झुंजाराशीं भिडला होता. तलवारींची झटापट चालली होती नि अखेरीस तर ते अगदीं अंगालाच भिडून नुसत्या बाहूंचाच उपयोग करीत होते. दोघेहि तुल्यबळ झुंजार पण अंतीं कोसॅक युवक विजयी झाला. नि त्याच्या कमरेच्या कट्यारीनें त्या पोलवीराचा आरपार भेद केला. पण त्याचाहि विजय अल्पकाळ ठरून एका पोल उमरावाच्या गोळीनें त्याच्या मस्तकाच्या चिधड्या उडाल्या. हा उच्चकुलीन, स्वरूपसुंदर, पॉपलर वृक्षासारखा ताठ उभा–जसा वीजेसारखा चहूंकडे तळपत होता. त्यानें अनेक कोसॅकांना मृत्युशय्या बहाल केली होती. आतां त्या कोसॅक जवानाला, कोबिटाला गोळी घालून त्यानें गारद केलें होतें.

' वा रे पठ्ठे ! लढावं तर अशा पठ्ठ्याशीं ! ' कुकुबेंको गर्जना करीत म्हणाला. आपल्या घोड्याला टांच मारीत त्यानें एवढ्या मोठ्यानें आरोळी ठोकली कीं सभोंवारचे सारे जवान थरकांपले. त्या गर्जनेनें त्या पोलवीराचा घोडा उधळला नि कुकुबेंकोची गोळी स्वाराच्या खांद्याला चाटून गेली नि तो खालीं पडला. पण तरीहि त्यानें अवसान धरून आपल्या शत्रूला तोंड दिलें पण खांद्याच्या जखमेमुळें त्याचा हात लटका पडला. नि कुकुबेंकोनें आपला खांदा दोन हातांनीं उगारून त्याच्या तोंडांत आवेशानें खुपसला.

' अरे अरे, काय वेडेपणा ! ' त्या ठार झालेल्या सरदाराच्या अंगावरील मौल्यवान जिन्नस न काढतांच कुकुबेंको निघून गेलेला पाहून बोरोडॅटी–एक टोळीनायक– म्हणाला.

आणि त्या जडजवाहिराच्या मोहाला बळी पडून तो खालीं वांकला आणि त्यानें एक हिरेजडित खंजीर नि कमरेची सुवर्णमुद्रांनीं भरलेली थैली प्रेताच्या अंगावरून काढून घेतली. पण त्या लोभ्यानें कांहीं क्षणापूर्वी त्यानेंच घोडयावरून खालीं पाडून जखमी केलेल्या जवानाला आपल्यावर चालून येतांना पाहिलें नाहीं त्या पोलवीरानें आपली तलवार गरगर फिरवली नि खालीं वाकलेल्या बोरोडॅटीच्या मानेवर त्यानें घाव घातला. बोरोडॅटीचें विशाल मस्तक चेंडूसारखें दूर उडालें नि धडांतून लोटलेल्या अशुद्धाच्या पुरानें खालील धरा रंगली आणि आंतील जीवात्मा उदासपणें, पण इतक्या झटपट या विशाल कणखर देहांतून आपण कसे बाहेर पडलों, याचें जणु नवल करीतच स्वर्गाची वाट चालूं लागला.

त्या पोल जवानानें तें तोडलेलें मस्तक उचलून घोडयाच्या खोगिराला डौलानें लटकवलें न लटकवलें तोंच त्याच्यावरहि दैवानें धाड घातली.

आपल्या सामर्थ्यवान पंखांच्या जोरावर वर उंच आकाशांत भरारत असणाऱ्या बहिरी ससाण्यानें आपल्या पंखावर एक क्षणभर अवचित स्थिर व्हावें नि मग आपल्या भक्ष्यावर झेंप टाकावी; त्याच डौलानें वलवाच्या वीर-पुत्रानें, ओस्टॅपनें त्या पोल कर्नलच्या मानेभोंवतीं दोरीचा फांस फेंकून त्याला गिरफदार केलें. नि त्याचे हातपाय बांधून तें मुटकुळें आपल्या घोडयाच्या खोगिराला बांधून त्यानें त्याला टांच मारली आणि असा डौलत जात असतां बोरोडॅटीच्या तुकडीला आरोळी दिली.

आपला नायक ठार झाल्याचें ऐकून त्याचें प्रेत आणण्यासाठीं त्यांनीं धांव घेतली आणि मग मुळींहि विलंब न करतां त्यांनीं एकमतानें ओस्टॅपला आपला नायक निवडलें 'आपल्याहून लहान आहे तो, पण शहाणपण नि पराक्रम कांहीं वयावर अवलंबून नसतों !' ते सारेजण म्हणाले. ओस्टॅपनेंहि रणांगण हें कांहीं वादविवादाचें स्थळ नाहीं हें समजून त्या बहुमानाचा स्वीकार केला आणि आपली टोळी घेऊन तो एकदम युद्धाच्या धुमश्चक्रींत घुसला.

याच वेळीं पोलिश सैन्य लढाई आपल्या हातून जाते आहे असें पाहून एकाच ठिकाणीं चहूंकडून एकदम एकवटलें नि त्यांच्या मदतीला आलेल्या राखीव तुकडयांच्या बळावर त्यांनीं कोसॅक सेनेवर बंदुकीची फैर झाडली.

पण या गोळयांनीं सैन्यापेक्षां पलीकडे स्वच्छंद चरत असलेल्या कोसॅक बली-वर्दांनाच भाजून काढलें. भेदरून ओरडत पळत सुटलेल्या या बैलांनीं पाया-खालीं अनेकांना तुडवीत छावणी गांठण्याचा प्रयत्न चालविला. पण याचवेळीं झाडींत दबा धरून बसलेला टारास मोठ्यानें गर्जना करीत आपल्या लोकां-निशीं त्यांना आडवा आला. त्या अचानक अडथळयानें नि ओरडण्यानें तो बलांचा पिसाट कळप माघारीं वळून पोलिश सैन्यांत घुसला नि अनेकांना भुईसपाट करीत त्यानीं ती सारी तुकडी पिस्कारून टाकली.

'शाबास रे माझ्या बैलांनो !' झॅपरोझींनीं आरोळी दिली. 'कूच करीत असतांना मदत केली तुम्ही नि आतां या रणांगणावरहि !' नि मग दुप्पट आवेशानें ते शत्रूवर तुटून पडले.

मग उडालेल्या धमश्चक्रींत अनेक पोलवीरांना कंठस्नान घडलें. अनेक झॅपरोझी वीरांनीं अतुल पराक्रमानें नांव केलें आणि अखेर आतां आपला निभाव नाहीं असें पाहून पोलसेनेनें प्रवेशद्वारें खुलीं करण्याची आरोळी दिली नि ते मागें हटले. ती अजस्त्र दारें खुलीं होतांच, मेंढराच्या कळपासारखेंच तें पोलसैन्य आंत घुसले. कांहीं झॅपरोझींनीं लगट करण्याचा प्रयत्न केला. पण ओस्टॅप ओरडून म्हणाला, 'बांधव हो मागें व्हा, मागें व्हा तटापासून ! त्याची सूचना योग्यच होती. कारण त्याच क्षणी वरून तटावरून त्यांच्यावर दगडविटांचा एकच मारा झाला. त्याचवेळीं पुढें आलेल्या कोशेव्हॉयनें ओस्टॅपची पाठ थोपटली. 'शरीर तरुण पण डोकं मात्र वृध्द आहे हं तुझं !' तो म्हणाला. टारासनेंहि मान वळवून ही शाबासकी कोणाला तें पाहिलें. त्याचे डोळे अभिमानानें चमकले नि तो ओरडला, 'छान, छान निवड केलीत रे गड्यांनो ! आभारी आहे मी तुमचा या बहुमानाबद्दल.'

कोसॅक सैन्य आतां छावणीकडे परतण्याच्या विचारांत होते. इतक्यांत नगराच्या तटावर पोल वीर परत जमलेले त्यांना दिसले. त्यांचा पहिला डाम-डौल आतां पार मावळलेला दिसत होता.

'कां हो, केलेंत का आम्हांला बंदीवान ?' झॅपरोझींनीं खालून आरोळी दिली.

'थांबा, अजून काय पाहिलें आहे तुम्ही ?' तो भीमकाय कर्नल ओरडला.

मग कांहीं वेळ हें असलें वाग्युद्धच केवळ दोन्ही बाजूंनीं चालू राहिलें नि शब्दांच्या, उपहासाच्या तिखट फैरी झडत राहिल्या. पण थोड्याच वेळांत

तेंहि थंडावलें. विश्रांतीसाठीं जो तो जागा पाहूं लागला. कांहीं जखमांना मलमपट्टी करण्यांत गुंतले तर कांहीं मृतांना मठमाती देण्याच्या मागें लागलें पोलवीरांच्या प्रेतांची त्यांनीं विटंबना करण्यास मात्र मागेंपुढे पाहिलें नाहीं. घोडयाच्या शेंपटीला तीं प्रेतें बांधून त्यांनीं त्यांना चाबकानें फटकारून पिटाळलें. दगडधोंडयावरून नि खांचखळग्यांतून आपटत आपटत तीं प्रेतें आतां छिन्नविच्छिन्न होत होतीं नि धुळीनें माखत होतीं.

सारे कोसॅक आतां गप्पागोष्टी करीत आपआपला खाना उरकीत होते. खूप रात्र होईपर्यंत त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. त्यांचें शौर्य आतां इतिहासजमा होणार होतें. वृद्ध टाराम आपल्या लेकाचा, अँड्रेचा विचार करीत होता. शत्रुसैन्यांत त्याला तों कोठें दिसला नव्हता. त्या फितुराला लाज वाटली काय तोंड दाखवण्याची ? कीं तो ज्यू खोटेंच बोलला नि आपला अँड्रे बंदिवान झाला आहे ? पण स्त्रीच्या शब्दांनीं अँड्रे विरघळतो याचीहि त्याला आठवण झाली. संतापानें नि दुःखानें त्याचें हृदय विद्ध झालें. ‘माझ्या पोराला फूस लावणाराचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही पण मी !’ तो दांतओठ खाऊन उद्गारला. त्या कैदाशिणीचा सुंदर नाजुक देह जमिनीवरून फरफटत ओढीत त्यानें रक्तबंबाळ केला असता, पण दैवानें उद्यांसाठीं काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नव्हती. आणि मग निद्रादेवीनें आपले पाश त्याच्यावर टाकले नि तो गाढ झोंपीं गेला.

■ ■ ■ ८ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

दुसरे दिवशीं सूर्योदयानंतर कांहीं घटकांनींच साऱ्या झंपोरोझी वीरांना विचारविनिमयासाठीं एकत्र जमण्याचा हुकूम सुटला. त्यांच्या गांवांकडून अशी बातमी आली होती कीं त्यांच्या गैरहजेरींत तातारांनीं त्यांच्या प्रदेशावर हल्ला चढवून त्यांची सारी चीजवस्त लुटली होती. अनेकांना कंठस्नान

घातलें होतें नि अनेकांना कैद करून नेलें होतें. त्या प्रदेशांतील सारीं गुरें-ढोरेंहि त्यांनीं पार पळवून नेलीं होतीं. कैद झालेल्यांतील एक अॅपरोझी कैदें-तून निसटला होता. ही सारी वार्ता आपल्या बांधवाना येऊन सांगण्या-साठीं त्यानें आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां तीनचार दिवस अहोरात्र घौडदौड केली होती नि आपल्या मांडीखालीं तीन घोडीं ठार केलीं होतीं. नुसत्या जमिनीवरच तो आतां मेल्यासारखा गाढ झोंपीं गेला होता.

अशा प्रसंगीं कोसॅकांची पद्धत म्हणजे शत्रूचा तांतडीनें पाठलाग करायचा नि शक्य तर आपल्या बंदिवान बंधूंच्या कपाळाची गुलामगिरी टाळावयाची. अतिदूरच्या प्रदेशांत हे बंदी गुलाम म्हणून विकले जात असत. म्हणूनच ही तांतडीची सभा भरली होती. आज साऱ्यांच्या मस्तकावर टोप्या होत्या. कारण जमातमुख्याकडून आदेश घेण्यासाठीं नव्हे, तर बरोबरीच्या दर्जानें विचारविनिमयासाठींच ते आज असे एकवटले होते.

‘ प्रथम वयोवृद्धांना सल्ला देऊं द्या ! ’ कांहीं जण ओरडले.

‘ तुम्हींच बोला कोशेव्हॉय ! ’ दुसरे ओरडले.

म्हणून मग कोशेव्हॉयनें मस्तकावरील टोपी दूर करून बोलण्यास प्रारंभ केला.

‘ आपल्यांत अनेक वृद्ध आणि धोरणी लोक आहेत, पण तुमच्या आदेशा-प्रमाणें मींच आधीं बोलतों. मला वाटतं तार्तारांचा तावडतोब पाठलाग करावा. आपण शत्रूला नीट ओळखतों. विलंबानं आपल्या हातीं कांहींच लागणार नाहीं. इथल्या शत्रूची आपण चांगलीच उपासमार केली आहे नि तसा सूडहि घेतला आहे आपण. तर मला वाटतं आपण पाठलाग करावा आधीं. ’

‘ चला, चला, निघू या आपण ! ’ असा एकच प्रचंड ओरडा झाला.

पण टारास बल्बाला हा सल्ला रुचला नाहीं. त्याच्या कपाळावर आंठ्या पसरल्या नि ‘ अं हं, तुमचा सल्ला युक्त नाहीं, ’ असें तो म्हणाला. ‘ आपले कांहीं लोक या पोल लोकांच्या बंदींत आहेत हें तुम्हीं विसरलेले दिसतां. त्यांना मृत्युमुखांत लोटणं, त्यांचे हालहाल होऊं देणें, हें आपल्याला, त्यांच्या बांध-वांना शोभत नाहीं. आपल्यासारखेच सर्वस्वावर पाणी सोडून आलेले ते

बांधव, असे कुत्र्याच्या मौतीनं मरूं देणं–अरे, कोणत्या अवलादीचे आहांत रे तुम्ही ? जमातीच्या नांवाची चाड नाहीं तुम्हांला ? बस्स–कोणी कांहीं म्हणा, मी राहणार मागें एकटाच ! '

सारे झॅपरोझी द्विधाचित्त होऊन चुळबुळूं लागले.

' माझ्या वीर मित्रा! पण तार्तारांच्या हातांतील बंदींचं काय? ' कोशेव्हॉयनें विचारलें. ' त्यांना विसरलेले दिसतां तुम्ही. गुलाम म्हणून पिचूं द्यायचे जन्मभर त्यांना ? क्रूरांतील क्रूर मरणाहूनहि तें भयंकर ! नि त्यांनीं लुटून नेलेली आपली सारी चीजवस्त नि संपत्ति ? '

सारे कोसॅक आतां विचारांत पडले. काय बोलावें तें कोणाला समजेना. पण मग कासियन बोव्हडियुग पुढें आला. कोशेव्हॉयपद दोनदां उपभोगलेल्या हा सर्वांत वयोवृद्ध योद्धा. वृद्धत्वामुळें तो आतां प्रत्यक्ष दोन हात करीत नसला तरी सैन्याबरोबर स्वारीवर तो नेहमीं निघायचाच. कोसॅक पद्धतीप्रमाणें त्यानें आपला हात उंचाऊन हलवला नि मग म्हणाला, ' काय लागेल तें होवो, मी येणार तुमच्याबरोबर. या हाडांचा अजूनहि होईल उपयोग माझ्या जमातीला ! '

सारे कोसॅक स्तब्धपणें त्या वयोवृद्धाचें भाषण ऐकत होते. पुष्कळच दिवसांनीं त्यानें आज तोंड उघडलें होतें नि म्हणूनच प्रत्येकजण उत्सुकतेनें ऐकत होता.

' ऐका रे पोरांनो या म्हाताऱ्याचं आज,' तो बोलत होता, ' आपल्या कोशेव्हॉयचा सल्ला शहाणपणाचा आहे. आपला खजिना हा परत मिळवलाच पाहिजे. आणि कर्नल टारासचंहि म्हणणं खरं आहे. कोसॅकांनीं आपल्या बांधवांचा विश्वासघात केला असं माझ्या हयातींत मी ऐकलं नाहीं. इथं थोडे कीं फार हा मुद्दा नाहीं. सारे आपले बांधवच आहेत. तर माझं म्हणणं असं–कांहींनीं तार्तारांच्या पाठीवर जावं नि इतरांनीं इथं राहून झुंज द्यावी. कोशेव्हॉयनीं तार्तारांशीं सामना द्यावा नि उरलेल्यांनीं टारास बल्बाच्या आधिपत्याखालीं इथं लढावं. बल्बाच्या तोडीचा दुसरा वीर नाहीं असं या पांढऱ्या केसांना ठामपणें वाटतं. एक अजोड वीर आहे तो ! '

बोव्हडियुग थांबला. त्याच्या बोलण्यानें सारेजण आनंदित झाले. साऱ्यांनीं आपल्या टोप्या उडवल्या नि ते ओरडले, ' वाहवा, वाहवा !

आपलं मौन सार्थ केलंत तुम्ही–मोलाचे शब्द बोललां तुम्ही–खराच झाला तुमचा उपयोग तुमच्या कोसॅक बंधूंना !'

'मग, साऱ्यांना पसंत आहे हें ?' कोशेव्हॉयनें विचारलें.

'होय, होय पसंत आहे.' साऱ्यांनीं आरोळी दिली.

'मग बैठक खलास आतां. पण आतां माझा हुकूम ऐका नीट.' कोशेव्हॉय पुढें येऊन नि मस्तकावर टोपी चढवून म्हणाला. आणि सारे कोसॅक आपल्या पद्धतीप्रमाणें टोप्या काढून नि खालीं नजर लावून त्याचा हुकूम ऐकूं लागले. 'माझ्या बंधूंनो, आंता दोन विभाग होऊं द्या तुमचे. जाणारे उजवीकडे नि इथंच थांबणारे डावीकडे व्हा.'

या हुकुमाप्रमाणें सारे कोसॅक उजवीकडे किंवा डावीकडे असे जाऊन उभे राहूं लागले नि असें दिसलें कीं दोन्हीहि बाजू जवळजवळ सारख्याच होत्या. जशा संख्येंत तशा शौर्यांतहि दोन्ही बाजू सारख्याच दिसत होत्या. दोहींकडेंहि आघाडीचे वीर होते, 'पोल सेनेच्या शौर्याची चव घेतली, आतां तार्तारांच्याच पाठीवर जाऊं या बदल म्हणून', अशा विचाराचेहि कांहीं कोसॅक वीर होते. तर कांहींनीं तार्तार नि तुर्कसेनेला अनेक वार नि अनेक ठिकाणीं मनमुराद पाणी पाजलें असल्यानें मागें राहून चालू लढाईचाच सोक्षमोक्ष लावण्यास ते आतुर होते. येथें राहूनच आपल्या नांवाचा डंका वाजविण्याची त्यांची इच्छा होती. आपल्या बांधवांचा बदला नि कोसॅक धर्माचा जयजयकार हाच त्यांचा एकमेव विचार.

'माझीं हीं म्हातारीं हाडं कांहीं मला तार्तारांच्या मागें धावूं देणार नाहींत. पण इथं मात्र मी वीरमरण मिळवूं शकेन;' वृद्ध बोव्हडियुग म्हणाला. 'धर्मासाठीं लढतां लढतां मरण यावं, अशीच माझी देवाला सदाची विनवणी आहे. नि तशी वेळहि आली आहे आतां–वृद्ध कोसॅकाला अधिक भाग्याचं तें काय ?'

कोसॅकांचे ते दोनहि विभाग समोरासमोर उभे राहतांच कोशेव्हॉय दोहोंच्या मध्यभागीं उभा राहून म्हणाला, 'माझ्या बंधूंनो, दोनहि बाजू एकमेकांवर खूष आहांत ना ?'

'होय, बॅटको, खूष आहोंत !' सारे कोसॅक ओरडले,

' मग एकमेकांचं चुंबन घेऊन प्रेमानं निरोप घ्या एकमेकांचा. कारण परत सर्वांच्या भेटीगांठी होतील कीं नाहीं, हें कोणीं सांगावं ! आणि आपल्या नायकांचे हुकूम कसोशीनं पाळा सारे. पण वेळप्रसंगीं आपल्या कोसॅक धर्मासाठीं, नांवलौकिकासाठी जें योग्य वाटेल तेंच करा.'

तेथें गोळा झालेल्या साऱ्या कोसॅकांनीं मग एकमेकांचा चुंबनपूर्व हस्तांदोलनानें निरोप घेतला–प्रथम गटनायकांनीं नि मग इतर सैनिकांनीं. ' परत भेट होणार काय बंधो ? ' असाच भाव सर्वांच्या मुखांवर उमटला होता. पण बोलत मात्र कोणीच नव्हतें. सर्वांच्याच पुढें आतां अवघड असेंच कार्य उभें होतें. तरीहि काळोख पडेपर्यंत जाणाऱ्या तुकडयांनीं छावणी सोडली नाहीं. आपलें मनुष्यबळ कमी झालें आहे हें शत्रूला कळूं नये, हाच त्यांतला हेतु होता.

जेवणींखाणीं उरकतांच जाणारे लोक विश्रांतीसाठीं आडवे झाले. इतकें निर्धास्तपणें परत कधीं झोंपायला मिळेल, कोण जाणें ! सूर्य अस्तास जाईपर्यंत त्यांची ही विश्रांति चालू होती. नि मग सूर्य मावळून चहूंकडे काळोख दाटतांच त्यांनीं आपल्या गाडयांच्या चाकांना तेल दिलें नि सारी तयारी होतांच त्यांच्या सामानाच्या गाडया चालूं लागल्या. परत एकदां साऱ्यांचा निरोप घेऊन आधीं पायदळ नि मागें घोडदळ असे ते कोसॅक वीर चालूं लागले. त्यांच्या जाण्याचा कसलाच आवाज झाला नाहीं नि थोडयाच वेळांत काळोखाच्या पोटांत ते अदृश्यहि झाले.

मागें राहिलेले त्यांचे दोस्त किती वेळ तरी त्यांच्या दिशेनें हात हालवीत उभे होते. आणि मग, आतां वर उजळलेल्या अनंत तारकांच्या प्रकाशांत त्यांनीं छावणीकडे नजर टाकली. अर्ध्याअधिक गाडया गेल्या नि किती किती तरी जीवाभावाचे दोस्त आपल्यांत नाहींत असें त्यांनीं पाहिलें. त्यांचीं मनें जड, उदास झालीं. त्यांचें नेहमींचें निरागस हास्य त्यांच्या मुखावरून मावळलें होतें नि विचारांत गढलेलीं मस्तकें खालीं वाकलीं होतीं.

सैन्यांत पसरलेला तो विषण्णपणा टारासनें पाहिला 'शूरवीरांना न शोभणारा हा विषण्णपणा !' त्याच्या मनांत आलें. पण त्यानें कांहीं न बोलतां त्यांना कांहीं वेळ तसेंच राहूं दिलें. ताटातुटीचे हे प्रसंग साऱ्यांनीं अनुभवलेच

पाहिजेत नि त्यांची संवयही झाली पाहिजे. तरीहि या उदासीनतेंतून त्यांची वीरवृत्ति जागी करण्यासाठीं, कोसॅकी रणगर्जना करण्याची त्यानें तयारी सुरू केली. प्रशांत बनलेल्या या महासागरावर भीषण लाटांची कठोर गर्जना उठलीच पाहिजे, म्हणून त्यानें आपल्या खास तळघरांतील दारूच्या पिपांचीं तोंडें खुलीं करण्याची आज्ञा दिली. कारण इतिहासांत चिरस्मरणीय ठरेल असा प्रसंग आतां नजीक आला होता.

' हं, चला दोस्त हो, प्या, मनमुराद प्या आतां ! ' ओळी करून बसलेल्या कोसॅकांना टारास म्हणाला. ' पण आरंभ करण्यापूर्वी माझे चार शब्द ऐका. ही मेजवानी तुम्हीं मला नायक निवडलेंत म्हणून नाहीं आहे–म्हणजे हा बहुमान लहान सहान नाहीं हें निश्चित. पण त्यासाठीं मजा करण्याचा हा प्रसंग नव्हे. आपल्यासमोर उभी असलेली झुंज तुमच्याकडून पराक्रमाची शिकस्त अपेक्षीत आहे ! तर दोस्त हो, हा पहिला कप सद्‌धर्माच्या नांवानें– सारें जग ख्रिश्चन करूं या आपण. दरसाल आपले वीर नि त्यांच्यामागून त्यांचे सुपुत्र असेच मोहिमा करून या काफरांना नामशेष करूं या, नि आपलं नांव, कीर्ति अमर करूं या. आपल्या पूर्वजांची कीर्ति अकलंकित होती. कोसॅक भ्रातृभाव त्यांनीं अविचलित असाच सदा ठेवला नि तसाच तो राहो. चला उचला तर प्याला धर्माच्या नांवानें ! '

' धर्माच्या नांवानें ! ' असा प्रचंड आवाज घनगंभीर असा चहूंकडून उसळला. वृद्ध नि तरुण साऱ्यांनीं धर्माचा एकच जयजयकार केला.

' आतां आपल्या मायभूमीला ! ' आपला हात उभारून टारासनें आरोळी दिली.

' मायभूमीला ! ' परत प्रचंड बुभु:कार झाला.

सुदूर अंतरावरील त्यांच्या गवताळ मायभूमीनेंहि त्यांच्या त्या बुभु:काराचे नाद-पडसाद ऐकले.

' आणि आतां शेवटीं, बंधू हो, आपल्या नांवलौकिकाला नि साऱ्या ख्रिस्ती जनतेला ! '

परत एकदां पूर्ववत् जयजयकार करीत साऱ्या कोसॅकांनीं प्याले झोकले. त्यांच्या त्या प्रचंड जयनादाचे साद-पडसाद किती तरी वेळ सारा आसमंत घुमवीत राहिले.

साऱ्या कोसॅकांचे नेत्र आतां उल्हासानें चमकत होते नि डोक्यांत अनंत विचार उसळले होते. उत्तुंग गिरीशिखरावर आरूढ होऊन समोर पसरलेल्या अनंत विस्ताराकडे एखाद्या पक्षिराजानें पाहात राहावें तसेच ते सारे कोसॅकवीर समोर पसरलेल्या त्या अथांग गवताळ मैदानाकडे पाहात होते. भविष्यकाळ त्यांच्या डोळ्यासमोर अंधुक अंधारल्यासारखा दिसत होता. कदाचित हीं मैदानें त्यांच्याच हाडामांसांनीं विखुरलीं जातील. मोडक्या तोडक्या गाड्या नि मोडक्या तलवारी नि भाले विखुरलेले दिसतील. मृत शरीरांचे लचके तोडण्यासाठीं गिधाडांचे थवे चीत्कारत आकाशांत फिरत राहतील. पण मृत्युदैवताच्या या रंगभमीवरच अमर कीर्ति निनादूं लागेल नि त्यांच्या वीरकृत्यांचे पवाडे वृद्ध शाहीर माना तुकवीत झुलवीत मोठ्या अभिमानानें गात राहतील. आणि अशा रीतीनें त्यांचा कीर्तिसौरभ साऱ्या जगाच्या दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांतून दरवळत राहील. कीर्तीचा हा घंटानाद मानवजात उन्नत करीत सदा घुमत राहील.

## ९

वेढा घालून बसलेल्या झॅपरोझींपैकीं कांहीं भाग तार्तारांच्या पाठलागासाठीं निघून जात असतां तटावरील टेहेळ्यांनीं पाहिला होता. पण ते सारे पलीकडील झाडींत दबा धरून बसण्यासाठींच गेले आहेत, असाच त्यांचा समज झाला होता. नि तोच समज साऱ्या नगरांतहि पसरला होता. पण थोड्यांच दिवसांत कोशेव्हॉयचा अंदाज खरा ठरला नि नगरांत परत अन्नाची टंचाई तीव्रपणें भासूं लागली. त्या परिस्थितीत कांहीं उतावळ्या पोल सैनिकांनीं एक दिवस झॅपरोझी अन्नसांठ्यावर अचानक हल्ला चढविला. पण जागरूक झॅपरोझी सेनेनें त्या साऱ्या सैनिकांना कापून काढलें. पण या कांहीं घटकांच्या भाऊगर्दींत नगरांतील कांहीं महाधूर्त अशा यहुदी

लोकांनीं तटाबाहेर पडून नगरांतील लोकांना दिलासा मिळेल अशी माहिती मिळवली. निम्मेअधिक गनीम वेढा सोडून गेले या खात्रीलायक बातमीनें सेनाधिकाऱ्यांस बराच धीर आला. त्यांनीं तटाबाहेर पडून लढाईचा सोक्षमोक्ष लावण्याचा विचार केला नि आपल्या तयारीला जारीनें सुरवात केली. टारासनेंहि यापासून योग्य ती सूचना घेतली नि आपलीहि जय्यत तयारी सुरू केली. आपल्या सैनिकांची तिहेरी रांग तयार करून त्यांच्या पाठीशीं आपल्या वारदानी गाड्यांची अवजड रांग लावून एक भक्कम अशी जणुं तटबंदीच त्यानें उभारली. शिवाय दोन तुकड्या दबा धरून बसवून आयत्या वेळीं ताज्या दमाच्या मदतीचीहि तरतूद त्यानें करून ठेवली. आणि हें सारें कांहीं मनासारखें होतांच त्यानें आपल्या सैनिकांना उद्देशून एक भाषण केलें त्यांना धीर देण्यासाठीं किंवा चेव आणण्यासाठीं म्हणून नव्हे; कारण त्यांच्या शौर्याबद्दल, वीरश्रीबद्दल नि उत्साहाबद्दल त्याची पुरी खात्री होतीच– तर केवळ आपलें हृदय मोकळें करण्यासाठींच तो आतां बोलत होता.

‘ माझ्या वीर देशबंधूंनो ! आपल्यांतील भ्रातृभावाचं अतूट बंधन तुमच्या परिचयाचं आहे. आपल्या पिढ्यान् पिढ्यांपासून त्याचा चालू वारसा आपल्याकडे आला आहे. त्या काळांत फार मोठा असा आपला नांव-लौकिक दूरवर पसरला होता. आपलीं नगरं संपन्न होतीं. धनंतर देवालयं आपल्या मालकीचीं होतीं नि आपल्याच रक्ताचे राजे इथं नांदत होते. पण हें सारं आपल्याजवळून लुबाडलं गेलं, सारं कांहीं नष्ट झालं. आपण पोरके झालों नि आपली मातृभूमि विधवा झाली. या अवनत काळीं, बंधूंनो, आपण सारे एकत्र येऊन बंधुभावाच्या दृढ बंधनानं दृढबद्ध झालों. या भावनेवरच सारी झॅपरोझी जमात उभी आहे ! याहून अधिक पवित्र अशी भावनाच नाहीं. हें केवळ रक्ताचं, प्रेमभावनेचं बंधन नाहीं प्रेम पशुहि करतात. पण रक्तापेक्षां आत्म्याचं बंधन एक फक्त माणूसच उमजूं शकतो. हें भ्रातृबंधन जगांत इतरत्रहि आहे. पण या रशियन संतानांसारखं मात्र तें दुसरं कोठं खासच नाहीं. प्रेम सगळेच करतात, पण आपलं प्रेम हें खरखुरं आत्मिक आहे. आंतरिक तळमळींतूनच याचा जन्म आहे.’ तो थोडा वेळ थांबून मग परत बोलूं लागला. ‘ दुर्दैवानं इतर जमातींतील

स्वार्थ आपल्यांतहि आजकाल थोडाफार दिसूं लागला आहे, याची मला जाणीव आहे. आपल्याच बांधवांत मिसळण्याची, त्यांच्याशीं बोलण्याचीहि कांहींना लाज वाटूं लागली आहे. परकी सत्ताधीशांची लाथ देखील त्यांना भ्रातृभावापेक्षां अधिक गोड वाटत आहे. पण, या नीचांतल्या नीचांतहि खरंखुरं रशियन तेज कुठंतरी खास जिवंत आहे. नि एक दिवस मनांत खंत वाटून तें उफाळून वर उठेल नि कृतकर्माचें प्रायश्चित्त आपल्या बलिदानानं घेईल

टारासचें भाषण संपलें. पण त्याचा शब्द न् शब्द त्याच्या श्रोत्यांच्या हृदयालाच जाऊन भिडला होता. कांहीं वृद्धांच्या नेत्रांत तर अश्रु उभे राहिले होते. नि प्रत्येकाचें हृदय कांहीं विलक्षण अशा भावनांनीं दाटून आलें होतें.

याच वेळी तटाच्या आंतून रणदुंदुभींचा नाद चहूंकडे घुमूं लागला नि तटाचीं दारें उघडून .शत्रुसैन्यांतील घोडदळ नि पदाती बाहेर पडूं लागले. सारें सैन्य बाहेर येतांच त्या धिप्पाड सेनानायकानें सेनेची एक भक्कम फळी धरून कोसॅक सैन्यावर जोरानें चाल केली.

पल्लेदार बंदुकांनीं सज्ज असलेल्या पोलवीरांना पाहतांच कोसॅकांनीं आपल्या लहान तोफांचा अखंड माराच त्यांच्यावर सुरू केला. त्या अखंड वर्षावानें तो सारा भूभाग अखंड निनादत होता. सारें वातावरण धुरानें भरून गेलें. त्या अविरत अग्निवर्षावानें पोलिश सैन्य चकित झालें. घनदाट अशा त्या धुरांत माणसाला माणूस दिसेनासें झालें नि पोल सैनिकांच्या रांगांत भगदाडें पडत असल्याचें मागील रांगांना दिसूं लागलें. पण त्या मानानें कोसॅकांची प्राणहानि फारच थोडी होती. पोल किंचित मागें हटले तरी कोसॅक अग्निवर्षाव अखंड चालूच होता. तें पाहून पोल सेनापतीनें तोफांचीं तोंडें खुलीं करून मारा करण्याचा हुकूम दिला. तोफांचा भीषण गडगडाट तात्काल सुरू झाला त्या दणदणाटानें तो सारा प्रदेश कंपायमान झाला. धुराचे प्रचंड लोट वर उसळूं लागले. माणसाला माणूस दिसेना. सर्वत्र एकच कोलाहल माजून राहिला.

याच वेळीं दूर उभ्या असलेल्या टारासच्य लक्षांत आलें कीं आपल्या सेनेच्या दोन तुकड्या प्राणसंकटांत आहेत. त्याबरोबर त्यानें मेघगर्जनेसारखी

आरोळी दिली, ‘दूर व्हा, दूर व्हा, गाड्यांजवळून नि घोड्यांवर स्वार व्हा एकदम ! पण याच वेळीं ओस्टॅपनें निधड्या छातीनें पुढें घुसून शत्रूच्या तोफखान्यावरील पांचसहा गोलंदाजांच्या हातांतील चुडी फटकारून खालीं पाडल्या नसत्या तर त्या दूरच्या कोसॅकांना टारासचा हुकूम पाळतांच आला नसता. तरीहि ओस्टॅपला आपलें काम पूर्ण करतां आलें नाहीं. पोलिश वीरांनीं त्याला मागें रेटलें आणि त्याच वेळीं त्यांची प्रचंड मुलूखमैदान तोफ कांहीं भयंकर अशी आग ओकूं लागली. इतर तोफांचा धडाका चालूच होता. त्या भीषण अग्निवर्षावाखालीं असंख्य कोसॅक वीर गारद झाले.

या भयानक संहारानें कोसॅकांच्या हृदयांत संतापाचे कल्लोळ उसळले. आपली अर्धीअधिक पलटण कापून काढलेली पाहून कुकुवेकोचें तर देहभानच हरपलें. डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच आपले उरले सुरले सैनिक घेऊन नि भीषण आरोळी ठोकून तो बेभानपणें शत्रुसैन्यांत घुसला. वाटेंतल्या सार्‍यांना कठस्नान घालून किंवा खालीं लोळवून त्यानें तोफखाना गांठून एक तोफ बंद पाडली. त्याच घडीला त्याचे दुसरे दोस्त ती मुलूखमैदान बंद पाडण्याच्या बेतांत होते. तें पाहतांच त्यानें मोहरा फिरवून दुसरीकडे मुसंडी मारली नि वाटेंत येईल त्याला कापीत तो पुढें चालला.

त्याच्या दोस्त डेगटिअॅरोंको अनेकांना कंठस्नान घालून रक्तानें न्हालेला, एका पोलीश उमरावाशी भिडला होता. पण थकल्यामुळें त्याला आपल्या त्या चपळ प्रतिस्पर्ध्याला मागें रेटतां येत नव्हतें. नि म्हणूनच तो उमराव गर्जना करीत होता, ‘कुठल्या कोसॅक कुत्र्याची छाती आहे माझ्याशी दोन हात करण्याची ?’

‘ही माझी आहे बघ !’ पुढें उडी घेत मोसिलशिलो गरजला. पिळदार शरीराचा हा वीर अनेकदां तुर्कांच्या तडाक्यांत सांपडून निसटला होता. टोळीनायक म्हणून त्याची निवडहि अनेकदां झाली होती. पण मोठा विलक्षण दारूशौकीन–त्यासाठीं तुरुंगवासहि भोगला होता त्यानें. पण निधड्या छातीचा वीर म्हणूनच त्याची जमातींत प्रसिद्धि होती.

‘अरे मीच काय, कोणीहि कोसॅक पाजील तुला पाणी, समजलास कुत्र्या !’ प्रतिस्पर्ध्यावर हल्ला चढवीत तो म्हणाला.

त्यांचें द्वंद्व मोठें प्रेक्षणीय होतें. घे घे करीत ते परस्परांवर वार करीत होते नि चपळाईनें चुकवीत होते. पण अखेरीस शिलोच्या एका प्रचंड घावानें त्या पोल उमरावाचें शिरस्त्राण छिन्नविछिन्न होऊन तो मूर्छित होऊन खालीं पडला. शिलोचे प्रहार चालूच होते. ' हं, चल आटप चटकन कोसॅक ! पण जरा मागें वळून पाहा.' पण तो मागें वळण्यापूर्वींच पोल सरदाराच्या सेवकाचा खंजीर त्याच्या मानेंत खोल घुसला; नि शिलोची तलवार त्याच्या पोटांत घुसण्यापूर्वींच सभोंवारच्या धुराच्या वेटोळ्यांत तो अदृश्य झाला. सभोंवार तोफांचा गडगडाट चालूच होता. शिलोची जखम प्राणांतिकच होती. खाली कोसळतां कोसळतां त्यानें ती जखम दाबून धरली नि आपण आतां जगत नाहीं हें उमजून शिलो आपल्या दोस्तांना म्हणाला, ' राम राम, दोस्त हो, राम राम ! माझ्या मायभूमीचा सदा विजय असो— ती अमर राहो, तिची कीर्ति दिगंत पसरो ! ' आणि डोळ्यांपुढें अंधार दाटत असतां त्यानें डोळे मिटले नि त्याचें जीवपांखरूं त्या कणखर देहांतून दूर उडालें.

पण इतर झॅपरोझी तुकड्या निधड्या छातीनें शत्रुसैन्यांत घुसतच होत्या नि त्यांची दाणादाण उडवीत होत्या.

' आतां काय दोस्तांनो ? ' टारासनें जवळच्या नायकांना विचारलें. दारूगोळा संपला नाहीं ना अजून ? नि आपलं सामर्थ्यहि शाबूत आहे— कोसॅक कधीं शरण नाही जात ! '

' आहे, दारूगोळा आहे—कोसॅक सामर्थ्यहि शाबूत आहे ! कोसॅक कधीं शरण जात नाहीं. ! '

कोसॅकांनी गर्जना केली आणि त्यांनीं मोठ्या त्वेषानें शत्रूवर परत हल्ला चढविला. त्यांनीं त्यांची फळी पार विस्कळित केली. पोल सेनानीनें आपल्या खुणेचा बावटा उंच उभारला नि सारे पोल चहूंकडून धांवत धांवत त्या ध्वजाभोंवतीं गोळा झाले. त्यांनीं परत नवी फळी धरली पण कोसॅकांच्या रेट्यापुढें त्यांचा निभाव लागेना. पण तरीहि ते झुंजतच होते. त्यांचा तो विशालदेह दुय्यम सेनानी, स्टीपन गुस्का या कोसॅक वीरांशीं भिडला होता. पण थोड्याच खणाखणीनंतर गुस्काच्या आडदांड भालाफेंकीनें त्याचा

देह जमिनीला खिळला गेला नि गुस्का विजयानंदान गरजणार तोंच त्याचाहि देह चार भाल्यांच्या फाळांनीं जागच्या जागींच रोधला गेला. पण त्यानें अखेरची अशी गर्जना केली–' साऱ्या दुष्मनांचा नायनाट होवो नि माझी मायभूमि सदा सुखांत नांदो !

पण आतां कोसॅक वीरांची संख्या हळूहळू घटत होती. तिकडे गाड्यां-जवळ झुंजत असलेला वॉव्हडियुग एका गोळीला बळी पडून ' मातृभूमीच्या जयजयकार असो ! ' असें गर्जत आपल्या वीर पूर्वजांना आनंद देण्यासाठीं स्वर्गसोपानाची पायरी चढूं लागला होता. त्याच्या पाठोपाठ वीर बल्बन जबर जखमी होऊन, देहाची चाळण झालेला असा रणशय्येचा आश्रय घेत होता. अनेक युद्धांत विजयश्री खेंचून आणणारा हा महावीर ॲनाटोलियाच्या किनाऱ्यावर त्यानें घातलेली धाड म्हणजे अजोड पराक्रमाची, चातुर्याची, चिकाटीची वीरगाथाच. तो वीर आतां स्वर्गद्वाराशीं उभा होता. ' दोस्तहो, मला वाटतं माझी घटका भरली. पण माझं काम मीं कसोशीनं केलं आहे. अनेक गनीम मीं गारद केले आहेत–मोजमापच नाहीं त्यांचं म्हणा ! जय मातृभूमि ! तुझा सदा विजय असो ! ' त्यानें प्राण सोडतांना गर्जना केली नि सारें शांत झालें.

' कोसॅक वीर हो ! धांवा, तुमच्या शौर्यवीर्याचं हें मौल्यवान रत्न वीर कुकुबेंको प्राणसंकटांत आहे. शत्रूचा गराडा पडला आहे त्याच्या भोंवतीं त्याचे संवगडी गारद झाले आहेत सारे नि उरले सुरलें सर्वांग रक्तानें न्हालेले आहेत–त्यांची ताकद खलास झाली आहे.'

त्याची ती अवस्था पाहून टारासनें तिकडे धांव घेतली. पण टारास येऊन पोंचण्यापूर्वीच शत्रूच्या तिखट भाल्याच्या फाळानें कुकुबेंकोच्या हृदयाचा वेध घेतला नि त्याचा देह टारासच्या बाहूंत कोसळला. एखाद्या निष्काळजी सेवकाच्या हातून सांडलेल्या उंची मद्याप्रमाणें त्याचें तरुण रक्त वेगानें बाहेर वाहत होतें. ' प्रिय बंधूंनो, तुमच्या सान्निध्यांत, तुमच्या साक्षीनं येत असलेल्या या वीरमरणाबद्दल मी देवाचा ऋणी आहें. तुमचं साऱ्यांचं भाग्य अधिक वैभवाचं होवो; नि ही ख्रिस्ताची धर्मभूमि, ही रशियन भूमाता सदा सौंदर्यांत न्हात राहो ! '

कुकुवेंकोच्या मरणानें सारे कोसॅक उदास झाले. अनेक रणझुंजार आतां उभे दिसत नव्हते.पण तरीहि सैनिक रणभूमीवर ठाम पाय रोवून उभेच होते.

' कोसॅक वीर कधींच हटत नाहींत, बंधूंनो ? ' टारास आपल्या लोकांना अनुलक्षून ओरडला.

' नाहीं, कधींच हटत नाहींत ! ' प्रत्युत्तर गर्जत आलें.

आणि कोसॅकांनीं परत एकदां हल्ला चढवला. चहूंकड आतां प्रेतांचा खच पडला होता नि रक्ताचे पाट सर्वत्र वाहत होते. टारासनें वर आकाशाकडे दृष्टि टाकली. गिधाडांचा एक थवा आतुरतेनें वर तरंगत होता. केवढी मेजवानी मिळणार आज त्यांना ! कोसळला, गुस्का कोसळला खालीं. ' हं, चला ! ' टारासनें रुमाल उंच उडवीत इशारा दिला. ओस्टॅपनें ती खूण पाहिली आणि आपल्या दबा धरून बसलेल्या लोकांसह तो शत्रूच्या अंगावर तुटून पडला. ताज्या दमाच्या या हल्ल्यापुढें पोलसेनेचा निभाव न लागून ते कोसॅक गाड्यांच्या दिशेला मागें सरकूं लागले आणि त्यांचा एकच गोंधळ उडाला. याच मोक्याच्या क्षणीं गाड्यांच्याहि मागें उभ्या असलेल्या कोसॅकांनीं त्यांच्यावर गोळ्यांची एक दणदणीत फैर झाडली. झालें. शत्रूची एकच दाणादाण उडाली. या दृश्यानें कोसॅकांना मोठाच धीर आला नि तुताऱ्या फुंकीत त्यांनीं चहूंकडून एकच गर्जना केली, ' जिंकलों. आम्ही जिंकलों ! '

' नाहीं, अजून नाहीं ! ' नगराच्या दारांकडे दृष्टि टाकीत टारास उद्गारला. आणि खरेंच होतें तें. कारण तीं बंद दारें उघडून त्यांतून हुस्सार घोडेस्वारांची एक पलटण बाहेर पडत होती. अगदी निवडक अशा शिपायांचीच ती तुकडी होती त्यांच्या आघाडीला एक उमदा जवान सुंदर सरदार दिसत होता. त्याला पहातांच टारास अगदीं दिङ्मूढ होऊन गेला. त्याचा अँड्रे होता तो! युद्धाच्या एकाच भावनेनें धुंद झाल्यासारखा तो दिसत होता. भेदरट ससांमागें बाणासारख्या सुटलेल्या एखाद्या सुंदर ग्रेहाऊंड कुत्र्यासारखाच सणसणत तो शत्रूवर तुटून पडत होता. तलवारीच्या सफाईदार हातानें आपल्या दोहीं बाजूंनीं वाट मोकळी करीत चाललेल्या आपल्या लेकाचें तें कौशल्य टारास एक क्षणभर स्तब्ध उभा राहून पहात होता. पण मग न राहवून तो ओरडला, ' अरे, आपल्याच बांधवांवर ? अरे, आपल्याच भाऊबंदांचे मुडदे पाडणार काय रे, ए सैतान! '

पण अँड्रेला समोरचें कांहीं दिसत नव्हतें. शत्रु किंवा भाऊबंद–त्याच्या दृष्टीसमोर विधात्याची ती अनुपम कृति, तो हिमधवल देह, ते रेशमी कृष्ण-कुंतल नि ते वेड लावणारे त्या सरदारकन्येचे डोळेच काय ते तरळत होते.

'अरे ए पोरांनो ! त्याला कोणी झुलवीत न्या रे पलीकडे आपल्या मागून–माझ्यासाठीं !' टारासनें आरोळी दिली. त्याबरोबर डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोंच तीस जवानांनीं त्या हुस्सारांच्या पाठीवर जाऊन बगल हल्ला चढवला नि पुढले स्वार पिछाडीपासून पार अलग करून टाकले. एक कोसॅक वीर पुढें झाला आणि त्यानें आपल्या तलवारीचा चपटा फटका अँड्रेच्या पाठीवर सणसणीत ठेवून दिला. आणि मग एकदम तोंड वळवून ते मोठ्या वेगानें मागें पळत सुटले. अँड्रे रागानें बेभान झाला. त्याची शीर न शीर थाडथाड उडूं लागली. त्यानें मोठ्या त्वेषानें घोड्याला टांच दिली नि आपल्या मागून कोणी येतो आहे कीं नाहीं हें न पाहतां तो कोसॅकांच्या मागें पळत सुटला. फक्त पंधरावीस लोकच त्याच्या पाठीमागून येत होते. कोसॅकांचे घोडेस्वार मागल्या झाडीच्या रोखानें मोठ्या वेगानें पळत होते. तितक्याच वेगानें नि तडफेनें त्याच्या पाठीवर येणारा अँड्रे आतां त्याच्या म्होरक्याला गांठणार तोंच त्याच्या घोड्याची लगाम कोणाच्या तरी बळकट हातानें खेंचली गेली. अँड्रेनें एकदम मोहरा वळवला. त्याच्यासमोर टारास उभा होता. त्याच्या सर्वांगाला कंप सुटला नि त्याचा चेहेरा पांढराफटक पडला.

एखाद्या शाळकरी पोरानें आपल्या वर्गबंधूंना अविचारानें खिजवावें नि मग त्या सर्वांनीं सतावल्यामुळें वेडापिसा होऊन त्यांना पिटण्यासाठीं त्यांच्या मागून धांवत सुटावें. त्याचक्षणीं वर्गांत शिरत असलेल्या शिक्षकांची धडक बसावी नि त्याचा सारा संताप, आवेश जागच्या जागीं क्षणार्धांतच जिरून जावा. तीच गत अँड्रेची झाली. त्याचा सारा संताप पार जिरून गेला नि त्याला फक्त आपल्या पित्याची ती रौद्र मूर्तीच काय ती समोर दिसूं लागली.

'हं, आतां काय करायचं आपण?' त्याच्यावर दृष्टि रोखून टारास म्हणाला.

पण कांहींच उत्तर न देतां अँड्रे खालीं मान घालून स्तब्ध उभा होता.

'केली का कांहीं मदत पोरा तुला पोलसनीं ?'

अँड्रेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

'तर आपल्या धर्माचा विश्वासघात केलास नव्हे तूं ? नि आपल्या बांधवांचाहि ? ठीक तर ! खालीं उतर घोड्यावरून !'

एखाद्या आज्ञाधारक लहान मुलाप्रमाणें तो खालीं उतरला. टारासमोर तो अर्धमेला झाल्यासारखाच आतां खडा होता.

'कांहीं हालचाल न करतां निश्चल राहा उभा ! मीं जन्म दिला तुला—नि मीच ठार मारणार तुला !' टारास म्हणाला नि मग दोन पावलें मागें सरून त्यानें आपली बंदूक उचलली.

अँड्रे प्रेतासारखा पांढराफटक पडला होता. त्याच्या ओठांची हळुवार हालचाल झाली नि त्यांतून एका नांवाचा उच्चार झाला; त्याच्या मायदेशाचें, जन्मदात्या आईचें किंवा त्याच्या बांधवांचें नांव नव्हतें तें. त्या सुंदर पोल युवतीचा तो नामोच्चार होता.

टारासनें बंदूक झाडली. गव्हाच्या कापलेल्या लोंबीप्रमाणें किंवा कोंवळ्या कोंकराच्या कापलेल्या मस्तकाप्रमाणें अँड्रेनें मान टाकली नि त्याचा देह निःशब्द असा खालीं गवतावर कोसळला.

आपल्या स्वतःच्याच मुलाचा मुडदा पाडणारा तो पिता त्या मृत देहाकडे पाहात कितीतरी वेळ उभा होता. मृत्यूनंतरहि सुंदर दिसणारा तो देह, तो पौरुषपूर्ण चेहरा, कांहीं क्षणांपूर्वींच नारीजातीला अदम्य अशीच भूल पाडणारा, आतां मृत्यूनंतरहि निरतिशय सुंदरच दिसत होता. त्याच्या काळ्याभोर भुंवया त्या विवर्ण मुखावर आतां अधिकच उठून दिसत होत्या.

'केवढा वीर पुरुष झाला असता तो !' टारास उद्गारला. 'हा कणखर उभार बांधा, काळ्या भोर भुंवया, सौम्य हंसतमुख मुद्रा नि बलशाली बाहु—पण त्याची अखेर अशी लाजिरवाणी—एखाद्या खत्रूड कुत्र्याच्या मौतीनें हें मरण !'

'काय केलंत हें पिताजी ? तुम्हींच केलंत याला ठार ?' तेवढ्यांत तिथें दौडत आलेल्या ओस्टॅपनें विचारलें.

टारासनें मान हलविली.

ओस्टॅप त्या मिटल्या मृत नेत्रांकडे टक लावून पाहात होता. भावाबद्दलच्या दुःखानें त्याचें हृदय भरून आलें होतें. 'त्याला नीट मूठमाती देऊं या

आपण, पिताजी. शत्रूकडून त्याच्या देहाची विटंबना होतां कामा नये किंवा त्याच्या प्रेताची गिधाडांकडून चिरफाडहि होतां कामा नये.'

'आपली कांहीं गरज नाहीं त्यासाठीं—ते करतील सारं कांहीं ! त्याच्यासाठीं रडणारेहि आहेत त्यांच्याजवळ खूप !' टारास म्हणाला.

टारास एक क्षण दोन क्षण विचारांत गढला. याला वीराला साजेशी मानवंदना द्यावी कीं द्यावें याला कोल्ह्या-गिधाडांच्या तोंडीं, या विचारांचें तांडव त्याच्या मनांत उसळलें होतें. कोणाचेंहि शौर्यवीर्य हें मानार्हच नाहींतरी. पण तेवढ्यांत एक कोसॅक वीर समोरून दौडत आला.

'दुर्दैव ओढवलं आपलं कर्नलसाहेब. शत्रूचं बळ वाढलं आहे. ताजी कुमक येऊन पोंचली आहे त्यांना !'

त्याचें बोलणें संपण्यापूर्वींच दुसरा एक स्वार दौडत येऊन त्यानेंहि तीच बातमी टारासला दिली. तेवढ्यांत तिसरा एक कोसॅक पायींच धावत जवळ आला.

'कर्नल, आपण आहांत कुठं ? कोसक वीर आपल्याला शोधीत आहेत. तीन तुकड्यांचे नाईक ठार झाले आहेत. पण लोक मात्र ठाम उभे आहेत जागेवर. तुमची वाट पाहताहेत ते. तुमच्या साक्षीनें त्यांना वीरमरणाला कवटाळायचं आहे.'

'घोड्यावर मांड टाक ओस्टॅप !' टारास ओरडून म्हणाला नि आपल्या कोसॅकांचें बलिदान पहाण्यासाठीं नि त्यांना उत्तेजन देण्यासाठीं त्यानें घोडा तिकडे पिटाळला.

पण तो सारे झाडीबाहेर पडण्यापूर्वींच शत्रुसैन्यानें त्यांना चहूंकडून घेरलें- जिकडे नजर टाकावी तिकडे पोल घोडेस्वार खडे होते.

'ओस्टॅप, मागें हटूं नको ! धीर नको सोडूं !' टारासनें आरोळी ठोकली नि हातांतल्या तलवारीचे हात करीत तो वाघासारखा चौफेर लढूं लागला.

इकडे सहा जवानांनीं ओस्टॅपवर हल्ला चढविला. पण त्यानें आपल्या चापल्यानें नि अलोट शौर्यानें तिघांना खालीं लोळवलें. चौथा पुढें सरसावतो तोंच गोळी लागून त्याचा घोडा उधळला नि वरचा स्वार खालीं धुळींत लोळू लागला.

‘ छावास, ओस्टॅप ! छाबास माझ्या पोरा ! ’ टारास ओरडला. ‘ मीहि तेंच करतों आहें बघ. ’

आणि मग ओस्टॅपवर नजर ठेवूनच तो लढूं लागला. तलवारींचे वार झेलीत तो आपल्या शत्रूंशीं सामना देत होता. पण आतां त्यानें पाहिलें की आणखी सात आठ पोल ओस्टॅपवर तुटून पडत होते.

‘ चालूं दे ओस्टॅप ! धीर नको सोडूं–मी आलोंच ! ’

पण आतां ओस्टॅपभोंवतींचे लोक अंगाशींच भिडले होते आणि एकानें फेंकलेल्या दोरीचा फांस ओस्टॅपभोंवतीं पडला होता–फांस ओढला गेला. ओस्टॅप कैद झाला–ते पोल त्याला घेऊन निघालेहि.

‘ ओस्टॅप ! ओस्टॅप ! ’ त्याच्या दिशेनें येण्याची धडपड करीत नि अनेकांचीं मुंडकी उडवीत टारास ओरडत होता. पण शत्रुबळ वाढत होतें. ‘ ओस्टॅप ! माझा ओस्टॅप ! ’

पण त्याच क्षणीं कसला तरी जबर आघात त्याच्यावर झाला. तो हादरला. त्याचें मस्तक गरगरूं लागलें. डोळ्यांपुढें कांहीं दिसेना. शिपाई, तलवारी, भाले यांचा एकच समुद्र त्याच्या डोळ्यांसमोर उफाळला; नि मग हिरवींगार झाडी अखेर मुळांत तोडलेल्या एखाद्या भव्य ओकवृक्षाप्रमाणें तो खालीं कोसळला नि त्याच्या डोळ्यांपुढें घनदाट अंधार दाटला.

## १०

‘किती वेळ झोंपलों मी ?’ मनसोक्त मद्यपानानंतर शुद्धीवर येत असल्यासारखा टारास शुद्धीवर येऊन उद्गारला. सभोंवार त्याला अजून सारें कांहीं अंधुक, अस्पष्ट असें दिसत होतें. त्याला विलक्षण ग्लानि वाटत होती. सभोंवारचें वातावरण त्याला अपरिचित असें वाटत होतें. पण अखेरीस समोर बसलेल्या त्याच्या दोस्ताचा चेहरा त्याला स्पष्ट दिसला.

' हं ! मला वाटलं होतं कीं तूं कायमचाच झोंपलास आतां ? ' टोव्हकँचच्या मनांत आलें. पण तो बोलला मात्र नाहीं. नाकावर बोट ठेवून त्यानें टारासला गप्प राहण्यास सुचविलें

' पण मला सांग, मी आतां आहें तरी कुठं ? ' आपले अस्पष्ट विचार सावरण्याचा प्रयत्न करीत टारासनें विचारलें.

' तोंड बंद ठेव आपलं ! ' त्याचा दोस्त कठोरपणें म्हणाला. ' काय हवं आहे कळायला तुला ? तुझ्या जखमा–आज गेले पंधरा दिवस बेशुद्ध आहेस तूं नि तुला घेऊन पंधरा दिवस घोडयाच्या पाठीवरच आहोंत आम्ही. पुरता श्वास घ्यायला देखील थांबलों नाहीं कुठं. नि तुला बेदम ताप नि तुझी बेसुमार बडबड. आजच स्वस्थ अशी झोंप तुला प्रथम लागली होती म्हणून स्वस्थ पड जरा. '

पण टारासचें मस्तक आपले सारे विचार नीट सुसंगत लावण्यासाठीं धडपडत होतें.

' हां, आठवलं–गनिमांनीं मला चहुंकडून पक्कं वेढलं होतं–त्या कोंडींतून फुटून बाहेर पडणं अशक्यप्राय झालं होतं मला ! '

' ए सैतान, तोंड बंद कर म्हणतों ना ! ' एखाद्या अवखळ पोरावर त्याच्या दाईनें खेकसावें तसा टोव्हकॅच त्याच्यावर खेंकसला. ' तूं कसा वटावलास तें कळून करायचं आहे काय तुला ? सुटलास एवढं बस्स झालं कीं ! आसपास जिवास जीव देणारे दोस्त होते तुझे–एवढं बस्स झालं तुला. अजून पुष्कळ दिवसांची घोडदौड करायची आहे आपल्याला नि तूं काय सामान्य कोसॅक समजतोस स्वतःला ? अं हं. अरे तुझ्या मस्तकासाठीं दोन हजार ड्यूकट्सचं बक्षीस लावलं आहे त्यांनीं. '

' आणि ओस्टॅपची काय आहे वार्ता ? ' एकदम उठून बसण्याची धडपड करीत टारास ओरडला. मग एकदम त्याला सारें आठवलें. ओस्टॅप त्याच्या डोळ्यांसमोरच कैद झाला होता. पोलीश कैदी आहे आतां तो.

त्याच्या वृद्ध मस्तकांत दुःखानें काहूर उसळलें. त्या आवेगांत त्यानें जखमांच्या मलमपट्ट्या ओढून फेंकून दिल्या नि तो कांहींतरी बोलण्याचा प्रयत्न करूं लागला.–पण त्याला बरळण्याचेंच स्वरूप आलें. त्याला परत भ्रम

झाला नि त्याची बडबड अनावर झाली. त्याचा तो विश्वासू प्रमळ दोस्त त्याला चुचकारून, रागावून शांत करण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानें त्याच्या जखमा परत बांधल्या नि मग त्याला एखाद्या लहान मुलासारखें उचलून घोड्यावर घातलें. त्याचे हातपाय दोऱ्यांनीं घट्ट आवळून खोगिराला बांधले नि घोड्याला टांच मारली.

' जिता किंवा मेलेला तुला मी तिथं नेणारच नेणार ! या पोल लोकांच्या हातांत तुला देऊन तुझ्या कोसॅक हाडांची विटंबना नाहीं मी होऊं देणार. नि गिधाडांच्या मुखींच जर पडायचा असेल तुझा देह तर तीं गिधाडं आपल्या मायदेशचींच असूं देत. जिता किंवा मेलेला मी तुला युक्रेनमध्यें नेणारच नेणार ! '

आणि याच निर्धारानें तो निष्ठावंत सहचर रात्रंदिवस पळाचीहि विश्रांति न घेतां दौडत होता. नि याच निर्धाराच्या बळावर त्यानें मायदेश गांठला. तिथें येतांच त्यानें टारासची नीट शुश्रूषा केली नि महिन्याभरांतच टारास बाहेर हिंडूं फिरूं लागला. पण आतां तो सदा उदास उदास असाच दिसे. काळपुरुषानें त्याच्या भव्य कपाळावर खोल रेषा मारल्या. सभोंवार त्याला जना चेहरा म्हणून दिसेना. साऱ्यांनीं देवाधर्मासाठीं नि मायभूमीसाठीं बलिदान केलें होतें नि कोशेव्हॉयबरोबर तार्तारांच्या पाठीवर गेलेल्या पैकींहि कोणी परतलें नव्हतें. साऱ्यांनीं रणांगणावर देह ठेवला होता तें सारें पाहून टारास अत्यंत खिन्न झाला. गांवांतील कोणतीच व्यक्ति त्याचें सांत्वन करूं शकत नव्हती. वृद्ध शाहीरांच्या गाण्यांत त्याचें मन रमत नव्हतें. भकासपणें तो कोठेंतरी पहात बसे कांहीं अनिर्वचनीय अशा दुःखावेगानें त्याची मुद्रा काळवंडून जाई. मस्तक खालीं वांके नि तो आवेगानें सुस्कारे, ' पोरा, माझ्या पोरा ! माझ्या ओस्टॅप ! '

आणि मग सारे झॅपरोझी एका दर्या-मोहिमेवर बाहेर पडले. दोनशें सुसज्ज नावा नीपर नदीच्या पात्रांत उतरल्या आणि एशिया मायनरचा सारा समृद्धकिनारा त्यांनीं पेटवून दिला. जमिनी रक्तानें न्हाऊन निघाल्या नि चहूंकडे प्रेतांचा जसा खच पडला असा भीषण संहार करून झॅपरोझी परत फिरले. हंसत खिदळत त्यांचा प्रवास चालला होता. पण एका तुर्क युद्धनौकेनें त्यांना गांठलें नि तोफांच्या एकाच दणक्यांत त्यांचा धुव्वा उडवला.

साठ-सत्तर नावांनीं समुद्रतळ पाहिला. पण उरल्या सुरल्यांनीं मोठ्या शर्थीनें परत एकवटून नीपरचें मुख गांठलें. आपली लूटही त्यांनीं सुखरूप घरीं आणली. पण या कशानेंच टारासचें मन उल्हासित झालें नाहीं. शिकारीसाठीं म्हणून तो कधीं बाहेर पडे. पण एकही गोळी त्याच्या बंदुकींतून कधीं सुटली नाहीं. मान खालीं वाकलेली असा रिक्तहस्तेंच तो माघारी येई; किंवा दूर कुठेंतरी बसून तो खिन्नपणें सुस्कारे टाकी. ' माझा ओस्टॅप ! माझा ओस्टॅप ! ' म्हणत समोर काळ्या समुद्राचा विस्तार पसरलेला, चमकत असलेला, गल पक्षी कुठेंतरी चीत्कारत असलेले, पण त्याची शून्यदृष्टि कुठेंतरी लागलेली नि डोळ्यांतून अखंड अश्रु झरत असलेले.

अखेरीस हें सारें टारासला असह्य झालें. ' बस, काय लागेल तें होवो, मी जाऊन त्याची खबर आणणारच आणणार. जिता कीं मेलेला आहे तो ? नि मेल्यावर मूठमाती मिळाली कीं नाहीं ? हें पाहून येणारच येणार मी. काय लागेल तें होवो मग ! '

आणि मग आठवड्याभरांतच सारी जय्यत तयारी करून त्यानें घोडा बाहेर काढला नि तडक ओमान गांठलें. एका अस्ताव्यस्त, दारिद्र्याची अवकळा असलेल्या घराकडे तो तडक गेला. आंतून एक ज्यू स्त्री बाहेर डोकावली.

' नवरा आहे का घरांत ? ' बल्बानें विचारलें.

' हां, आहेत, ' तिनें उत्तर दिलें नि घाईघाईनें बाहेर येऊन घोड्यापुढें गव्हाची पेंडी नि त्या सरदारापुढें बीरचा पेला केला. ' पलीकडच्या खोलींत प्रार्थना करीत आहेत ते. '

' इथेंच थांबून माझ्या घोड्याला दाणापाणी करा तुम्ही. मी एकटाच आंत जाऊन भेट घेतों त्याची. थोडं काम आहे त्याच्याशीं. ' तिच्या अभिवादनाचा स्वीकार करीत आणि बीरचा पेला रिता करून बल्बा म्हणाला.

तो ज्यू म्हणजे यांकेलच. कांहीं दिवसांपासून तो येथेंच स्थायिक झाला होता आणि सभोंवारच्या तीन चार मैलांच्या टापूंत त्यानें उत्तम बस्तान बसविलें होतें. आसपासचे सारे जमीनदार, सरदार त्याच्या कर्जांत बुडून गेले होते नि त्या साऱ्या प्रदेशावर दारिद्र्याची अवकळा पसरली होती. आणि आणखीं

पांच-दहा वर्षे जर यांकेल तिथेंच राहिला असता तर तो सारा देश उध्वस्त झाल्याशिवाय खासच राहिला नसता !

यांकेलची प्रार्थना संपत आली होती. पावलांचा आवाज ऐकतांच त्यानें मागें मान वळवली नि बल्बा दृष्टीस पडतांच त्याचे डोळे चमकले. बल्बाच्या मस्तकासाठीं लावलेलें दोन हजारांचें बक्षीस त्याला आठवलें. पण लगेच त्याला आपल्या लोभीपणाची लाज वाटली नि तो दुष्ट विचार दडपून टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला.

' हें बघ यांकेल ! ' दार लोटून त्याला नम्रपणें अभिवादन करणाऱ्या यांकेलला टारास म्हणाला, ' झॅपरोझींच्या तावडींतून तुझा जीव मी वांचविला. फाडून तुकडेच केले असते तुझे त्यांनीं. आतां तुझी आहे पाळी–माझं काम केलंच पाहिजेस तूं. '

' तें कसलं ? करण्यासारखं असेल तर जरूर. '

' मला वॉरसाला घेऊन चल. '

' वॉरसा ? नि तें कशाला ? ' खांदे उंचावीत तो म्हणाला.

' वेळ मोडूं नको उगाच. वॉरसाला ने मला. काय वाटेल तें झालं तरी त्याची भेट झालीच पाहिजे '

' कोणाची ? '

' ओस्टॅपची–माझ्या पोराची ! '

' आपल्याला माहीत नाहीं का—'

' सारं माहीत आहे मला. बक्षीस लावलं आहे माझ्यासाठीं. त्या गाढवांनीं किमत ओळखली आहे माझी. हे दोन हजार घे माझ्याजवळून आत्तांच–' चामड्याच्या थैलींतून पैसे ओतीत बल्बा म्हणाला. ' आणि परत आल्यावर आणखी तीन हजार देईन. '

' सुंदर आहेत हं नाणीं ! ' हातांनीं तीं नाणीं हाताळीत नि मग तीं पटकन झांकून टाकीत यांकेल म्हणाला. ' ज्याच्याजवळून आपण हीं लुंगावलीत त्यानं मला वाटतं जीवच दिला असेल लगेच ! '

' तुझी मदत नसती मागितली कदाचित नि एकटाच सरळ गेलों असतों वॉरसाला. पण ते बदमाष मला ओळखतील नि कैद करतील. तुमच्या-

सारखी चकवाचकवी नाहीं जमायची कोणाला–खुद्द सैतानाला देखील तुम्ही बनवाल हातोहात. म्हणून आलों तुझ्याकडे. नि शिवाय वॉरसांत मला एकट्याला 'नाहीं कांहीं करतां येणार. तर चल, गाडी कर तयार नि घेऊन चल मला तिकडे.'

'सोपं आहेसं वाटतं काय हें काम, साहेबांना? उचललं तुम्हांला, घातलं गाडींत कीं एकदम कूच ! इतकं नाहीं हें सोपं.'

'बरं, लपवून छपवून ने बाबा ! कुठं, रिकाम्या पिपांत बसवणार मला?'

'छा, छा, ! अहो, पिंप काय रिकामं आहे असं समजतील लोक? ज्यू नि रिकामं पिंप घेतलेला? चुकतं आहे कांहीं तरी, असंच म्हणणार सारे नि धांवणार व्होडका प्यायला. ज्यूंवर विश्वास ठेवतो कोण? जगांतला वडा पापी तो–धरा, पकडा त्याला. आम्ही कुत्री ! ज्यू हा कांहीं माणूस नव्हे ना !'

'बरं, बरं–मग सैतानाच्या पाठीवर बसव मला, पण तिकडे ने म्हणजे झालं !'

'मग, असं करूं या आपण, साहेब ! हल्लीं जिकडे तिकडे किल्लेबिल्ले बांधण्याचीं कामं आहेत चाललेलीं. त्यासाठीं दगड, विटा चालल्या आहेत सगळीकडे. तर अशा विटांच्या गाडींत लपवून बसवूं तुम्हांला नि सभोंवार रचूं विटा. आपली प्रकृति ठणठणीत आहे. म्हणून तुम्हांला तसा त्रास नाहीं पोंचणार.'

'काय वाटेल तें कर, पण मला ने म्हणजे झालं !'

आणि मग तासाभरांतच विटा भरलेली एक गाडी ओमानमधून चाकांचा खडखडाट करीत बाहेर पडली.

# ११

त्या काळीं देशांत किंवा सरहद्दीवर सरकारी जकात-नाकीं नसत किंवा संशयित गाडी, घोडे अडवून तपासणी करणारे फिरते अधिकारीहि नसत. मार्गांत कोणीं कोणाची गाडी अडवली तर ती आंतील मालाची लूटमार करण्यासाठींच बहुधा असे. म्हणून विटांनीं भरलेल्या या गाडीकडे कोणाचेंहि लक्ष न जातां ती गाडी शहराच्या मुख्य दारांतून सुखरूप आंत गेली, आणि ज्यू वस्ती असलेल्या एका अरुंद अंधाऱ्या अशा बोळकंडींत शिरली. या बोळकडींनील सारेंच दृश्य किळस आणण्याइतकें मलिन आणि विद्रूप होतें. वर डोक्यावर आडव्यातिडव्या टाकलेल्या काठ्यांवरून मळके कपडे लोंबत होते. मलिन विरूप अशीं पोरें सोरें रस्त्यावरील चिखला - घाणींतच हुंदडत होतीं. यांकेलनें एका ज्यूला साद घातली नि गाडी एका घराच्या चौकांत उभी करून मोठ्या सावधगिरीनें त्यानें बल्बाला बाहेर काढलें बाहेर बसलेल्या दोघांतिघां ज्यूंबरोबर बातचीत केल्यावर तो बल्बाला म्हणाला, 'ओस्टॅप मधल्या तुरुंगांत आहे नि पहारेकऱ्यांना फितवणं कांहीं सोपं नाहीं आहे. तरी पण पाहूं प्रयत्न करून.'

मग किती वेळ तरी त्या ज्यूंचें आपसांत जोराजोरांत संभाषण चालले होतें. टारासला त्यांतलें एक अक्षरहि कळत नसलें तरी त्यांच्या एकंदर आविर्भावा-वरून त्याच्या उदास मनांत आशेची ज्योत उजळली—तीव्र निराशेंत अशी आशा कधीं कधीं पालवते—नि त्याचें वृद्ध शरीर तरुणासारखेंच फुरफुरूं लागलें.

'ऐकलंत काय रे ए बाबांनो!' तो उल्हासानें त्या ज्यूंना म्हणाला. 'तुम्हांला अशक्य कांहींच नाहीं. समुद्राचा तळ देखील खणून वर आणाल तुम्हीं. माझ्या ओस्टॅपला सोडवा त्या सैतानांच्या हातून! याला मी बारा हजार केले आहेत कबल त्यांत आणखी बारा हजारांची भर घालीन मी. माझं सर्वस्व विकून आणि लुटींतला अर्धा भाग देत जाईन सारी हयातभर'

33324



'नाहीं साहेब, अशक्य आहे हें!' यांकेल सुस्कारत म्हणाला नि इतरांनींहि त्याची तशीच री ओढली.

मग थोडा वेळ ते आपसांतच कांहीं तरी बोलत होते नि हातवारे करीत होते. त्यांतले दोघे उठून मग बाहेर जाऊन कोणाची तरी वाट पहात असल्यासारखे रस्त्याकडे पाहत उभे राहिले नि त्यांना अपेक्षित असलेली व्यक्ति तिथें येऊन पोंचतांच त्याला घेऊन ते परत खोलींत आले.

तो नवागत ज्यू मग बल्बाच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, 'हें पाहा, आमचं नि देवाचं एकमत झालं कीं आमच ईप्सित हें साध्य होतंच होतं.'

टारासनें त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें. त्याचा चेहेरा मोठासा प्रसन्न नसला तरी त्यांत दुसऱ्याला दिलासा देईल असें कांहीं तरी खास होतें. त्याच्या हृदयांत नवी आशा तरारली.

टारासला आश्वासन देऊन ते सारे ज्यू मग बाहेर पडले. टारास आपल्याच विचारांत गुंगला. कधीं न अनुभवलेली अशी विलक्षण हुरहूर त्याला व्यथित करीत होती. पूर्वींचा बल्बा तो आतां उरला नव्हता—ताठर, अदम्य, एखाद्या ओक वृक्षासारखा दणकट. पण त्याचें हृदय आतां भीरु बनलें होतें. कसल्याहि आवाजानें तो आतां दचकत होता. सारा दिवस या अशा अवस्थेंतच खिडकींतून बाहेर पहात तो बसला होता. खाणेंपिणेंहि त्याला सुचत नव्हतें. पण अखेरीस दिवस मावळतांच यांकेल नि तो दुसरा वृद्ध आंत खोलींत आले. त्याच्या हृदयाची धडधड थांबली.

'हं, काय ? सारं ठीक ?' अधीरपणें त्यानें विचारलें.

पण कोणी कांहीं सांगण्यापूर्वींच त्यांच्या एकंदर अवतारावरून टारास अत्यंत अस्वस्थ झाला. तो वृद्ध ज्यू घाईघाईनें कांहीं तरी सांगत होता. पण टारासला एका अक्षराचाहि कांहीं बोध होत नव्हता. मग यांकेल घोगऱ्या स्वरांत बोलूं लागला.

'साहेब, साहेब, सारी आशा खुंटली आतां. वाईट, फार वाईट आहेत ते लोक. सारे प्रयत्न केले, कांहीं करायचं म्हणून ठेवलं नाहीं आम्हीं. पण यश नाहीं दिलं देवानं. तीन हजारांची फौज खडी आहे गांवांत. आणि साऱ्या बंदींची उद्यां कत्तल करणार आहेत !'

टारास त्यांच्याकडे पहात होता. पण त्याच्या डोळ्यांत आतां अधीर-पणा उत्सुकता किंवा संताप दिसत नव्हता.

'आणि त्याला जर भेटायचंच असलं तर अगदीं सूर्योदयापूर्वी पहारेकरी नि त्यांचा नाईक कबूल झाले आहेत. महाबदमाप नि लोभी लेकाचे ! ज्यू काय त्यांच्यापुढं ! पन्नास पन्नास ड्यूकट मोजले मीं प्रत्येकाला; नि त्या नाइकाला—

'ठीक, न्या मला त्याच्याकडं !' टारास दृढ स्वरांत म्हणाला. तो आतां पूर्वस्थितीवर आला होता.

रात्रीचा काळोख आतां सभोंवार दाटला होता. एका लांकडी बांकावर टाकलेल्या एका जाड चटईवर टारास आडवा झाला. यांकेल जवळच खालीं आडवारला होता. पण टारासला झोंप येत नव्हती. बाकावर ताठ बसून तो आपलीं बोटें विचारांच्या तंद्रींतच बांकावर आपटीत होता. त्याचें अखंड धूम्रपान चालू होतें नि त्या धुराचा ठसका लागून यांकेल झोंपेंतच शिंकत खोकत होता नि नाकावर पांघरूण ओढीत होता. उषेचें पहिलें वहिलें पाऊल आकाशाच्या प्रांगणांत उजळलें नि टारासनें यांकेलला पायानेंच हलवून जागें केलें

'चल ऊठ, ज्यू .नि माझ्यासाठीं आणलेले ते कपडे दे मला.'

चार दोन क्षणांतच जर्मन उमरावांचा वेष टारासच्या अंगावर चढला. आपल्या भुंवईचे नि मिशांचे केस त्यानें काळे केले नि मस्तकावर एक काळी टोपीहि चढवली–त्याच्या दोस्तांनींहि त्याला या वेषांत ओळखलें नसतें. तो पोशाख त्याला चांगलाच खुलून दिसत होता.

बाहेर रस्त्यांना अजून जाग आली नव्हती. बाहेरून येणारे भाजीवाले देखील अजून रस्त्यावर दिसत नव्हते. यांकेल नि बल्बा एका बैठ्या इमा-रतीशीं येऊन पोंचले. या इमारतीचा कोर्ट, तुरुंग नि बराक म्हणूनहि उपयोग केला जाई. ते दोघेहि आंत एका प्रशस्त अशा हॉलसारख्या आच्छादित चौकांत आले. जवळजवळ आठनऊशें लोक तेथें झोंपलेले दिसत होते. समो-रच एक ठेंगणेंसें दार दिसत होतें नि जवळच दोन पहारेकरी कांहींतरी खेळत बसले होते. त्यांनीं या आंत येणाऱ्याकडे लक्षहि दिलें नाहीं. 'आम्ही

आलों आहोंत, साहेब. ऐकलंत ? आम्ही आलों आहोंत,' असें यांकेलनें म्हटल्या-वरच त्यांनीं मान वळवून पाहिलें.

'जा आंत ! ' दार उघडीत एकजण म्हणाला.

आंतील अंधाऱ्या नि रुंद वाटेवर त्यांनीं पाऊल टाकलें नि चार दोन क्षणां-तच ते दोघे दुसऱ्या एका हॉलमध्यें आले

'कोण आहे ? ' अनेक कंठांतून आवाज आला. टारासला शस्त्रधारी असे अनेक सैनिक तिथें असलेले दिसले. 'कोणालाहि आंत सोडायचें नाहीं, असा हुकूम आहे आम्हांला.'

' आम्ही आहोंत ते–आम्हीं आलों आहोंत साहेब ! ' यांकेल मोठ्यानें म्हणाला.

पण त्याचें कोणीच ऐकेना. पण तेवढ्यांत सुदैवानें एक अधिकारी आंत आला. मोठा रुबाबदार दिसत होता तो.

'आम्ही आलों आहोंत, महाराज ! आपण ओळखतांच आम्हांला नि या सरदारजींना–आपली मेहेरबानी, महाराज.'

' जाऊं द्या, आंत जाऊं द्या त्यांना, ए सैतानांनो ! आणि दुसऱ्या कोणाला आंत नका सोडूं नि हत्यारं अशीं खालीं ठेवून लोळूं नका डुकरांसारखे. '

त्याचे पुढले शब्द न ऐकतांच ते पुढें सटकले ' आम्ही आहोंत . . . मी आहें तो. दोस्त ! ' वाटेंत भेटणाऱ्या साऱ्यांना असें सांगत यांकेल चालला होता. शेवटच्या खोलीशीं येतांच, ' जाऊं का आम्ही आंत ?' असें त्यानें पहारेकऱ्याला विचारलें.

'जा आंत तुम्ही, पण खुद्द कोठडींत प्रवेश होईल कीं नाहीं, नाहीं सांगतां येत. जॅनच्या जागीं दुसराच आहे कोणी.'

' अरे अरे, ! हें नीट नाहीं चिन्ह साहेब ! ' यांकेल हळूच पुटपुटला.

' चल, पुढं हो ! ' टारास ताठरपणें उद्गारला नि यांकलेनें निमूटपणें पुढें पाऊल टाकलें.

कोठडीच्या दाराशीं एक धिप्पाड, मिशाळ असा शिपाई उभा होता. एखाद्या तुरवुरलेल्या रानबोक्यासारखा दिसत होता तो.

'महाराज ! खुदावंत ! ' त्याच्याजवळ जाऊन नि वांकवेल तेवढें खालीं वांकून यांकेल उद्गारला.

'कोणाला, मला बोललास ज्यू ? अरे एक साधा शिपाई मी ! ' आनंदानें डोळे चमकत असतां तो मिशाळ शिपाई म्हणाला.

'अहो, केवढे थोर लोक तुम्ही सैनिक म्हणजे नि या तुमच्या फिती नी पदकें–कशीं सूर्यासारखीं चमचम करताहेत तीं ! नि कुठंहि गेलांत तरी नगरच्या नारी म्हणजे तुमच्यावर–छे, छे ! ' मस्तक हलवीत यांकेल म्हणाला.

बेहद्द खूष होऊन शिपाईबोवांनीं मिशा कुरवाळल्या नि एखाद्या तट्टासारखा तो खिकाळला.

'गरिबाचं एक काम आहे, महाराज ! आमच्या या सरदारसाहेबांना–मोठे खानदान, राजकुलीनच आहेत ते.–कोसॅक कसा असतो तो बघायचा आहे त्यांना. अजूनपर्यंत कधीं पाहिलाच नाहीं कोसॅक त्यांनीं.'

'आपल्याला कां झाली आहे अशी इच्छा, कळत नाहीं मला. ' टारासला नम्रपणें अभिवादन करीत तो शिपाई म्हणाला. ' माणसं कसलीं, कुत्रीं तीं नि त्यांचा धर्म–कोणीच मानीत नाहीं तो. '

' खोटं, खोटं बरळतो आहेस तूं. सैतान,' बल्बा एकदम उद्गारला. 'तूंच आहेस कुतरडा. आमच्या धर्माला कोणी मानीत नाहीं म्हणायची छाती तरी कशी झाली तुझी ? तुझ्याच धर्माला कवडीची किंमत आहे! '

' अस्सं ! आतां ओळखलं तूं कोण आहेस तें. आंतल्या या कोठडींतल्याचाच तूं सगा. थांब, आतां करतों साऱ्यांना गोळा. '

टारासला आपली घोडचूक कळून चुकली; पण स्वभावांतील ताठरपणामुळें आणि दुःखावेगामुळें ती दुरुस्त करण्याचा मार्ग त्याला सुचणें अशक्य होतें. पण त्याच्या सुदैवानें यांकेल झटकन् पुढें आला.

' साहेब, साहेब ! हे सरदारजी नि ते कोसॅक ! कसं शक्य आहे हें होणं ! अहो, यांचा हा रुबाब कोसॅकला जमेल कां कधीं तरी ? '

' बस्स,तुझी ही बनवाबनवी बस्स झाली; ' तो पहारेकरी म्हणाला नि त्यानें 'हुश्शार' अशी आरोळी देण्यासाठीं तोंडहि वासलें.

' अहो, साहेब, गप्प बसा कीं ! मेहेरबानी करून तोंड नका उघडूं.'

यांकेल घाईघाईनें ओरडला. ' कधीं कोणी दिलं नसेल असलं बक्षीस देऊं आम्ही तुम्हांला ! सोन्याचे दोन ड्यूकट देऊं तुम्हांला ! '

' दोन ड्यूकटस ! हे: ! ! त्यांची काय किंमत. अरे, अर्ध्या दाढीसाठीं देतों तेवढे मी माझ्या न्हाव्याला. शंभर ड्यूकट हवेत मला बरं का रे ज्यू ! काढ बाहेर आत्तांच, नाहींतर ठोकलीच बघ आरोळी ! '

' फार होताहेत, फार होताहेत हे महाराज ! ' यांकेल काकुळतीनें म्हणाला नि त्यानें आपली पिशवी त्याच्या हातांत कुरकुरतच मोकळी केली.

' साहेब, आपण येथून तावडतोब निघावं हें बरं ! हे लोक किती पाजी आहेत तें दिसलंच आहें आपल्याला.' त्या पहारेकऱ्याची असंतुष्ट मुद्रा पाहून यांकेल म्हणाला.

' तें काय म्हणून पण ? ए बदमाष ! ' टारास म्हणाला. ' पैसे लुंगावूनहि कोसॅक दाखवीत नाहींस आम्हांला ? तें कांहीं नाहीं, दाखवलेच पाहिजेस ते लोक. असे पैसे घेऊन नकार देतां नाही येणार तुला. '

' चला, चालते व्हा येथून उलथा झटपट ! नाहींतर ही आरोळी ठोकलीच बघा–जा चालते व्हा. '

' चला, महाराज चला ! शपथ आहे तुम्हांला देवाची ! पटकी आली रे या दुष्टांवर ! नरकांत पडोत लेकाचे ! ' यांकेल ओरडला.

निराश हृदयानें खालीं मान घालून बल्बा माघारीं वळून चालूं लागला. त्याच्यामागून यांकेल त्याला मनांत शिव्यांची लाखोली मोजीत चालला होता. पदराला चांगलाच खार लागल्यानें तो खूपच चिडला होता.

' चल, जाऊं या आपण ! ' बल्बा एकदम उद्गारला. या अपयशानें तो चिडल्यासारखा झाला होता. त्याच्या डोळ्यांत अंगार पेटला होता. ' चल, चौकांत जाऊं या आपण. तें सारं दृश्य अखेरपर्यंत पहायचं आहे मला.'

' कशाला जातां तिथं ? काय उपयोग आहे त्याचा ? कसलीहि मदत केवळ अशक्य आहे आतां. '

' आपण तिथं जायचंच ! ' बल्बा ताठरपणें म्हणाला.

त्या साऱ्या कैद्यांना जिथें ठार करायचें होतें तो चौक शोधणें फारसें कठीण नव्हतें. लोकांचे थवे जसे चहूंबाजूंनीं तिकडे लोटत होते ! असलें भीषण

दृश्य त्या काळांत सर्वांनाच दर्शनीय असें वाटत असे. म्हाताऱ्या किंवा भेद-रट स्त्रियांनाहि या असल्या दृश्यांचें आकर्षण वाटे. त्या डोळे मिटून घेतील, भेदरून किंचाळतील पण अखेरपर्यंत तिथेंच उभ्या मात्र रहातील.

आज चौकांत खूपच गर्दी लोटली होती. सभोंवारच्या घरांचीं दारें खिडक्या नि छपरें देखील माणसांनीं फुलून गेलीं होतीं. श्रीमंतांच्या वाड्यांच्या आगाशीदेखील फुलल्या होत्या नि वातायनें कुवलयित झालीं होतीं. खाद्यपेयांचीं तबकें इकडून तिकडे फिरत होतीं नि मधुर मंजुळ हास्याची खसखस पिकत होती. सोनेरी पिंजऱ्यांतील पक्षी देखील एक पाय उभारून नि काना डोळा करून खालच्या जमावाकडे पहात होते. इतक्यांत खालील गलका एकदम वाढला नि लोक मान उंचावून पाहूं लागले. 'आले, कैदी आले ! कोसॅक कैदी आले !' चहूंकडून आवाज उठला.

कैद्यांचीं मस्तकें अनावृत होतीं. त्यांच्या मुद्रेवर भयाची किंवा दुःखाची छटा दिसत नव्हती, तर त्यांच्या मुखांवर एक प्रकारचा मूक अभिमानच स्पष्टपणें उमटला होता. मानोद्धत अशीच त्यांची एकंदर ऐट होती. भोंव-तालच्या लोकसमुदायाकडे त्यांनीं पाहिलेंहि नाहीं किंवा त्याला अभिवादन केलें नाहीं. साऱ्यांच्या पुढें ओस्टॅप होता.

आपल्या लेकाला पाहून वृद्ध बल्बाच्या मनांत कोणते विचार आले ? काय चाललें होतें त्याच्या हृदयमंदिरांत ? निश्चल दृष्टीनें त्या जमावांतून तो त्याच्याकडे पहात होता, त्याची प्रत्येक हालचाल तो टिपीत होता. ओस्टॅप थांबला. सर्वांच्या आधीं त्यालाच तो जहरी प्याला प्यायचा होता. आपल्या सवंगड्यांकडे त्यानें एकदां पाहिलें नि हात उंचावून तो मोठ्यानें म्हणाला, 'परमेश्वर करो, नि या साऱ्या काफिरांच्या कानीं एकहि ख्रिश्चन दुःखो-द्गार न पडो. आमच्या कोणाच्याहि मुखांतून एक शब्दहि बाहेर न फुटो !' एवढें बोलून तो वधस्तंभावर चढला.

'शाबास, माझ्या पोरा ! किती सुरेख बोललास !' बल्बा मंद स्वरांत पुटपुटला नि त्यानें आपलें वृद्ध मस्तक खालीं वांकविलें.

वधस्तंभावरील मारेकऱ्यानें ओस्टॅपचे कपडे ओढून काढले नि त्याचे हात-पाय वधस्तंभाला घट्ट जखडून टाकले. आणि—पण पुढचें तें भयंकर वर्णन कशाला ! तें सारें क्रौर्य त्या काळाला साजेल असेंच होतें. मानवी भावनांची कदर अशी त्या काळांत केलीच जात नव्हती. कांहीं फार थोड्या सुसंस्कृत अशा सज्जनांनीं या क्रौर्याला निष्फळ विरोध केला होता. यानें सूडाची भावना सतत पोसली जाईल असेंहि कांहींना वाटलें होतें. पण या कशाचाहि उपयोग झाला नव्हता. क्रूर अमानुष अशा शिक्षांचा वापर अनिर्बंध असा चाललाच होता.

कांहीं विलक्षण, अतिमानवी धैर्यानें ओस्टॅप या छळाला, यातनांना तोंड देत होता. साऱ्या हाडांचे सांधे न् सांधे तुटून मोकळे होत असतांहि त्याचे ओठ घट्ट मिटलेले होते. सभोंवारच्या त्या भयानक शांततेंत त्याचा सुस्कारा देखील कोणाच्या कानीं पडत नव्हता कीं तोंडावरचा स्नायु हलत नव्हता. टारास त्या जमावांत वांकल्या मस्तकानें उभा होता. पण त्याच्या नेत्रांत अभिमान उसळला होता नि तो पुटपुटत होता, ' शाबास, शाबास रे माझ्या पोरा ! शाबास ! '

पण मग ओस्टॅपचा देह अखेरच्या यातनांसाठीं ताणला जाऊं लागतांच त्याचें अवसान सुटल्यासारखें झालें नि त्यानें मान वर करून सभोंवार पाहिलें. हाय रे दैवा ! अनोळखी चेहेऱ्यांचा समुद्र भोंवतीं उसळला होता. एखादें तरी दयाळू हृदय होतें कां तिथें—साक्षीभूत ! आपल्या लेकासाठीं करुण टाहो फोडणारी माता किंवा मस्तकावरील केस उपटीत, छाती पिटीत किंचाळणारी पत्नी त्याला आपल्या शेजारीं नको होती. कोणीतरी धीरोदात्त पुरुष; आपल्या गंभीरवाणीनें त्या मरणघडीला त्याच्या हृदयांत नवचैतन्य निर्माण करील, समाधान उत्पन्न करील असा कोणीतरी त्याला आपल्या शेजारीं उभा असलेला हवा होता. त्याच्या ताकदीनें आतां अवसान सोडलें नि त्यानें आर्त असा चीत्कार करीत साद घातली, ' बाबा ! कुठं आहां तुम्ही ? माझी हांक येते आहे तुम्हांला ऐकूं ? '

' होय, येते आहे ऐकूं ! ' त्या अथांग भयाण शांततेंतून शब्द खणखणत आले नि त्या लक्षावधि लोकांचा देह जसा एकवटून शहारला, हादरला.

घोडेस्वारांची एक तुकडी त्या शब्दांच्या मागावर त्या जनसंमर्दात एकदम घुसली. यांकेल प्रेतासारखा पांढराफटक पडला नि ते घोडेस्वार त्याच्या जवळून पुढें जातांच त्याची दृष्टि टारासला पहाण्यासाठीं भेदरटपणें भिरभिरूं लागली. पण टारास त्याच्या पाठीशीं आतां दिसत नव्हता, त्याची कसलीहि निशाणी मागें उरली नव्हती.

## १२

पण टारास कुठें कायमचा नाहींसा झाला नव्हता. लाख सवालाख कोसॅकांचें सैन्य आतां युक्रेनच्या सरहद्दीवर खडें राहिलें होतें. फुटकळ लूटमारीसाठीं किंवा तार्तारांच्या पाठीवर निघालेल्या चारदोन तुकड्या नव्हत्या त्या. छे, सारें राष्ट्रच आतां आपल्या हक्कासाठीं, देवधर्मासाठीं, पावित्र्यरक्षणासाठीं नि आजतागायत साऱ्या कोसॅक जमातीवर झालेल्या अन्यायांच्या परिमार्जनासाठीं, परकीय सत्तेचें जड जोखड झुगारून देण्यासाठीं असें खडें झालें होतें.

तरुण रक्ताचा पण दृढनिश्चयाचा असा हेटमन ओस्ट्रॅनित्सा या सैन्याच्या मुख्य पदावर होता. त्याच्याखालीं आठ दुय्यम सेनानी होते. हौशी जवानहि स्वयंस्फूर्तीनें या सैन्यांत दाखल झाले होते. सारे लढवय्ये कोसॅक दूरदूरहून देशाच्या कोनाकोपऱ्यांतून गोळा झाले होते. या साऱ्या कोसॅकांच्या आठ विभागांत टारास वल्बाच्या आधिपत्याखालील पलटण म्हणजे केवळ अजोड अशी होती. आणि स्वतः टारास–साऱ्या कोसॅक-भावनांचें एक मूर्तिमंत प्रतीकच ! गनीमांचा समूळ उच्छेद हा एकच ध्यास त्याला !

या युद्धांतील साऱ्या हालचालींचें, लढायांचें, कोसॅक शौर्याचें वर्णन येथें अप्रस्तुत ठरेल. तो सारा उज्ज्वल पराक्रम इतिहासांत नमूद झालाच आहे. धर्मासाठीं केलेलें युद्ध म्हणजे काय हें सारा रशिया जाणतो. धर्म ही एक

ह्याप्रभावी अशी शक्ति आहे. एक अदम्य अशी उफाळती ज्वाला आहे ती. एक अभेद्य, वेलाग असा कडा आहे तो. त्याविरुद्ध उभा ठाकणाऱ्याच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्याशिवाय कधींच रहात नाहींत.

शहरामागून शहरें पाडाव केलीं गेलीं. ज्यू सावकारांचीं प्रेतें झाडांना लटकलीं. नि पोल सैन्याची पूर्णपणें धूळधाण उडाली. अनेक सरदारांनीं दांतीं तृण धरलें. देवालयांतील धर्मगुरूंनीं मग मध्यस्थी केली नि तहाचीं बोलणीं सुरू झालीं. झालें गेलें विसरून जाण्याचें ठरलें. सारे कोसॅक कबूल झाले. पण एकटा टारास याला संमति देईना. तो साऱ्या कर्नल्सना उद्देशून म्हणाला, "असला भागूबाईपणा करूं नका माझ्या दोस्तांनो. या पोल लोकांवर विश्वास ठेवूं नका. अरे, आपला विश्वासघात करतील, हीं कुत्रीं !'

आणि मग पलटणीचा लेखनिक आंत येऊन त्यानें तो तहाचा कागद सेनाप्रमुखापुढें ठेवला आणि त्यानें त्यावर सही केली. त्याबरोबर टारासनें आपली उंची तुर्की तलवार सर्रकन म्यानाबाहेर काढली, एखाद्या काटकी-सारखें तिचे तटकन दोन तुकडे केले नि ते एकमेकांच्या विरोधी दिशांना झुगारून तो म्हणाला,

'नमस्ते! हे दोन तुकडे जसे आतां परत कधींहि एकत्र असे. सांधणार नाहींत, तसेच आपणहि या जगांत परत एकमेकांना कधीं भेटणार नाहीं. पण माझे हे अखेरचे शब्द नीट लक्षांत ठेवा !' त्याचा स्वर आतां भरदारपणें उंचावला होता. आजपर्यंत कधीं न दिसलेलें असें सामर्थ्य त्यांत आतां खणखणत होतें. त्याची ती भीषण भविष्यवाणी ऐकून साऱ्यांच्या हृदयाचा थरकांप उडाला. 'तुमच्या अखेरच्या घडीला तुम्हांला माझी आठवण होईल! या तहानें आपण शांतता मिळवली असं वाटतं आहे तुम्हांला? मायभूमीचे आपण खरेखुरे मालक झालों असं वाटतं आहे तुम्हांला? तसं नाहीं; पण दुसरेच कोणी तुमच्यावर सत्ता गाजवतील नि तुमचं, हेटमन, तुमचं मस्तक शत्रूच्या भाल्यावर खिळलं जाऊन नाक्या-नाक्यावर त्याचं प्रदर्शन केलं जाईल. तुमचं इतरांचंहि तेंच भवितव्य आहे ! दगडी भिंताडांच्या आंतील भीषण बंदिवास नाहींतर हालहाल होऊन मृत्यु ! ' आणि मग आपल्या तुकडीकडे वळून तो पुढें म्हणाला, 'आणि

मग तुम्ही रे पोरांनो! तुम्हांला कोणाकोणाला घरांतल्या खव्दाडांत लोळत किंवा घरांतल्या अंथरुणावरचं मरण हवं आहे नि कोणाकोणाला रणांगणावरील एकाच ऐसपैस शय्येवर खऱ्याखुऱ्या कोसॅक वीराचं मरण हवं आहे? कदाचित् तुम्हांला धर्मांतर करून पोलिश गुलामांचंहि जीवन जगायचं असेल!'

'आम्ही तुमच्या पाठीशीं आहोंत, कर्नलसाहेब! तुमच्याच पाठीशीं आहोंत आम्ही!' त्याचें सारें रेजिमेंट नि इतरहि कांहीं त्याच्या बाजूला येत ओरडले.

'तसं असेल तर या माझ्यामागें!' राहिलेल्यांकडे जळजळीत डोळयांनीं पहात टारास म्हणाला. आपल्या घोडयावर मांड टाकीत तो आपल्या लोकांना म्हणाला, 'आमची आठवण कडवट होऊं देऊं नका, माझ्या मित्रांनो! चला रे पोरांहो! गनीमाला देऊं या भेट!'

त्यानें आपल्या घोडयाला टांच मारली नि त्याचे लोक–घोडेस्वार नि पादचारी आणि त्यांच्या गाडया यांची मोठी रांग त्याच्यामागें निघाली. परत एकदां मागें वळून त्यानें मागें राहिलेल्या लोकांकडे जळजळीत डोळयांनीं पाहिलें. त्याला अडविण्याचें धैर्य कोणालाहि झालें नाहीं. साऱ्या सैन्याच्या समोरून त्याची पलटण चालली होती आणि टारास परत परत मागें वळून त्यांच्याकडे संतापानें पहात होता.

मुख्य सेनानायक नि इतरहि अधिकारी विपण्ण मुद्रेनें तिकडे पहात होते. कोणी कोणाशीं बोलत नव्हता नि सारें सैन्य उदास विचारांत गढलें होतें. टारासची भविष्यवाणी त्यांच्या कानांत घुमत होती नि थोडक्याच कालवधींत ती पूर्णपणें खरीहि ठरली. हेटमनचें मस्तक नि इतरहि असंख्य मस्तकें धडा-वेगळीं केलीं गलीं नि चहूंकडे मिरवलींहि गेलीं.

आणि टारास? आपल्या पलटणीनिशीं शत्रूच्या मुलखांत तो खोलवर घुसला आणि अनेक नगरांची धूळधाण उडवीत नि अनेक धर्ममंदिरें उध्वस्त करीत त्यानें खुद्द क्रॅकोंत प्रवेश केला. अनेक उमराव नि त्यांचे किल्लेकोट, राजविलासी महाल, उंची उंची मद्यालयें नि वस्त्रागारें, कांहीं म्हणून त्याच्या

तावडींतून सुटलीं नाहींत. केविलवाण्या किंकाळ्यांनीं त्याला द्रव फुटला नाहीं. साऱ्यांची रांखरांगोळी होत होती. आगीच्या ज्वाला उंच उंच आकाशांत उसळत होत्या नि क्रूरकर्मा कोसॅकांनीं भाल्याच्या फाळानें टिपलेलीं कोंवळीं बालकेंहि त्या खाईंत फेंकलीं जात होतीं.

'ही ओस्टॅपच्या मृत्यूची मेजवानी वरं कां सैतानांनो ! ' टारास ओरडून म्हणे. अखेरीस अनेक ठिकाणीं झडलेल्या या मेजवानीला आळा घालण्यासाठीं पांच पोलिश रेजिमेंट्स बाहेर पडल्या.

आपल्या पाठीवर आलेल्या या सैन्याला कोसॅक सैन्यानें सतत सहा दिवस झुलविलें. पण मग त्यांचीं घोडींहि मेटाकुटीस आलीं नि शत्रुसेनेच्या चिकाटीला यश येऊन नीस्टर नदीच्या कांठावरील एका उध्वस्त किल्ल्यांत विसांवा घेत असलेल्या टारासला तिनें गांठलें.

नीस्टरच्या तीरावरील एका उंच त्रेलाग दरडीवर किल्याच्या डळमळत्या भिंती उभ्या होत्या. त्यांच्या आश्रयानें कोसॅक वीरांनीं चार दिवस शत्रूला पुढें येऊं दिलें नाहीं. पण अखेरीस त्यांचें सामर्थ्य आणि धान्यसांठा संपुष्टांत आला आणि टारासनें शत्रूची फळी फोडून बाहेर पडण्याचें ठरविलें. आपल्या चपळ घोड्यांच्या मदतीनें ते तशी फळी फोडून बाहेर पडलेहि असते. पण उडालेल्या धुमश्चक्रींतच टारास ओरडला, 'अरे थांबा ! माझी तंबाखूची नळी पडली खालीं. ती देखील नाहीं या सैतानांच्या हातीं लागतां कामा ! ' नि तो म्हातारा खालीं गवतांत नळी शोधूहि लागला त्याच क्षणीं कांहीं जवानांनीं गर्दी करून त्याला पकडलें. त्याची सारी धडपड व्यर्थ ठरली. 'हें म्हातारपण, म्हातारपण ! ' तो आवेगानें उद्गारला. पण तें म्हातारपण नव्हतें–अत्यंत विषम अशी झुंज होती ती. साठ हात त्याच्यावर पडले होते. 'पकडलं ! आपली शिकार पकडली ! ' ते पोल किंचाळले. आणि आपल्या मुख्याधिकाऱ्याच्या अनुमतीनें त्यांनीं त्याला जिवंत जाळण्याचें ठरविलें. जवळच्याच एका झाडाला त्यांनीं त्याला लोखंडी सांखळयांनीं जखडून टाकलें. त्याच्या पायाजवळ गवताची नि लाकडांची रास रचली गेली. पण टारास या कशाकडेहि पहात नव्हता. स्वतःचा तो अग्निप्रवेश त्याला भिववीत नव्हता. त्याचे कोसॅक वीर

पाठलाग करणाऱ्यांवर गोळ्या झाडीत होते तिकडेच तो न्याहाळून पहात होता. त्याला सारें स्पष्ट दिसत होतें.

'जलदी करा, पोरांनो! झाडीपलीकडील ती दरड गांठा चटकन्' तो ओरडून सांगत होता. पण त्याचे शब्द तिथपर्यंत पोंचत नव्हते.

'संपलं सारं! नि हें एका क्षुल्लक गोष्टीसाठीं!' तो निराशेनें सुस्कारला. नदीच्या चमकत्या पात्रावर त्यानें दृष्टि टाकली.

खालीं त्याला चारपांच नावा दिसल्या आणि त्याचे डोळे आनंदानें चमकले. आपली सारी शक्ति एकवटून तो मोठ्यानें ओरडला.

'तो तीर गाठा पोरांनो! तिकडून डावीकडून पळा! होड्या आहेत खालीं पात्रांत त्या पकडा!'

या वेळीं मात्र अनुकूल वाऱ्यामुळें कोसॅकांनीं ते शब्द ऐकले. पण त्याच्या डोक्यांत मात्र कोणीतरी दंडुका हाणला नि त्याच्या डोळ्यांपुढें अंधार दाटला.

ते कोसॅक नदीच्या रोखानें आतां बेभानपणें दौडत होते पण त्यांचे शत्रूहि अगदीं नजीक आले होते. समोरच्या वेड्यावांकड्या वाटेनें त्यांचा मार्ग रोधला होता. तें पहातांच कोसॅक गरजले, 'ही घेतली पहा उडी!' घोड्यांना टांच देत त्यांनीं कर्कश शिट्या फुंकल्या. त्यांच्या या उमद्या तार्तार घोड्यांनीं वर उसळी घेतली आपलीं अंगें सर्पासारखीं ताठ केलीं नि दरडीवरून जोरांत झेंप घेऊन खालच्या पात्रांत त्यांनीं झेप घेतली. फक्त दोन स्वारांच्याच उड्या चुकल्या नि ते खालच्या खडकांवर आपटून त्यांच्या चिंधड्या उडाल्या. इतर कोसॅकांनीं आपल्या घोड्यांसह पोहत पोहत त्या नावा गांठल्या होत्या. त्यांचे शत्रू वाटेंतच थबकून या अश्रुतपूर्व धाडसाकडे तोंडांत बोट घालून पहात राहिले. त्यांचें अनुकरण करण्याचें धाडस त्यांच्यानें करवलें नाहीं.

मस्तकावर झालेल्या आघातानें आलेल्या बेशुद्धींतून जागा होतांच टारासनें नीस्टरच्या पात्राकडें दृष्टि टाकली. कोसॅकांच्या नावांना आतां वेग आला होता. शत्रूच्या गोळ्यांच्या टप्प्यापलीकडे ते गेले होते. त्याचे वृद्ध नेत्र आनंदानें चमकले.

'रामराम, दोस्तांनो!'. तो जोरानें ओरडला. 'माझी आठवण ठेवा नि पुढल्या वर्षी परत या मोहिमेवर! हं, कपं काय रे सैतानांनो! असलं बेडर शौर्य कुठं पाहिलं आहे का तुम्हीं? थांबा तुम्हांला धडा शिकवील असा रशियन वीर एक दिवस जन्माला येईलच येईल! नि जगांतली कोणतीहि शक्ति, सत्ता त्याच्यापुढें खडी राहूं शकणार नाहीं!'

त्याच्या पायांखालचीं लांकडें आतां धडाकून पेटलीं होतीं नि अग्नीच्या लळलळत्या ज्वालांनीं त्याला चहूंकडून घेरलें होतें.... पण या जगांतली कोणती धगधगती आग, पाशवी छळ, कोणती सत्ता त्याच्या देशाच्या सामर्थ्याला नमवूं शकेल?

नीस्टरच्या विशाल पात्रावरून कोसॅक नौका झपाट्यानें चालल्या होत्या. घाबरून वर उठलेलीं पाणकोंबडीं उंच उडून चीत्कारत गेलीं. वल्हीं मारीत असलेले कोसॅक आपल्या वृद्ध नेत्याचें गुणगान मुक्तकंठानें करीत होते.

Very few 7/11/62

३३३२५
२८८६

IRBK-0109895

## युद्धाच्या धुमश्चक्रींत —

प्रत्यक्ष काय घडत असतें
हें सर्वसामान्य माणसाला कसें कळणार?
तरीपण हीं कांहीं पुस्तकें वाचलींत
म्हणजे रणांगणावर उभे राहून
प्रत्यक्ष लढाईच पहात असल्यासारखें वाटेल :

- **पुण्यपथ पानिपत**
  परकीय आक्रमकांना थोपवून धरण्यासाठीं मराठ्यांनीं वीरगति पत्करली तो संग्राम
  सुधाकर प्रभु : रु. २—००
- **मराठ्यांचे महापराक्रम**
  मराठ्यांच्या इतिहासांतील पराक्रमाचे स्फूर्तिप्रद प्रसंग
  पानोपानीं चित्रांचीं २० पुस्तकें
  चार संच : रु. १३—५०
- **वाघजईच्या जंगलांत**
  राजारामकालीन ऐतिहासिक कादंबरी
  अनु. सुशील परभृत : २—००
- **छोटा सरदार**
  एका मुलाचा पराक्रम-कादंबरी
  गो. वि. नामजोशी : रु. २—००
- **दोन शिलेदार**
  दोघां भावांची शौर्यकथा
  सुधाकर प्रभु : रु. १—५०
- **इतिहासाच्या पानोपानीं**
  इतिहास कथा-संग्रह : १—५०
- **गुलाबाचें युद्ध**
  इंग्लंडमधील एक संस्मरणीय लढाई : कादंबरी रु १—५०
- **पहिलें महायुद्ध**
  १९१४—१८ च्या महायुद्धाचा साधार संक्षिप्त इतिहास
  स. शं. देसाई : रु. २—००
- **दुसरें महायुद्ध**
  १९३९—४५ च्या महायुद्धाचा साधार संक्षिप्त इतिहास
  स. शं. देसाई : रु. २—००

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २